CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित


आजचा सामना




वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : एम.ए. चिदंबरम स्टेडियम, चेन्नई

सोलापूर | शुक्रवार, २८ मार्च २०२५। युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक १३९ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# करवाढ नसलेला महापालिकेचा १३०० कोटींचा अर्थसंकल्प!

- गत बजेटपेक्षा यंदा १३६ कोटींची वाढ
- महापालिका उप समितीच्या सर्वसाधारण सभेत १२९३ कोटींचे अंदाजपत्रक मंजूर
- महसुली जमेतून मिळणार ७७३ कोटी
- भांडवली कामांसाठी ५९ कोटींची तरतूद
- सीबीएसईच्या २ शाळा करणार सुरु



**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि.२७ मार्च-**

महापालिका प्रशासनाने गत अंदाजपत्रकात १३६ कोटी रुपयांची वाढ करत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील तयार केलेले मनपा उत्पन्न ७७३ कोटी १६ लाख अनुदान, ४२३ कोटी ५३ लाख रुपये आणि कर्ज विभाग ९६ कोटी ६१ लाख रुपये असे तिन्ही मिळून एकूण १२९३ कोटी ३० लाख १३ हजार ४०१ रुपयाच्या अंदाजपत्रकास आज म हापालिका उपसमितीच्या सर्वसाधारण सभेत अंतिम मंजुरी देण्यात आली. या अंदाजपत्रकात कोणत्याही महसूलीसह कर, दरवाढ करण्यात आलेली नाही.

महापालिकेच्या लोकप्रतिनिधीची मुदत मार्च २०२२ मध्ये संपली. त्यामुळे त्यानंतर महापालिकेवर प्रशासकीय राजवट सुरू झाली. यामुळे सर्व अधिकार प्रशासक तथा आयुक्त यांना देण्यात आले. लोकप्रतिनिधी असताना प्रशासकीय अंदाजपत्रक म हापालिका आयुक्त हे स्थायी समितीकडे सादर करत होते. त्यानंतर स्थायी समितीचे सभापती महापालिकेच्या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेत ते मांडत असत. त्यानंतर यावर चर्चा व सुधारणा होऊन महापालिका सर्वसाधारण सभेमध्ये अंतिम मंजुरी देण्यात येते. परंतु सध्या प्रशासकीय राजवट असल्याने २०२५ - २६ चे महापालिकेचे अंदाजपत्रक सोमवारी महापालिका नगर सचिव कार्यालयाकडे सादर केले होते.

या अंदाज पत्रकावर स्थायी बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चेनंतर मंजूर करण्यात आले. त्यानंतर आता नगरसचिव मार्फत उपसमितीकडे निर्णयासाठी सादर करण्यात आले. आज महापालिकेचे मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर यांनी अंदाजपत्रक प्रशासक तथा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना सादर केले. त्या अंदाजपत्रकास आज महापालिका उपसमितीच्या सर्वसाधारण सभेत अंतिम मंजुरी देण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

(उर्वरित वृत्त पान २ वर)

### असा होणार भांडवली कामांवर खर्च

- वार्डवाईज कामे- १३ कोटी ४४ लाख
- विविध योजनेसाठी महापालिका हिस्सा- ४० कोटी ७९ लाख
- जागा संपादन करणे आणि जागा ताब्यात घेणे- २० लाख, गुंठेवारी खर्च- १ कोटी,
- डीपीआर तयार करणे- ४ कोटी ,
- माता रमाई पुतळा परिसर सुधारणा- २५ लाख आदी

### परिवहनचे ५६ कोटींचे अंदाजपत्रक

सोलापूर महापालिका अंतर्गत परिवहन उपक्रमाचा सन- २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा ५५ कोटी ९२ लाखाचा प्रशासकीय अंदाजपत्रकास महापालिका उपसमितीच्या सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आली. (सविस्तर वृत्त पान २ वर)

स्थलांतरित व विदेशी कायदा विधेयक लोकसभेत पारित

# देश म्हणजे धर्मशाळा नाही

## गृहमंत्री अमित शाह यांचा घणाघात

**नवी दिल्ली, दि. २७ मार्च-**

व्यवसाय, शिक्षण आणि गुंतवणुकीसाठी भारतात येणाऱ्यांचे स्वागत आहे. पण, सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. हा देश म्हणजे धर्मशाळा नाही, असे अमित शाह यांनी लोकसभेत ठणकावून सांगितले. लोकसभेत गुरुवारी स्थलांतरित व विदेशी कायदा-२०२५ विधेयक पारित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मांडलेल्या विविध सुधारणा नाकारण्यात आल्या आणि आवाजी म तदानाने ते मंजूर करण्यात आले. देशाची सुरक्षा आणि अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी, उत्पादन आणि व्यापाराला चालना देण्यासाठी, शिक्षण व्यवस्थेला जागतिक मान्यता मिळवून देण्यासाठी तसेच विद्यापीठांना आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी हे विधेयक आवश्यक असल्याचे शाह यांनी सांगितले. प्रस्तावित कायदा देशाची सुरक्षा मजबूत करेल, अर्थव्यवस्था आणि व्यवसायाला चालना देईल तसेच आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रांना प्रोत्साहन देईल, असे शाह यांनी चर्चेला उत्तर देताना सांगितले. या विधेयकामुळे भारताला भेट देणाऱ्या प्रत्येक विदेशी व्यक्तीची अद्ययावत माहिती देशाला मिळेल. हे अतिशय महत्त्वाचे आहे. मुख्य मुद्दा असा आहे की, स्थलांतर हा एक वेगळा विषय नाही. परंतु, तो प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विविध मुद्यांशी जोडलेला आहे. या विधेयकामुळे भारतात येणाऱ्या प्रत्येकाचे बारकाईने निरीक्षण केले जाईल. ते भारतात का येतात आणि त्यांना भारतात किती काळ राहायचे आहे, याचे निरीक्षण केले जाईल. भारताला भेट देणाऱ्या प्रत्येक विदेशी व्यक्तीची माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे, असे अमित शाह यांनी जवळपास तीन तास चाललेल्या चर्चेनंतर सांगितले.

अधिकार विरोधी पक्ष ज्या पद्धतीने प्रश्न उपस्थित करीत आहेत, ते पाहून मला आश्चर्य वाटते, असा घणाघात अमित शाह यांनी विरोधकांवर केला. देशातील नागरिकांनी भाजपाला मत दिले. आम्ही बहुमताने सरकार स्थापन केले आहे. विदेशी लोकांची घुसखोरी, भारतात येणाऱ्यांकडे वैध दस्तावेज आहेत की नाही, याची तपासणी करण्याचा अधिकार सरकारला आहे.

# इंद्रजित सावंतांना मीच फोन केला

## प्रशांत कोरटकरची पोलिसांकडे कबुली

**कोल्हापूर, दि. २७ मार्च-**

इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना मीच फोन केला होता. मोबाइलमधील संपूर्ण डेटाही स्वतःहून डिलिट केला असल्याची कबुली प्रशांत कोरटकर याने पोलिसांना दिल्याची माहिती समोर आली आहे. असे वृत्त एका मराठी वृत्त वाहिनीने दिले आहे. प्रशांत कोरटकरने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर आपण मंचरियाल येथून चेन्नईला जाणार होतो असेही पोलिसांना सांगितले आहे.



कोरटकरला न्यायालयाकडून २८ मार्चपर्यंत पोलीस कोठडी मिळाल्यानंतर बुधवारी त्याच्या आवाजाची फॉरेन्सिक टीम कडून तपासणी करण्यात आली. तत्पूर्वी रात्रभर केलेल्या चौकशीत कोरटकरने कोल्हापूर पोलिसांना ही माहिती दिल्याचे वृत्त आहे. कोल्हापूर पोलिसांच्या कोठडीत मध्यरात्री प्रशांत कोरटकरच्या छातीत कळा आल्याने त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वैद्यकीय तपासणी करून त्याला चौकशीसाठी इतर ठिकाणी हलवल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

प्रशांत कोरटकर हा तब्बल महिनाभरापासून पोलिसांना गुंगारा देत होता. यानंतर कोल्हापूर पोलिसांकडून प्रशांत कोरटकर याची चौकशी केली जात आहे. प्रशांत कोरटकर कुठे गेला होता, कोणाची मदत घेतली, कुठे किती दिवस राहिला, यादरम्यान कोणीकोणी मदत केली, असे प्रश्न पोलिसांनी प्रशांत कोरटकर याला विचारले. त्यामुळे त्याला पोलिस दलातील अधिकाऱ्यांनी मदत केली का देखील तपासले जात आहे.



# लखनौचा हैदराबादवर ५ विकेटनी विजय

**हैद्राबाद, दि. २७ मार्च -**

आयपीएलच्या १८ व्या हंगामात लखनौ सुपरजायंट्सने आपला पहिला विजय नोंदवला. गुरुवारी, त्यांनी सनरायझर्स हैदराबादला त्यांच्या घरच्या मैदानावर ५ विकेट्सने पराभूत केले. ३४ धावांत ४ बळी घेणारा शार्दुल ठाकूर सामनावीर ठरला.

लखनौने राजीव गांधी स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हैदराबादने ९ विकेट गमावून १९० धावा केल्या. ट्रॅव्हिस हेडने ४७ आणि अनिकेत वर्माने ३६ धावा केल्या. लखनौने १६.१ षटकांत ५ गडी गमावून लक्ष्य गाठले. निकोलस पूरनने ७० आणि मिचेल मार्शने ५२ धावा केल्या.

# संतोष देशमुखांचे अपहरण करून हत्या केली

## घुलेसह ३ आरोपींकडून गुन्ह्याची कबुली

**बीड, दि. २७ मार्च -**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी सुदर्शन घुले याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. घुले याच्यासह इतर तीन आरोपींनी देखील हत्येची कबुली दिल्याची माहिती आहे. वाल्मीक कराड यांनी सांगितल्यानंतर खंडणी मागण्यात आल्याची माहिती या आरोपींनी दिली.

आरोपी सुदर्शन घुलेसह तीन आरोपींनी गुन्हा कबुल केला आहे. या तिन्ही आरोपींनी दिलेली कबुली खूप महत्त्वाची मानली जात आहे. कारण आता यावरच केस आणखी मजबूत होणार आहे.आरोपींपैकी सुदर्शन घुले, जयराम चाटे आणि म हेश केदार यांनी पोलिस चौकशीत आपला गुन्हा कबुल केला आहे.



आपणच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन त्यांची हत्या केल्याची कबुली सुदर्शन घुलेसह तीन आरोपींनी दिली आहे.

सुदर्शन घुलेने देशमुख हत्या प्रकरणी पोलिसांपुढे कबुली दिली असेल तर ग्राह्य धरली जात नाही, मॅजिस्ट्रेटपुढे दिली तर केस संपल्यात जमा आहे. पण त्याने नेमके कुणासमोर कबुली दिली हे आपल्याला अजून माहिती नाही, कलम १६४ खाली जर कबुली दिली असेल तर चांगलेच आहे, असे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कारला बुलेटचा धक्का लागल्याच्या कारणावरून खूनी हल्ला

## तिघांना पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मार्च -**

शहरातील जोडबसवण्णा चौकातील राज हॉटेल येथे रस्त्यावर कारला बुलेटचा धक्का लागल्याच्या कारणावरुन तरूणावर चाकूने खूनी हल्ला करणाऱ्या तिघांना न्यायालयाने पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

पंकज अनिल काटकर, सुधाकर पाटील आणि कुमार रमेश गदगे (रा. सोलापूर) या तिघांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली असून याबाबत यासर अराफत अकील बागवान (वय २०, रा. शास्त्री नगर, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जोडबसवण्णा चौकातील राज हॉटेल येथील सार्वजनिक रोडवर २६ मार्च रोजी पहाटे पाचच्या सुमारास पंकज काटकर व त्याच्या तीन साथीदारांनी त्यांच्या कारला यासर बागवान याच्या बुलेटचा धक्का लागल्याच्या कारणावरून शिवीगाळ करून लाथाबुक्कयाने मारहाण केली. तसेच पंकज काटकर याने त्याच्याजवळील चाकूने बागवान याच्या डाव्या हाताला, पोटाला, डाव्या काखेत व ठिकठिकाणी वार करून त्याच्या खूनाचा प्रयत्न केला. यावेळी भांडण सोडविण्यासाठी आलेल्या बागवान याच्या वडीलांना तसेच इतर नागरीकांनादेखील काटकर याने खल्लास करण्याची धमकी देत दहशत माजवित पळून गेला. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी सुधाकर पाटील व कुमार गदगे यांस अटक केली. तर पळून गेलेल्या पंकज काटकर यास शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पुण्यातून ताब्यात घेऊन जेलरोड पोलिसांच्या ताब्यात दिले.

या तिघांना गुरुवारी न्यायालयात हजर केले असता तिघांनाही न्यायालयाने पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. पोलिस निरीक्षक भाऊराव बिराजदार पुढील तपास करीत आहेत.

# शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये स्वच्छता मोहीम राबवा

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये, अस्वच्छतेचे व मूलभूत गरजांच्या समस्यांची महाभयंकर परिस्थिती निर्माण झाली आहे.

त्यामुळे संपूर्ण शहराच्या आरोग्यावर याचा परिणाम होत असून, शहरवासी यांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी आणि झोपडपट्टीतील समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिका आयुक्त श्री सचिन ओंबासे साहेब यांना मी सोलापूर माझे सोलापूर समितीचे अध्यक्ष विष्णू कारमपुरी (महाराज) यांच्या नेतृत्वाखाली, शेकडो झोपडपट्टी रहिवासी यांच्यासोबत मागण्यांचे निवेदन देण्यात आले.


# १२ महत्त्वाचे कायदे मंजूर; अर्थसंकल्पावर सकारात्मक चर्चा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ मार्च**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण १२ महत्त्वाचे कायदे मंजूर करण्यात आले असून,दरदिवशी सरासरी ९ तास कामकाज चालले. राज्यासमोरील महत्त्वाच्या प्रश्नांवर विस्तृत चर्चा झाली. सरकारने चर्चेला सकारात्मक प्रतिसाद दिला, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी सांगितले.

अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर रात्री झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी विरोधी पक्षालाही त्यांच्या मुद्द्यांसाठी संपूर्ण संधी देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते. फडणवीस म्हणाले की, या अधिवेशनात महत्वाच्या विधेयकांमध्ये माथाडी कामगार कायद्यातील सुधारणा विधेयकाचा समावेश असून या विधेयकामुळे बनावट माथाडी आणि ब्लॅकमेलिंग रोखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक विधेयक आणि विनियोजन विधेयकासह अनेक महत्त्वाची विधेयके संमत करण्यात आली. या अधिवेशनात संविधानावर विशेष चर्चा झाली, तसेच अर्थमंत्री यांनी शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार आणि सामाजिक विकास या पंचसूत्रीवर आधारित अर्थसंकल्प सादर केला आहे,जो महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती देईल. असे सांगितले.



यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की,सर्व कल्याणकारी योजना सुरू ठेवून अर्थव्यवस्था बिघडू न देता अर्थसंकल्प सादर केला.राज्यातील १३ कोटी लोकांच्या विकासाच्या दृष्टीने विचार करून अर्थमंत्री अजित पवार यांनी अतिशय चांगला अर्थसंकल्प सादर केला. एकीकडे विकास प्रकल्प आणि दुसरीकडे कल्याणकारी योजना पुढे नेताना सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून काम करित आहोत.

परकीय गुंतवणूक वाढविण्यातही राज्य अग्रेसर असून, दाओस येथे झालेल्या परिषदेत १५ लाख कोटीचे करार करण्यात आले. स्टार्ट अपमध्ये राज्य अव्वल असून, आपल्या राज्यावर इतर राज्यांच्या तुलनेत कर्जही कमी आहे. १०० दिवसांच्या काम काजाचे उद्दिष्ट मुख्यमंत्री यांनी सर्व विभागांना दिले होते, त्यानुसार सर्व विभागांनी उत्तम काम पार पाडले असल्याचेही त्यांनी सांगितले.

### त्यांच्या डोक्यात फक्त कबर आणि कामरा

अधिवेशनाबाबत विरोधी पक्षाने केलेल्या टीकेबाबत बोलताना ते म्हणाले की,''विकासासाठी अनेक धोरणं असलेला अर्थसंकल्प पारीत केल्याने विकासाला गती मिळेल. अध्यक्षांवर आमचा काही दबाव नाही. तुम्ही त्यांना हा प्रश्न विचारा. रोज ६ तास काम करायला पाहिजे .मात्र आम्ही ९ तास काम केले. विरोधकांच्या डोक्यात फक्त कबर आणि कामरा दिसतो त्याला आम्ही काय करणार?'', असा टोला लगावला.

### मुंडेच्या बाबतीत जे शक्य होते ते केले

धनंजय मुंडे प्रकरणी मी फार स्पष्ट शब्दात सांगितलेले आहे की याबद्दल नाराज असण्याचे काहीही कारण नाही. आम्ही कायद्याने चालतो. जे कायद्यात होते ते केलेलं आहे'', असे सांगून फडणवीस म्हणाले, लक्ष्यवेधी अधिक मांडल्या तर हरकत नाही. निकषात बसणाऱ्या लक्ष्यवेधीच आल्या पाहिजे बाकी नाही. विनापुरावे बोलणं बरोबर नाही. उलटसुलट काम व्हावे असं वाटत नसेल तर निकषानुसारच व्हाव्यात. कायदे विनाचर्चेनं पास झाले नाही.

# आ. सचिन कल्याणशेट्टींनी बाजार समिती निवडणूक लढवावी

## दक्षिण सोलापुरातील भाजपसह समविचारी कार्यकर्त्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

सोलापूर येथील श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक रणधुमाळीला प्रारंभ झाला आहे. शुक्रवारी २८ मार्च रोजी अर्ज विक्री आणि अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर अक्कलकोटचे माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांनी ही निवडणूक लढवावी असा आग्रह दक्षिण सोलापूर तालुक्यातील भाजपसह समविचारी कार्यकर्ते धरत आहेत.

सोलापूर बाजार समितीची ही निवडणूक असली तरी त्याचे रिमोट कंट्रोल अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे आहे. काही करून त्यांना बाजार समिती ताब्यात घ्यायची आहे. शिवाय त्या बाजार समितीवर भाजपचा झेंडा फडकवायचा आहे. यासाठी समविचारी, विरोधी आणि ज्यांच्याकडे मतांची संख्या जास्त आहे असा सगळ्यांना एकत्रित करून नियोजन करण्यात आमदार सचिन कल्याणशेट्टी पुढे आहेत. त्यांना बाजार समितीचे माजी उपसभापती सुरेश हसापुरे, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, बाजार समितीचे माजी चेअरमन राजशेखर शिवदारे यांच्यासह राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे यांच्यासह अनेक मातब्बरांची साथ मिळत आहे. या पार्श्वभूमीवर अनेक बैठका, खलबते घडले आहेत. आता उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस असताना मिलन कल्याणशेट्टी यांच्या नावाची मागणी होत आहे. मिलन कल्याणशेट्टी हे दुधनी बाजार समिती आणि अक्कलकोट बाजार समिती निवडणुकीत फार मोठी व्यूहरचना आखून भाजपचा झेंडा फडकवला आहे. शिवाय ते अक्कलकोट नगरपरिषदेमध्ये नगरसेवक म्हणून चांगली कामगिरी केलेली आहे.





यामुळे त्यांच्या नावाचा आग्रह धरण्यात येत आहे. ऐनवेळी मिलन कल्याणशेट्टी अर्ज भरणार की दस्तूरखुद्द आमदार सचिन कल्याणशेट्टी अर्ज भरणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

# पान १ वरुन महापालिकेचा अर्थसंकल्प...

### प्रशासकीय अंदाजानुसार असा येणार रुपया !

| विवरण असे | शेकडा प्रमाण - अंदाज रक्कम |
|---|---|
| मनपा करापासून उत्पन्न | १४६ कोटी ५२ लाख ८ हजार- १८. ९५ पैसे |
| निश्चित महसूली उत्पन्न | १८ कोटी ५३ लाख- २. ४० पैसे |
| महापालिकेच्या मालमत्तेपासून भाडे उत्पन्न | १५ कोटी ५७ लाख ५० हजार- २. ०१ पैसे |
| शुल्क आणि वापरकर्ता शुल्क | ९८ कोटी ६८ लाख ९३ हजार- १२. ७६ पैसे |
| विक्री आणि भाडे | ४१ कोटी ८० लाख ७५ हजार- ५. ४१ पैसे |
| महसुली अनुदान | ३४५ कोटी ४२ लाख ३५ हजार- ४४. ६८ पैसे |
| गुंतवणुकीतून उत्पन्न | २ कोटी- ०. २६ पैसे , |
| दिलेल्या कर्जावरील व्याज | १० लाख ५० हजार- ०.०१ पैसे , |
| इतर उत्पन्न | १ कोटी २० लाख- ०. १६ पैसे , |
| पाणीपुरवठा जमा | ८६ कोटी २८ लाख ४५ हजार- ११. १६ पैसे |
| भांडवली जमा | १७ कोटी- २. २० पैसे , |
| एकूण | ७७३ कोटी १३ लाख ५६ हजार- १०० पैसे. |



दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अंदाजपत्रकासंदर्भात पत्रकारांना सविस्तर माहिती दिली. अंदाजपत्रक सादर करताना महापालिका प्रशासनाने सन २०२४-२५ चे सुधारित अंदाजपत्रक देखील सादर केले आहे.

यानुसार सन २०२४-२५ चे मान्य अंदाजपत्रकानुसार महसूली उत्पन्न ६०९ कोटी २३ लाख ३१ हजार आणि पाणीपुरवठा ८४ कोटी ३६ लाख २८ हजार आणि भांडवली १७ कोटी १० लाख असे ७१० कोटी ६९ लाख ५९ हजार इतके होते. पण सुधारित अंदाजानुसार महसुली उत्पन्न ५८२ कोटी ९० लाख ३२ हजार आणि पाणीपुरवठा ७८ कोटी ३३ लाख २८ हजार असे कमी करत ६७५ कोटी २४ लाख ६० हजार इतके सादर करण्यात आले आहे. सन २०२५- २६ च्या अंदाजपत्रकात महसुली विभागामध्ये महसुली विभाग ६६९ कोटी ८५ लाख ११ हजार, पाणीपुरवठा ८६ कोटी २८ लाख ४५ हजार आणि भांडवलीमध्ये १७ कोटी आणि आरंभी शिल्लक २ लाख ५७ हजार ४०१ असे ७७३ कोटी १६ लाख १३ हजार ४०१ तर खर्चामध्ये महसूल विभाग ५८५ कोटी १७ लाख २९ हजार, पाणीपुरवठा १२८ कोटी २८ लाख २७ हजार आणि महसुली विभागातून भांडवली कामासाठी वर्ग करण्यासाठी ४४ कोटी ६८ लाख सह ५९ कोटी ६८ लाख रुपये आणि अखेरची शिल्लक २ लाख ५७ हजार ४०१ अशी खर्च बाजू धरण्यात आली आहे.

शासन अनुदान ४२३ कोटी ५३ लाख जमा आणि तितकेच खर्च तसेच कर्ज विभागामध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान, मलनित्सारण योजना महापालिका हिस्सा कर्ज ९६

### असा जाणार खर्चरुपी रुपया

| विवरण असे | अंदाज रक्कम- शेकडा प्रमाण |
|---|---|
| पाणी पुरवठा व्यतिरिक्त कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते | २१५ कोटी ८६ लाख ९१ हजार- २७. ९२ |
| मनपा कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन, कुटुंब वेतन | १२३ कोटी ६८ लाख २ हजार- १६. ०० |
| प्रशासकीय खर्च | १५ कोटी २४ लाख २० हजार- १. ९७ |
| देखभाल व दुरुस्ती | ११३ कोटी ३९ लाख ५० हजार- १४. ६७ |
| घेतलेल्या व घ्यावयाच्या कर्जावरील खर्च | १३ कोटी ३५ लाख ७४ हजार १. ७३ |
| कार्यक्रम व योजनांवरील खर्च- | ५२ कोटी ६४ लाख ६२ हजार- ६. ८१ |
| महसुली अनुदाने, देणग्या, योगदाने | १८ कोटी ८८ लाख २० हजार- २. ४४ |
| कर्जे, अग्रीम आणि ठेवी | १ कोटी १५ लाख- ०. १५ |
| करावरील सूट व परतावा | १७ कोटी- २. २० |
| पाणीपुरवठा खर्च | १२८ कोटी २८ लाख २७ हजार- १६. ५९ |
| स्थिर मालमत्ता | १३ कोटी ८० लाख १० हजार- १. ७९ |
| भांडवली खर्च | ५९ कोटी ६८ लाख- ७. ७२ |

कोटी ६१ लाख इतके जमा व खर्च असे एकूण अंदाजपत्रक १२९३ कोटी ३० लाख १३ हजार ४०१ इतके तयार करण्यात आले त्याला मंजुरी देण्यात आली. भांडवली कामासाठी उपलब्ध होणारी रक्कम अशी विकास शुल्क १६ कोटी रुपये, गुंठेवारी क्षेत्रात मूलभूत सोयी करणे- एक कोटी रुपये, महसूल निधीतून भांडवली कामासाठी वर्ग करण्याची रक्कम ४२ कोटी ६८ लाख रुपये असे एकूण ५९ लाख ६८ हजार रुपये.

### असे आहे मागील वर्षांचे बजेट

दरम्यान , सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक १०५५ कोटी रुपयाचे होते. मागील २०२३ - २४ चे अंदाजपत्रक हे १०७५ कोटी १९ लाख रुपयाचे होते. सन २०२४-२५ चे एकूण १ हजार १५७ कोटी २३ लाख १६ हजार ४०१ रुपयांचे अंदाजपत्रक होते. यंदा सन २०२५ - २६ चे अंदाजपत्रक एकूण १२९३ कोटी ३० लाख १३ हजार ४०१ रुपयाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत यंदाच्या बजेटमध्ये १३६ कोटीची वाढ झाली असल्याचे दिसून येते.

### जलवाहिनी गळती शोध मशीन खरेदीसाठी तरतूद

खरेदी व देखभाल करणे: जलवितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी सर्वेक्षण, कन्सल्टन्सी, ॲक्शन प्लॅन इत्यादी कामे करण्यासाठी ५० लक्ष. शहरास होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या पाईप लाईन वरील पाणी चोरी वर आळा बसविणे, विना परवाना नळ कनेक्शन, पाईप लाईनची गळती कामकाजाकरीता कॅमेराचा अंतर्भाव असणारे एन्डोस्कोपी रोबोट खरेदी करण्यात येणार आहे. सदर कामकाजाकरीता एकूण ५० लाख इतकी तरतूद अंदाजपत्रकात करण्यात येणार आहे.

### प्रायोगिक तत्त्वावर दोन शाळांमध्ये सीबीएसईचे वर्ग सुरू करणार

महापालिका शाळांचा कायापालट करण्यासाठी सीबीएसई धर्तीवर शाळा चालू करण्यात येत आहे. म.न.पा.शाळामध्ये शक्यतो गरीब व वंचित कुटुंबातील मुले शिक्षण घेतात. त्यांची बौध्दिक क्षमता खाजगी शाळामध्ये शिकणाऱ्या मुलांपेक्षा कुठेही कमी नाही. त्यांना फक्त आवश्यकता ते दर्जेदार शिक्षणाच्या संधीची या जाणीवेतून म.न.पा.शाळेतील मुलांना कमी खर्चात अभ्यासक्रम शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी म्हणून म.न.पा.मार्फत प्रायोगिक तत्त्वावर दोन शाळांमध्ये सीबीएसई चे वर्ग पुढील शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याच्या अनुषंगाने १ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे, असे आयुक्तांनी यावेळी स्पष्ट केले.

### सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील ठळक मुद्दे असे

- कोणतीही करवाढ नसणारा काटकसरीचा अर्थसंकल्प
- महसुली उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न
- खर्चामध्ये वित्तीय शिस्त
- पोषक व शास्वत पर्यावरणाकरीता उपाययोजना
- महिला व बालकल्याण साठी व दिव्यांग कल्याणसाठी प्रत्येकी २.४६ कोटी इतकी तरतूद
- ज्येष्ठ नागरीकांसाठी १०.०० लाख इतकी तरतूद
- प्रशासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता यावर भर
- मालमत्ता कर विभाग अंतर्गत संरचनात्मक, करविषयक सुधारणा, तंत्रज्ञानाचा वापर यासाठी तज्ञ तांत्रिक सल्लागार यांची नियुक्तीसाठी स्वतंत्र ५० लक्ष रूपयांची तरतुद.
- तसेच ड्रेनेजमधील गाळ व इतर बाबींची तपासणी करणेच्या कामकाजाकरीता देखील कॅमेराचा अंतर्भाव असणारे एन्डोस्कोपी रोबोट खरेदी करण्यात येणार आहे. सदर कामकाजाकरीता एकूण ५० लाख इतकी तरतूद अंदाजपत्रकात करण्यात येणार
- शासन अनुदान योजनेस मनपा हिस्सा जमा करणे अनुदानाच्या मनपा हिस्सा जमा करणेसाठी ४०.८३ कोटी इतकी तरतुद.
- हैद्राबाद रोड येथे देखील पेट्रोल पंप उभारण्याचे कामकाज हाती असून प्रत्यक्षात जून-२०२५ पर्यंत तो पंप देखील चालू होवून उत्तपन्नात वाढ
- सोलार प्रकल्प : बी.ओ.टी. सोलापूर महानगरपालिकेच्या / सरकारी मालकीच्या जागेत उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून एकूण १४ ठिकाणी वाणिज्य संकुल उभारणेकामी बी. ओ.टी. प्रणालीमध्ये विकासकाकडून योजना राबविणे प्रस्तावीत असून, या ठिकाणी बी.ओ.टी प्रणाली मधून योजना राबविण्याचा मानस.
- सोलापूर शहरातील प्रस्तावित दोन उडाणपूल : सोलापूर शहरातील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचेकडून सेक्शन-१ जुना पुना नाका ते पत्रकार भवन चौक (एकूण लांबी ५.४५ कि.मी.) तसेच सेक्शन-२ जुना बोरामणी नाका ते मोरारका मंगला (एकूण लांबी १०० कि.मी.) असे दोन उड्डाणपुल प्रस्तावित असून शासन हिस्सा रक्कम व मनपा स्वःनिधीतून लवकरच भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होणार आहे
- पी.एम.ई. बस सेवा: पी.एम. ई-बस सेवा अंतर्गत शहरासाठी १२ ३० आणि (९० ()-७०) अशा एकूण १०० ई-बसेसला मंजूरी मिळाली आहे. त्यानुसार कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. ई-बस डेपो व संबंधित चार्जिंग सुविधा उभारणीचे कामकाज बुधवार पेठ येथे सुरु आहे.

### मिळकतीचे सर्वेक्षण, कर आकारणीसाठी स्वतंत्र २.५० कोटी रूपयांची तरतुद

शहरातील अद्याप कर संरचनेत नसणाऱ्या मिळकती, वापरात बदल झालेल्या मिळकती, वाढीव बांधकाम, नव्याने बांधकाम झालेल्या मिळकती, अनाधिकृत बांधकाम झालेल्या मिळकती व बांधकाम परवानगी नसलेल्या इमारतींचे एआय आधारीत तंत्रज्ञानचा वापर व जिओ मॅपिंग याद्वारे मिळकतीचे सर्वेक्षण, कर आकारणी करण्यासाठी स्वतंत्र २.५० कोटी रूपयांची तरतुद करण्यात आली आहे. शहरातील विविध ठिकाणी बांधकामात बदल, पार्किंगचा वापर , इतर बदला संदर्भात नागरिकांनी महापालिकेला माहिती द्यावी, असे आवाहन आयुक्त यांनी केले आहे.

# महापालिका परिवहनचे ५५.९२ कोटींचे अंदाजपत्रक

सोलापूर महापालिका अंतर्गत परिवहन उपक्रमाचा सन- २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा ५५ कोटी ९२ लाखाचा प्रशासकीय अंदाजपत्रकास महापालिका उपसमितीच्या सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आली.

महापालिका परिवहन व्यवस्थापकांनी पुढील मान्यतेसाठी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे आणि नगर सचिव कार्यालयाकडे सादर केले. स्थायी बैठकीत यावर चर्चा होऊन मंजूरी देत हा प्रस्ताव प्रशासकांच्या मान्यतेसाठी उपसमितीकडे पाठविण्यात आले. गुरुवारी उपसमितीच्या बैठकीत या अंदाजपत्रकाला मान्यता देण्यात आली.

सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये एकूण १५ ते २० बसेस धावलेले असून आजला बसेसची संख्या ही स्टॅगबस १५ आणि मिडी बस १५ असे एकूण ३० बसेस इतकी दाखविण्यात आली आहे. पुढील आर्थिक वर्षात सन-२०२५-२६ मध्ये याच ३० बसेस धावणार असल्याचे दाखवत त्यामधून उत्पन्नात वाढ होईल आणि प्रवाशांची सोय होणार असल्याचे नव्या अंदाज पत्रकात नमूद करण्यात आले आहे. यासाठी अंदाजपत्रक हे ५५ कोटी ९२ लाख १९ हजार ९६० इतके तयार करण्यात आले आहे.

गतवर्षी परिवहनचे अंदाजपत्रक हे ४९ कोटी ४५ लाख ९८ हजार १३० रुपयांचे होते. यामध्ये यंदा ६ कोटी ४६ लाख २१ हजार ८३० रुपये वाढविण्यात आले आहे. यापूर्वी महापालिकेकडून परिवहन विभागाला अनुदान स्वरूपात ३६ कोटी २९ लाख २३ हजार ७०३ रुपये मिळालेले आहे. शिवाय आता चालू आर्थिक वर्षात देखील महापालिकेकडून ४२ कोटी ४३ हजार ७६ हजार ८९८ रुपयांचे अनुदान अपेक्षित असल्याचे अंदाजपत्रकात नमूद करण्यात आले आहे. सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार टप्प्याटप्प्याने १९ बसेस मार्गावर धावून २.६० कोटी रुपये उत्पन्न मिळाले. सवलतीच्या पासेस मधून १६. ८० लाख, जाहिरात उत्पन्नातून २५. २९ लाख आणि रिझर्व बसेसमधून ४ लाख रुपये उत्पन्न मिळाले होते. मात्र उत्पन्नापेक्षा अनेक पटीने खर्च झाले.

### परिवहनला २५.९३ कोटींची देणी

| | |
|---|---|
| महापालिका वरिष्ठ श्रेणी सेवक सहकारी पतसंस्था | ४०. ८० लाख |
| महापालिका चतुर्थ श्रेणी सोसायटी | ४८. ५२ लाख |
| कर्मचारी ईएसआय | ३२. १५ लाख |
| शासकीय कर | १२. ६४ कोटी |
| व्यापारी देणी | २०. ९४ लाख |
| सेवानिवृत्त सेवकांचे प्रायव्हेडंट फंड रक्कम | ४. २१ कोटी |
| सेवेवरील सेवकांचे प्रायव्हेडंट फंड वर्गणी | ३. ४८ कोटी |
| वित्त सेवकांचे देय रक्कम / न्यायालयीन दाव्यातील व्याज | ३०. ०४ लाख |
| सेवानिवृत्त सेवकांचे देय रक्कम | २. ४१ कोटी |
| अपघात दाव्यातील रक्कम (१७ दावे) | ७५ लाख + व्याज |
| सेवानिवृत्त सेवकांचे वैद्यकीय व इतर देय रक्कम | ३३. १७ लाख |
| डिपॉझिट (सीएनजी पंप) | ३८ लाख |
| एकूण | २५. ९३ कोटी |

यंदा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात जमा बाजू मध्ये बसभाडे पासेसमधून ६ कोटी ५३ लाख ९५ हजार, जाहिरातीतून ३३ लाख ४५ हजार १४४, इतर मधून १ कोटी २१ लाख ४५ हजार १४४, महापालिका- शासन अनुदान ४२ कोटी ४३ लाख ७६ हजार ८९८ असे एकूण ५० कोटी ५२ लाख ६२ हजार २४२ रुपये धरण्यात आले आहे. शिवाय भांडवली जमा १ कोटी ३८ लाख ५७ हजार ७१८, ॲडव्हान्स व डिपॉझिट दुबेरीज ४ कोटी, आरंभी शिल्लक १ लाख असे एकूण ५५ कोटी ९२ लाख १९ हजार ९६० आणि खर्च बाजू मध्ये वाहतूक खर्च ४६ कोटी १४ लाख ९ हजार ९६०, सेंट्रल ऑटोमोबाईल खर्च- ४ कोटी २ लाख, भांडवली खर्च १ कोटी ७५ लाख १० हजार, ॲडव्हान्स व डिपॉझिट दुबेरीज ४ कोटी असे जमा एवढेच खर्च अंदाजपत्रकात नमूद करण्यात आले आहे.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ६ एप्रिलला दुपारी १२ वाजता होणार रामललाचा सूर्य टिळा

**शास्त्रज्ञांचे पथक अयोध्येत दाखल**

**दरवर्षी वाढत जाणार वेळ**



◆ **अयोध्या, २७ मार्च**

रामजन्मोत्सवाच्या दिवशी रामललाच्या सूर्य टिळाची तयारी पूर्ण झाली आहे. या रामनवमीपासून सलग २० वर्षे सूर्याची किरणे राम जन्मोत्सवाच्या मुहूर्तावर रामलालांना र्य टिळाने अभिषेक करणार आहेत. मंदिराच्या कळसापासून सूर्य किरणांना गर्भगृहात आणण्यात येणार आहे. यासाठी विशेष प्रकाराचे आरसे आणि लेन्स बसवण्यात आले आहेत. रुरकी येथील शास्त्रज्ञांची टिम अयोध्येत पोहचली आहे. त्यांनी सूर्य टिळासाठी उपकरणे बसविण्याचे काम सुरू केले आहे. पुढील १९ वर्षांसाठी सूर्य टिळाचा कालावधी दरवर्षी वाढणार असल्याचे मत शास्त्रज्ञांनी व्यक्त केले.

शास्त्रज्ञांच्या पथकाने यासाठी एक कार्यक्रम तयार केला आहे. यंदा रामजन्मोत्सवाचा उत्सव ६ एप्रिलला साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी दुपारी १२ वाजता रामलालाचा सूर्य टिळा होणार आहे. प्रत्येक रामनवमीला हा सूर्य टिळा रामलालाच्या कपाळावर दिसणार आहे. शास्त्रज्ञांनी याला 'सूर्य टिळा यंत्रणा' नाव दिले आहे. सेंट्रल बिल्डिंग रिसर्च इन्सिट्यूट, रुरकी येथील शास्त्रज्ञांच्या पथकाने ही सूर्य टिळा योजना अशा प्रकारे तयार केली आहे की प्रत्येक रामनवमीला दुपारी १२ वाजता, सूर्य किरण ७५ मिमीच्या वर्तुळाकार स्वरूपात भगवान रामाच्या मूर्तीच्या कपाळावर सुमारे तीन ते चार मिनटे येतील.

गियर आधारित सूर्य टिळा यंत्रणेत वीज, बॅटरी किंवा लोखंडाचा वापर केला जाणार नाही. आयआयटी रुरकीने सूर्य टिळासाठी एक विशेष ऑप्टो-मेकॅनिकल प्रणाली विकसित केली आहे. यामध्ये मंदिराच्या तिसऱ्या मजल्यावर बसवलेल्या आरशवर सूर्यकिरण पडतील. किरणांच्या या मार्गात एकामागून एक तीन लेन्स असणार आहेत. पितळी पाईपच्या सहाय्याने हे किरण रामलालांच्या कपाळावर पडणार आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### या मंदिरांमध्ये होतो सूर्य टिळा

सूर्य टिळा यंत्रणा आधीच काही जैन मंदिरांमध्ये आणि कोणार्क येथील सूर्य मंदिरात वापरली जात आहे. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या अभियांत्रिकी वापरल्या गेल्या आहेत. राम मंदिरातही अशीच यंत्रणा वापरली आहे, पण अभियांत्रिकी वेगळी आहे.

# आ. तानाजी सावंतांच्या अडचणी वाढणार?

**निवडणुकीत पैसे वाटप केल्याचा आरोप**

**राहुल मोटेंनी औरंगाबाद खंडपीठात दाखल केली याचिका**

**धाराशिव, दि. २७ मार्च -**

धाराशिव परांड्याचे आमदार तानाजी सावंत यांच्या विरोधात निवडणूक याचिका दाखल करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी आमदार राहुल मोटे यांनी तानाजी सावंत यांच्या निवडीला आव्हान दिलं आहे. औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखलकरण्यात आली आहे. याचिकेत नेमकं काय म्हटलय ते पाहूयात.

तानाजी सावंत यांनी मतदारांना आमिश दाखवण्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. तानाजी सावंत यांनी मतदारांना साडी, भांडी, पैसे वाटप केले आहे, याचे पुरावेही जोडले आहेत. याबाबत तानाजी सावंत यांना औरंगाबाद खंडपीठाने नोटीस बजावली आहे. भगीरथ कारखाना तानाजी सावंत यांचे बंधू शिवजी सावंत, क्रांती महिला उद्योग समूहाच्या अर्चना दराडे यांनाही नोटीस देण्यात आली आहे. दरम्यान, या निवडणुकीत परांडा विधानसभा मतदारसंघात पैशांचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्याची चर्चा आहे. तानाजी सावंत यांनी मतदारांना पैशांसह साडी, भांडी वाटप केल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. त्यामुळं आता सावंत यांच्याविरोधात माजी आमदार मोटे यांनी याचिका दाखल केली आहे.

# घड्याळ, धनुष्याची जिल्ह्यात अस्तित्वाची लढाई

## जिल्ह्यात नाही एकही आमदार; आता स्थानिक स्वराज्यसह सहकारामध्ये दाखवावे लागणार अस्तित्व

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

**जिल्ह्यात खासदारकी तर नाहीच पण सध्यस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील एकूण ११ विधानसभा मतदारसंघापैकी ५ मतदारसंघात भाजपाचे तर ५ मतदारसंघात शरद राष्ट्रवादीचे आणि एका मतदारसंघात शेकापचा आमदार आहे. पण अजितदादा राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे शिवसेनेचा एकही आमदार नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत विजयी झालेला नाही. त्यामुळे या दोन्ही पक्षांना जिल्ह्यात अस्तित्व टिकविण्यासाठी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकारी संस्थांमधील निवडणुकांमध्ये निकराची झुंज द्यावी लागणार आहे. अजित राष्ट्रवादीचे जिल्ह्यात सद्या दमदार नेतृत्व नाही तर शिंदे सेनेने यंदा तानाजी सावंत यांना मंत्रिमंडळात स्थान न दिल्यामुळे शिंदे सेनेतील वातावरण उत्साहाचे जाणवत नाही.**

एकत्र पक्ष असताना एकेकाळी सोलापूर जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला होता तर शिवसेनेचेही अनेक आमदार सोलापूर जिल्ह्यातून विजयी होत असत. दरम्यान गेल्या दोन-तीन वर्षांच्या कालावधीत शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्षामध्ये घडलेल्या महाभारतामुळे दोन्ही पक्ष मोठ्या प्रमाणावर फुटले. त्यामुळे दोन्ही राजकीय पक्षांची ताकत विखुरली गेली.

राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र असताना शरद पवार आणि विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादीचे क्रमांक एकचा पक्ष होता. जिल्ह्यात एक खासदार, पाच ते सात आम दार, महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायतींसह सहकारातील जिल्हा बँक, दूध संघ, बाजार समित्या, लेबर फेडरेशन आदीवर देखील राष्ट्रवादीचे वर्चस्व असायचे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी मंत्री दिलीप सोपल, बबनदादा शिंदे, राजन पाटील, संजयमामा शिंदे, पंढपूरचे परिचारक, करमाळयाचे बागल, लक्ष्मण ढोबळे, मनोहरभाऊ डोंगरे, बळीरामकाका साठे अशी दिग्गज मंडळी एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेसध्ये होते. परंतु राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांकडूनच पक्षांतर्गत गटबाजीला खतपाणी घालण्याचा प्रकार झाला. सन २००९च्या विधानसभा निवडणुकीपासून पक्षांतर्गत वादाचे स्वरुप मोठे झाले. मोहिते-पाटील यांच्यासह अनेकांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला नाईलाजास्तव राम-राम ठोकला. राष्ट्रवादीला काँग्रेसला मोठ्या प्रमाणात राजकीय उतरती कळा लागली.

दिड-दोन वर्षापूर्वी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत मोठे बंड झाले आणि पवारांचे पुतणे अजित पवार यांनी ४० आमदारांसह काका पवारांना धक्का दिला. विशेष म्हणजे अजित पवारांचा भाजपासोबतचा पहिला पहाटेच्या शपथविधीचा प्रयोग काकांच्या राजकीय दहशतीमुळे फसला होता. पण दुसऱ्या प्रयत्नात मात्र अजितदादा यशस्वी झाले. यावेळी मात्र अजितदादांना शिवसेना फोडून बाहेर पडलेल्या एकनाथ शिंदे यांच्याकडून प्रेरणाच मिळाल्याचे दिसून आले. कारण स्व. बाळासाहेब ठाकरेंची शिवसेनेत मोठा स्फोट झाला अन् एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांसह उद्दव ठाकरेंची साथ सोडली. भाजपासोबत सत्ता करून एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ पहावयास मिळाली. राजकीय वातावरण खूपच तापलेले होते.







एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनी केवळ पक्षच फोडला असे नव्हे तर पक्ष, चिन्ह आणि आमदार देखील नेले आणि त्यांना अधिकृत पक्ष म्हणून मान्यता देखील मिळाली. महाराष्ट्रातील दोन दिग्गज म्हणजे शरद पवार आणि उध्दव ठाकरे यांना मोठा राजकीय धक्का बसला. या धक्कातंत्रानंतर लोकसभेच्या निवडणुका २०२४ मध्ये झाल्या आणि शरद पवाराची राष्ट्रवादी, ठाकरेंची सेना आणि काँग्रेस या महाविकास आघाडीचे राज्यातील ४८ खासदारांपैकी ३१ खासदार विजयी झाले. भाजपासह शिंदे सेना आणि अजित राष्ट्रवादी यांच्या महायुतीला मोठा धक्का बसला. पक्ष फोडीचे राजकारण महाराष्ट्रातील जनतेला आवडले नसल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात रंगली. लोकसभेतील पराभवाच्या धक्क्यातून सावरत विधानसभा निवडणुकीत मात्र महायुतीने महाविकास आघाडीला मोठा धक्का दिला. राज्यातील २८८ आमदारांपैकी जवळपास २३०च्यावर आमदार विजयी करून महायुतीने महाराष्ट्रावर निर्विवाद सत्ता मिळवली. १३२ जागा जिंकलेल्या भाजपाचे देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले तर मुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री आणि नेहमीप्रमाणे अजित पवार हे उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. या विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यातील ११ जागांपैकी भाजपा ५, शरद राष्ट्रवादी ५ आणि शेकाप १ असे पक्षीय बलाबल विजयी झाले. अजित राष्ट्रवादी आणि शिंदे सेनेला मात्र भोपळा मिळाला. अजितदादा-एकनाथ शिंदे यांना सोलापूर जिल्ह्यात एकही आमदार विजयी करता आला नाही. त्यामुळे आता या दोन्ही पक्षांसमोर जिल्ह्यात राजकीय अस्तित्व टिकविण्याची वेळ आली आहे. शरद राष्ट्रवादीची कमान मोहिते-पाटलांच्या हातात असल्याने शरद राष्ट्रवादीची तुतारी जिल्ह्यात सुसाट आहे.

मात्र शिंदे सेनेची मोट मात्र ढिली पडत असल्याचे चित्र आहे. माजी मंत्री सोलापुरातील माढ्याचे नेते डॉ. तानाजी सावंत यांची शिंदे सेनेतून मंत्रीपदी वर्णी लागली नाही. त्यामुळे सावंत गटात निरुत्साह दिसून येतो आहे. तर शिंदे सेनेचे सरदार सध्या तरी कुठेही फ्रंटवर दिसत नाहीत. शिंदे मुख्यमंत्री असताना जिल्ह्यातील शिंदे सेनेत मोठा उत्साह होता तो दिसत नाही. आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेत दोन्ही पक्ष काय चमत्कार करतात का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. जिल्ह्यात सत्ताधारी महायुती का विरोधी महाविकास आघाडी बाजी मारणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

**प्रशांत माने**

**मो. ९८८११९१४४३**

### बाजार समिती निवडणूक म्हणजेच रंगीत तालीम

विधानसभा निवडणुकीनंतर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. सहकारी संस्थांमधील निवडणुकांमध्ये राजकीय पक्ष नव्हे तर स्थानिक आघाड्यांचे राजकारण अधीक चालते. सोलापूर भाजपमध्ये मात्र या निवडणुकीत देखील पक्षातंर्गत वादाची चुरस दिसून आली होती. यंदाच्या निवडणुकीत मात्र कोणत्या स्थानिक आघाड्या बाजी मारतात आणि कोणत्या राजकीय पक्षाचे लेबल बाजार समितीला लागते याच्याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. येत्या काही दिवसात बाजार समिती कोणाच्या ताब्यात हे कळणार आहे.

# खुपसंगीतील एकाची गळफास घेवून आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**मंगळवेढा दि. २७ मार्च**

खुपसंगी (ता.मंगळवेढा) येथील सुखदेव बिरा चौगुले (वय ५३) यांनी अज्ञात कारणावरुन लिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली. याची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे.





पोलीसांच्या माहितीनुसार यातील खबर देणारे नेमा नारायण चौगुले (रा.खुपसंगी) दि.२६ रोजी सकाळी ७.१५ वाजता खबर देणारे यांचे चुलतभाऊ तथा मयत सुखदेव चौगुले यांनी महादेव मेटकरी यांच्या शेतातील लिंबाच्या झाडाला अज्ञात कारणावरुन गळफास घेतला आहे. तुम्ही लवकर या असे खबर देणारा यांचा पुतण्या दयानंद चौगुले याने फोन करुन सांगितले. तत्काळ घटनास्थळी गेले असता सुखदेव चौगुले यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. उपस्थितांनी दोरी कापून खाली उतरवून उपाचाराकरिता त्यांना मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून उपचारापुर्वीच मयत झाल्याचे सांगितले. याचा अधिक तपास पोलीस हवालदार वैभव हाके (मो.९२७२९७२१५१) करीत असून या घटनेबाबत कोणाची शंका असल्यास त्यांनी तपास अधिकाऱ्यांना फोन करुन कळवावे, त्याचे नाव गुप्त ठेवले जाईल असे आवाहन करण्यात आले आहे.

# संशयाच्या वातावरणात मैत्रीला अडथळा

## बांगलादेशच्या राष्ट्रीय दिनी मोदींचे मोहम्मद युनूस यांना पत्र

▸ **नवी दिल्ली, २७ मार्च**

बांगलादेशाच्या राष्ट्रीय दिनाच्या निमित्ताने अंतरिम सरकारचे प्रमुख सल्लागार मोहम्मद युनूस यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पत्र लिहिले आहे. यात संशयाच्या वातावरणामुळे दोन्ही देशाच्या संबंधात अडथळा निर्माण झाला असून त्याला दूर करण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले. त्यांनी यावेळी १९७१ मध्ये बांगलादेशच्या स्वातंत्र्यासाठी दिलेल्या योगदानाचे महत्त्व अधोरेखीत करताना दोन्ही देशाचे संबंध मजबूत करण्यास प्रतिबद्धता व्यक्त केली.



बांगलादेशातील भारतीय उच्चायुक्तालयाने शेअर केलेल्या संदेशात पंतप्रधान मोदींनी शुभेच्छा देत म्हटले की, दोन्ही देशात एकमेकांविषयी असलेल्या चिंतेचा विचार केला जाईल आणि परस्पर संवेदनशीलतेवर आधारित संबंध पुढे नेण्यावर भर दिला जाणार आहे. बांगलादेश राष्ट्रीय दिन हा आपल्या सामायिक इतिहासाचा आणि त्यागाचा पुरावा आहे. या संबंधांनी आपल्या द्विपक्षीय भागीदारीचा पाया रचला आहे. बांगलादेशच्या मुक्ती युद्धाची भावना आपल्या संबंधांना मार्गदर्शन करत आहे. आपल्या लोकांना ठोस फायदे देत आहे. शांतता, स्थिरता आणि समृद्धीसाठी आपल्या सामायिक आकांक्षा आणि एकमेकांच्या हितसंबंध आणि चिंता याबाबत परस्पर संवेदनशीलतेच्या आधारावर ही भागीदारी आणखी विकसित करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत. आम्ही या भागीदारीला पुढे नेण्यासाठी प्रतिबद्ध आहोत. दरम्यान कट्टरपंथी आणि समाजविघातक घटकांनी ढाका येथील तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांच्या निवासस्थानावर हल्ला केला. या हल्ल्यापूर्वी शेख हसीना यांनी देश सोडला. त्यांना बहिणीसह भारतात आश्रय घ्यावा लागला. यानंतर देशात नोबेल पारितोषिक विजेते युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन करण्यात आले. तथापि, या काळात अल्पसंख्याक हिंदूंवरील हल्ल्यांच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. याबाबत केंद्र सरकारने बांगलादेशकडे तीव्र चिंताही व्यक्त केली होती. ◂(वृत्तसंस्था)

### बांगलादेश आला अडचणीत

अंतरिम सरकारचे प्रमुख सल्लागार मोहम्मद युनूस यांच्या काळातही अडचणी कमी झाल्या नाहीत. त्यांनीही प्रारंभी भारतविरोधी धोरण स्वीकारले होते. भारताशी संबंध खराब झाल्याचा फटका व्यापाराला बसला. तेथील कापड व्यवसाय डबघाईस आला असून कामगार आता रस्त्यावर उतरले आहेत. हजारो कारखाने बंद पडले आहेत. विजेचा पुरवठाही विस्कळीत झाला आहे. नागरिकांच्या मनात आता हंगामी सरकारविरोधातही रोष निर्माण होत आहे. ■

### पुतिन येणार भारत दौऱ्यावर; मोदींचे निमंत्रण स्वीकारले

**मॉस्को :** रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भारत भेटीचे निमंत्रण स्वीकारले असून ते लवकरच भारताच्या दौऱ्यावर येणार असल्याची माहिती रशियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री सर्गेई लावरो यांनी गुरुवारी दिली. रशियन आंतरराष्ट्रीय व्यवहार परिषदेद्वारे आयोजित रशिया आणि भारत नवीन द्विपक्षीय संबंध या विषयावर आयोजित परिषदेला संबोधित करताना लावरो म्हणाले, देशाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी पंतप्रधान मोदी यांचे भारत भेटीचे निमंत्रण स्वीकारले आहे. सध्या राष्ट्रध्यक्षांच्या भारत दौऱ्याची तयारी सुरू आहे. या भेटीमुळे दोन्ही देशांचे द्विपक्षीय संबंधाला चालना मिळणार असून धोरणात्मक भागीदारी भारतोसोबत अधिक विकसित होण्यास मदत मिळेल.

# रशियाने हल्ला केल्यास जोरदार प्रत्युत्तर देऊ

## युरोपियन संघाचा मॉस्कोला इशारा, युक्रेनवर ३० देशांची चर्चा



◆ **पॅरिस, २७ मार्च**

युक्रेन आणि युरोपात शांतता प्रस्थापित व्हावी, यासाठी युक्रेनमध्ये सशस्त्र दल तैनात करण्यावर युरोपियन संघ विचार करीत आहे. यावर ३० देश चर्चा करणार आहेत. जर या सशस्त्र दलावर रशियाने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्यास त्याला जोरदार प्रत्युत्तर देण्यात येईल, असा इशारा फ्रान्सचे अध्यक्ष इम्यॅन्युअल मॅक्रॉन यांनी दिला आहे.

गुरूवारी पॅरिसमध्ये परिषद होणार असून यामध्ये जवळपास ३० देश सहभागी होणार आहेत. यासंदर्भात मॅक्रॉन यांची युक्रेनचे अध्यक्ष झेलेनस्की यांच्यासोबत चर्चा झाली आहे. युरोप आणि परिसरात शांतता निर्माण व्हावी, यासाठी युक्रेनच्या काही महत्वाच्या शहरांमध्ये युरोपीयन देशांचे लष्कर तैनात केले जाऊ शकते. अशावेळी जर रशियाने हल्ला केल्यास त्याला आमच्याकडून जोरदार उत्तर देण्यात येईल, असा इशारा मॅक्रॉन यांनी दिला. आमचे सैनिक तैनात असताना हल्ला होण्याचा धोका दिसल्यास आणि पलीकडून काही आगळीक झाल्यास येथील सैन्य दल प्रमुखाच्या आदेशानुसार कारवाई करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

### फ्रान्स-ब्रिटनची युक्रेनसाठी धडपड

युक्रेनवर रशियाने पुन्हा हल्ला करू नये आणि शांतता प्रस्थापित व्हावी, यासाठी मॅक्रॉन आणि ब्रिटनचे पंतप्रधान केईर स्टार्मेर युरोपीयन देशांची आघाडी तयार करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. युक्रेनला सैन्य मदतीशिवाय अन्य मदतही पुरविण्याचे धोरण युरोपीयन संघातील काही देशांनी स्वीकारले आहे. युक्रेनमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करणे, हेच आमचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे मॅक्रॉन म्हणाले. ■

### अमेरिकेला रस नाही

युक्रेनमध्ये सैन्य तैनात करण्याच्या धोरणाला अमेरिकेने विरोध दर्शविला आहे. सध्या या गोष्टीची गरज नाही. तसेच यामुळे फार काही हाती लागेल, असे वाटत नाही, असे अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ यांनी एका मुलाखतीत सांगितले. विशेष म्हणजे अमेरिकेने रशिया-युक्रेन युध्द संपावे, अशी भूमिका घेतली आहे. ■

### ७५ हजार युक्रेनी सैन्याला देणार प्रशिक्षण

मॅक्रॉन आणि झेलेन्स्की यांची युक्रेनबाबत दीर्घकालीन योजना आहे. युक्रेनमध्ये तैनात होणारे युरोपीयन सैन्य युक्रेनच्या ७५ हजार सैन्याला युद्धाचे प्रशिक्षण देणार आहे. विशेष म्हणजे युक्रेनबाहेर काही ठिकाणी युक्रेनच्या जवानांना युद्धसज्ज करणे सुरू केले आहे. एवढेच नव्हे तर युक्रेनभोवती पोलादी कडे उभारण्यावर २७ युरोपीयन देश विचार करीत आहेत. जे कडे रशिया भेदू शकणार नाही. ■

## पूर्वोत्तर राज्याचा संगीत, नृत्याविष्कार



सोलापूर : ह.दे.प्रशालेच्या मैदानावर पूर्वोत्तर राज्याचा संगीत,नृत्याविष्कर हा सांस्कृतिक कार्यक्रम सुरू आहे. त्रिपुरातील होजागिरी नृत्य सादर करतानाचे गुरुवारी टिपलेले छायाचित्र. (छाया : केवल तिवारी)

## अग्रलेख...

# ‘स्वच्छ भारता’चे अस्वस्थ वर्तमान!

दूरचित्रवाणी वाहिनीवरील सेक्रड गेम्स नावाच्या एका मनोरंजन मालिकेत नवाजुद्दीन सिद्दीकीची भूमिका केलेल्या गायतोंडे नावाच्या पात्राच्या तोंडी असलेला एक संवाद मध्यंतरी प्रचंड गाजला. कचऱ्याच्या ढिगातून उभारलेल्या संपत्तीवर लोळणाऱ्या या कचरा माफियाने दहशतीच्या, राजकारणातील करामतींच्या माध्यमातून आपले साम्राज्य उभे केले आणि कचऱ्यातून संपत्ती मिळविण्याच्या धंद्यातील अनेक गूढ कंगोऱ्यांची उकल केली. शहरांमध्ये प्रचंड प्रमाणात साठणाऱ्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाचा प्रश्न सामान्य माणसाला नेहमीच छळत असतो. घराघरांमध्ये साठणारा कचरा म्हणजे उपयोगिता संपुष्टात आल्यामुळे टाकाऊ ठरलेली वस्तू अशीच सर्वसामान्य माणसाची समजूत असल्याने त्या वस्तूला काडीचीही किंमत नाही, असे मानले जात असताना कचऱ्याच्या कंत्राटाच्या जोरावर आपले साम्राज्य उभे करणाऱ्या या गायतोंडे नावाच्या पात्रास कधी कधी आपण म्हणजेच परमेश्वर असल्याचा भास होत असतो. घनकचरा व्यवस्थापनाच्या कंत्राटातून या धंद्यावर वर्चस्व मिळविण्याच्या एका संघर्षाची ही कहाणी ज्यांनी पाहिली आहे, त्यांना या धंद्यात लपलेल्या धनाच्या राशीचे गुपित समजू शकेल. कदाचित म्हणूनच, आता जेव्हा जेव्हा घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित बातम्यांतून या समस्येची सामान्यांना समजेल एवढीच बाजू समोर येते, तेव्हा त्यामागे काही राजकारण किंवा आर्थिक हितसंबंधदेखील गुंतलेले नाहीत ना, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो.

महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरातील शहरे, महानगरांतील घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाचा मुद्दा सातत्याने समोर येत असतो. ही समस्या म्हणजे शहरांच्या आरोग्यासाठी धोक्याची घंटा असल्याने, घनकचरा गोळा करून त्याची वेळीच विल्हेवाट लावण्याचे आरोग्याच्या दृष्टीने असलेले महत्त्व सर्वसामान्यांना चांगलेच कळते; त्यामागील अर्थकारण आणि धंद्याचे महत्त्व मात्र काही मोजक्यांनाच माहीत असते. महाराष्ट्राच्या २६ शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घनकचरा व्यवस्थापनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यात संपूर्ण अपयश आल्याचा थेट ठपका नियंत्रक व महालेखाकारांनी आपल्या अहवालात ठेवल्याने, घनकचरा व्यवस्थापनाच्या धंद्याला पुन्हा एकदा संशयाचा वास येऊ लागला आहे. घनकचऱ्याचे विघटन करून त्याची विल्हेवाट लावण्यात किंवा त्यावर प्रक्रिया करण्यात महाराष्ट्राच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था संपूर्ण अपयशी ठरल्या आहेत, असे हा अहवाल नमूद करतो. २०१६-१७ ते २०२१-२२ या सहा वर्षांत शहरी भागांत उघड्यावर साठलेल्या तब्बल ३४ लाख टन घनकचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे, असे या अहवालात म्हटले आहे. खरे म्हणजे, कचऱ्यापासून खत निर्मिती आणि वीज निर्मिती करून कचऱ्याचे सोने करण्याची कला अलिकडच्या विज्ञानास प्राप्त झाली आहे आणि अनेक नागरी स्थानिक स्वराज्य संस्था कचऱ्यापासून वीज निर्मिती किंवा खत निर्मिती करण्याबाबत सातत्याने चर्चा करीत आहेत. तथापि, कचऱ्यात दडलेल्या या ऊर्जेचा उपयोग करून त्याला मानवहिताची दिशा दाखविण्याबाबत मात्र फारशी उत्सुकता दाखविली जात नसल्याने जमिनीचा आणि पाण्याचा दर्जादेखील खालावल्याच्या गंभीर प्रश्नाकडे या अहवालाने अंगुलिनिर्देश केला आहे. मानवी वस्ती जसजशी विस्तारत जाते, तसतशी उपलब्ध जागेची टंचाईही वाढत जाते. वस्तीचा अनिर्बंध विस्तार होऊ लागला की, नागरी सुविधांवर ताण पडून अशा समस्या निर्माण होतात. उपयोगमूल्य नसलेल्या वस्तूंना टाकाऊ पदार्थ समजून त्या फेकून दिल्या गेल्या की, त्या वस्तूचे कचऱ्यात रूपांतर होते. यापैकी निम्म्याहून अधिक कचऱ्याचा पुनर्वापर करता येत नसल्यामुळे तो फेकूनच द्यावा लागतो. त्याची योग्य विल्हेवाट न लागल्यास तो अपायकारकही ठरतो. असा कचरा तात्पुरता किंवा दीर्घकाळ टिकणारा असल्याने, त्याचे योग्य विभाजन करून विल्हेवाट लावण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था बहुधा कंत्राटदारांचीच नियुक्ती करतात. या कचऱ्यातील टाकाऊ वस्तूंचे मोल ओळखून त्याचा धंदा करणाऱ्या टोळ्यांमधील संघर्षाच्या कहाण्या प्रसार माध्यमांतून मनोरंजनात्मक रूपे घेऊन साकारू लागल्याने, घनकचरा व्यवस्थापनामधील दिरंगाईमागेही काही धोरणे लपलेली असावीत का, अशी शंका सामान्यांच्या मनात घर करू लागली आहे. नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यामागील राजकारणाचे अनेक कंगोरे आजकाल सामान्यांना माहीत झालेले आहेत. शहरांमधील रस्त्यांवर वर्षागणीक खड्डे कसे पडतात आणि ते बुजविण्यासाठी वर्षागणीक कोट्यवधींची कंत्राटे का दिली जातात, यामागील राजकारण आणि अर्थकारण हे आजकाल गुपित राहिलेले नाही. तंत्रज्ञान आणि विज्ञानाने अचाट प्रगती केलेली असतानाही, रस्त्यावरील खड्ड्यांची समस्या कायमस्वरूपी निकाली काढण्यात स्थानिक स्वराज्य संस्थांना यश येत नाही की त्यामध्ये रसही नसतो, याची उत्तरे आता फारशी अनाकलनीय राहिलेली नाहीत. कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न अशाच अर्थकारणाशी जोडला गेला असावा का, असा संशय करमणुकीच्या निमित्ताने लोकांचे मनरंजन करण्यासाठी रचलेल्या कथानकांमुळे अलिकडे बळावू लागला आहे. कचरा ही भारतासमोरील सर्वाधिक वेगाने वाढणारी समस्या आहे, असा निष्कर्ष ‘नेचर’ नावाच्या एका प्रतिष्ठित नियतकालिकाने काढला होता. अर्थात, भारतीयांस या समस्येची चांगलीच ओळख असल्याने या निष्कर्षामुळे कोणासही फारसा धक्का वगैरे बसला नव्हता. कदाचित त्यामुळेच डोळ्यादेखत दिवसागणीक फोफावणाऱ्या या समस्येचे गांभीर्य जनतेसही जाणवले नसावे आणि शहरांचे नियोजन करणाऱ्या यंत्रणांनाही या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची गरज वाटली नसावी. कदाचित त्यामुळेच पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर लाल किल्ल्यावरून केलेल्या आपल्या पहिल्याच भाषणात नरेंद्र मोदी यांनी स्वच्छतेचा नारा दिला, तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या. कचरा ही लाल किल्ल्यावरून उल्लेख करण्याएवढी मोठी बाब आहे का, असा प्रश्नही अनेकांना पडला, पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष करून ‘स्वच्छ भारत’सारख्या मोहिमेस बळ दिले. ती एक लोकचळवळ व्हावी, यासाठी कार्यक्रमही आखला. आता नागरिकांची मानसिकता बदलत असून, कचरा निर्माण करण्यातील निर्ढावलेपणा हळूहळू कमी होत असल्याचे स्पष्ट होऊ लागले. असे असले, तरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उदासीनतेचे काय करायचे, हा प्रश्न नियंत्रक व महालेखाकारांनी अहवालातून उजेडात आणलेल्या वास्तवामुळे ठळक झाला आहे. राज्यातील ३४ शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यात घातक अशा जैविक कचऱ्याचाही समावेश असल्याचे उघड झाले आहे, तर २४ शहरांमध्ये गोळा होणाऱ्या घनकचऱ्यात इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या कचऱ्याची भर पडली आहे. ६४ टक्के स्थानिक स्वराज्य संस्थांकडे तर घराघरातील रोजचा कचरा गोळा करण्याची यंत्रणा तोकडी आहे, त्यामुळे ४१ टक्के कचरा गोळादेखील केला जात नसल्याचा धक्कादायक निष्कर्ष या अहवालाने काढला आहे. असा कचरा बिनदिक्कतपणे उघड्यावर फेकला जात असल्याने शहरांचे विद्रूपीकरण होतेच; पण त्यापासून निर्माण होणाऱ्या विषारी वायूमुळे होणारे प्रदूषण हीदेखील एक गंभीर समस्या ठरते. शहरीकरणाचा वेग वाढत असल्याने नागरी भागात मोठ्या प्रमाणावर बांधकामे सुरू असतात. त्यापासून निर्माण होणाऱ्या राडारोड्याचे व्यवस्थापन तर होतच नसावे, अशी शंका अहवालाने दिलेल्या आकडेवारीमुळे उपस्थित होत आहे. आता समोर आलेल्या वास्तवाची गंभीर दखल घेऊन नागरी प्रशासन यंत्रणांनी घनकचरा व्यवस्थापनाचे व्यापक धोरण आखण्याची गरज अधोरेखित झाली आहे. कार्यक्षमता सिद्ध करा अन्यथा बाजूला व्हा, असा एक खणखणीत इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला होता. आता त्याची आठवण करून देण्याची वेळ आली आहे. कारण, केवळ सहा वर्षांत ३४ लाख टन घनकचरा केवळ २६ शहरांमध्ये उघड्यावर जमा होत असेल, तर त्याच्या व्यवस्थापनातील उदासीनता हेच महत्त्वाचे कारण असू शकते. अशा समस्या जेव्हा वर्षागणीक गंभीर होत जातात, तेव्हा कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्हे उमटणे साहजिक असते. पंतप्रधानांचा तो इशारा कदाचित संबंधितांच्या विस्मरणात गेला असेल, पण समस्यांचे वास्तव समोर आल्यानंतर सामान्य माणसास मात्र तो नक्कीच आठवला असेल, यात शंकाच नाही.

## पैलू

**प्रा. डॉ. विजयकुमार पोटे**

# गुन्हेगार राजकारणी वाढले जोमाने!

राज्यघटनेने ठरवून दिलेल्या तीन प्रमुख मंडळांमध्ये कायदेमंडळ हे महत्त्वाचे मंडळ आहे. देशात कायदे करण्याची जबाबदारी या मंडळावर असते. संसदेत खासदार तर विधिमंडळात आमदारांवर कायदे करण्याची जबाबदारी असते. असे लोकप्रतिनिधी अभ्यासू, सुशिक्षित आणि निष्कलंक असायला हवेत; परंतु सध्याची परिस्थिती पाहता किती लोकप्रतिनिधी वर उल्लेख केलेल्या तीन निकषांमध्ये मोडतात, असा प्रश्न पडतो. गुन्हेगारी रोखण्यासाठी कायदे करणारेच गुन्हेगारीच्या विळख्यात अडकत चालले आहेत. लोकप्रतिनिधी पूर्वी गुन्हेगारांची मदत घेण्यासही कचरत होते. नंतर ते गुन्हेगारांची गोपनीय मदत घ्यायला लागले. आता तर गुन्हेगारी पृष्ठभूमी असलेल्या लोकप्रतिनिधींची संख्या वाढत असून ही चिंताजनक बाब आहे. ‘असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स’ (एडीआर) च्या नवीन अहवालातील आकडेवारी धक्कादायक आहे. देशातील २८ विधानसभा आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधील एकूण ४१२३ आमदारांपैकी ४५ टक्के आमदारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. आंध्र प्रदेशमधील ७९ टक्के आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. निवडणुकीच्या वेळी या आमदारांनी दाखल केलेल्या शपथपत्रांच्या आधारे ही ‘एडीआर’ने हा निष्कर्ष काढला आहे. देशातील बहुतेक राज्यांमध्ये गुन्हेगारी पृष्ठभूमीचे आमदार आहेत. त्यांची टक्केवारी ४५ पर्यंत आहे. त्यांच्यावर खून किंवा खुनाचा प्रयत्न, अपहरण, महिलांसोबत गैरवर्तन यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

देशात ४०२९ आमदारांवर फौजदारी खटले प्रलंबित असतील, तर ती अत्यंत गंभीर बाब आहे. अर्थात हे पहिल्यांदाच घडत आहे, असे नाही. उमेदवारांना त्यांच्याविरुद्ध दाखल झालेले गुन्हे निवडणूक शपथपत्रात जाहीर करणे बंधनकारक करण्यात आल्यापासून समोर येणारे गुन्ह्यांचे आकडे सतत वाढत आहेत. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे अशा आमदारांची संख्या वाढत आहे असे नाही, तर लोकसभेतही ही संख्या सातत्याने वाढत आहे. एका आकडेवारीनुसार, लोकसभेच्या ५४३ सदस्यांपैकी २५१ सदस्यांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. म्हणजे गुन्हेगारी नोंदी असलेल्या लोकसभा सदस्यांची संख्या जवळपास निम्मी आहे. सत्ताधारी असो वा विरोधी पक्ष; सर्वच पक्षांच्या आमदारांचा आणि खासदारांचा त्यात समावेश आहे. सर्व पक्षांकडे ४५ ते ६६ टक्के आमदार गुन्हेगारी पृष्ठभूमीचे आहेत. यामध्ये आंध्र प्रदेश देशात अव्वल ठरले आहे. तिथे ८० टक्के आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. हीच परिस्थिती तेलंगणामध्ये आहे. गुन्हेगारी पृष्ठभूमी असलेले ६९ टक्के आमदार आहेत. यात निम्म्याहून अधिक गंभीर प्रकरणे आहेत. बिहार ६६ टक्के, महाराष्ट्र ६५ टक्के आणि तामिळनाडूमध्ये ६९ टक्के आमदार ‘दागी’ आहेत.

अलिकडे आणखी एक प्रश्न उपस्थित केला जात होता. न्यायालयाने शिक्षा दिली असलेल्यांना भविष्यात आयुष्यभर निवडणूक लढवण्यास बंदी घालावी, अशी मागणी होत होती. मात्र केंद्र सरकारने हे ही मान्य केले नाही. आतापर्यंत कोणत्याही गुन्ह्यात न्यायालयाने दोन वर्षांपेक्षा अधिक शिक्षा दिल्यास किमान सहा वर्षे निवडणूक लढवण्यास अपात्र घोषित केले जाईल, अशी तरतूद आहे. न्यायालयाने शिक्षा दिली असलेली व्यक्ती पक्षाची पदाधिकारीही होऊ शकत नाही. पक्ष आणि संसदीय नियमावली वेगवेगळ्या असतात. ‘असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स’ (एडीआर) ने २८ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधील ४०९२ आमदारांच्या निवडणुकीच्या वेळी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण करून ही माहिती गोळा केली आहे.

‘एडीआर’नुसार, देशातील विविध राज्यांमधील विद्यमान आमदारांकडे एकूण ७३ हजार ३४८ कोटी रुपयांची संपत्ती आहे. ही संपत्ती नागालँड, त्रिपुरा आणि मेघालय या ईशान्येकडील तीन राज्यांच्या एक वर्षाच्या एकत्रित अर्थसंकल्पाच्या समतुल्य आहे. सर्वाधिक अब्जाधीश आमदार आंध्र प्रदेशातील असून १७४ पैकी २७ आमदार अब्जाधीश आहेत. १०७ आमदारांकडे १०० ते ५०० कोटी रुपयांची संपत्ती असून १० लाख रुपयांपेक्षा कमी संपत्ती असलेले ६५ आमदार आहेत. भाजपा आमदारांकडे २६ हजार २७० कोटी रुपयांची संपत्ती आहे. इथेही भाजपा आघाडीवर आहे. सिक्कीममध्ये ३२ पैकी फक्त एका आमदारावर गुन्हा दाखल आहे.

पक्षनिहाय विश्लेषणानुसार, चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगु देसम पक्षाच्या (टीडीपी) १३४ आमदारांपैकी ८६ टक्के म्हणजे ११५ आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. याशिवाय ६१ टक्के म्हणजेच ८२ आमदारांवर गंभीर आरोप आहेत. सुमारे ३९ टक्के (१,६५३ पैकी ६३८) भाजपा आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी ४३६ जणांवरील आरोप गंभीर आहेत. काँग्रेसच्या ६४६ आमदारांपैकी ५२ टक्के (३३९) जण गुन्हेगारी पृष्ठभूमीचे असून १९४ आमदारांवर गंभीर आरोप आहेत. तामिळनाडूच्या सत्ताधारी द्रमुकच्या ७४ टक्के (१३२ पैकी ९८) आमदारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. त्यात ४२ गंभीर आरोपांचा समावेश आहे. तृणमूल काँग्रेसच्या सुमारे ४१ टक्के (२३० पैकी ९५) आमदारांवर गुन्हे दाखल असून ३४ टक्के म्हणजेच ७८ जणांवर आरोप गंभीर आहेत. त्याचप्रमाणे आम आदमी पक्षाच्या (आप) १२३ आमदारांपैकी ६९ (५६ टक्के) आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. यापैकी ३५ जण (२८ टक्के) गंभीर आरोपांचा सामना करतात.

५४ आमदारांवर खुनाचे, २२६ आमदारांवर खुनाच्या प्रयत्नाचे, १२७ आमदारांवर महिलांशी गैरवर्तनाचे गुन्हे दाखल आहेत. देशातील प्रत्येक तिसऱ्या आमदारावर खून किंवा बलात्कारासारख्या गुन्ह्याचा आरोप आहे. देशातील ११९ आमदार अब्जाधीश आहेत. यामध्ये आंध्र प्रदेशमधील सर्वाधिक १६ टक्के (२७), कर्नाटकमधील १४ टक्के (३१), महाराष्ट्रातील सहा टक्के (१८), तेलंगणामधील सहा टक्के (७), हरयाणामधील सहा टक्के (५), अरुणाचल प्रदेशमधील पाच टक्के (३) आणि दिल्लीतील ४ टक्के (३) आमदारांची संपत्ती १०० कोटींहून अधिक आहे. कर्नाटकमधील २२३ आमदारांची एकूण संपत्ती १४ हजार १७९ कोटी रुपये इतकी आहे तसेच महाराष्ट्रातील २८६ आमदारांकडे १२,४२४ कोटी तर आंध्र प्रदेशमधील १७४ आमदारांकडे मिळून ११,३२३ कोटींची संपत्ती आहे. त्रिपुराच्या ६० आमदारांकडे मिळून ९० कोटी रुपये आहेत. तेलुगु देसम पक्षाच्या १३४ आमदारांची एकूण संपत्ती ९,१०८ कोटी रुपये, ६४ अपक्ष आमदारांची एकूण मालमत्ता २,३८८ कोटी रुपये, शिवसेनेच्या ५९ आमदारांची एकूण मालमत्ता १७,७५८ कोटी रुपये तर द्रमुक आमदारांची एकूण मालमत्ता १,७५८ कोटी रुपये आहे.


## वेध

**संजय रामगीरवार**

# थकित वेतनाच्या भाराने पिचल्या ‘अभियांत्रिकी’ संस्था!

विदर्भातील कित्येक खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी त्यांच्या थकित वेतनासाठी न्यायालयात गेले आहेत. एकट्या चंद्रपूरच्या ‘आरसीईआरटी’च्या वेगवेगणघा याचिका दाखा आहेत. त्यातील एक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची तर तीन प्राध्यापकांच्या आहेत. आजघडीस तब्बल ९० कोटींचा दावा त्यातून करण्यात आला आहे. वर्धेच्या ‘बीडीसीओई’ महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या अशाच याचिकेचा निकाल लागला असून सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार वेतन व थकित देण्याचे बंधन महाविद्यालयावर आहे. गोंदियातील मनोहरभाई पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाला त्यांच्या कर्मचाऱ्यांचे जवळपास ६० ते ६५ कोटींचे थकित वेतन देण्याचा आदेश झाला आणि या एकमेव महाविद्यालयाने हे पैसे कर्मचाऱ्यांना दिलेसुद्धा; त्यानंतर लगेच महाविद्यालय बंद करून तेथे शाळा उघडली. नागपूरचे ‘एलटीजेएसएस’ महाविद्यालयाच्या चार प्राध्यापकांना अशाच खटल्यात न्याय मिळाला. आणखी नऊ जण कोर्टात आहेत.

जवळपास ३० वर्षांपूर्वी मोजक्याच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या मांदियाळीत काही खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांचा समावेश झाला. अल्पावधीत त्यांना पसंतीही मिळाली. त्यामुळे राज्यात अशा ३५० पेक्षा जास्त खाजगी महाविद्यालयांना अचानक पेव फुटले. अतिउत्साही संस्थाचालकांनी एकीकडे प्राध्यापक व कर्मचाऱ्यांची बोळवण केली तर दुसरीकडे शिक्षण शुल्क समितीचीही दिशाभूल केली. प्रतिविद्यार्थी अधिकचा खर्च दाखवून शुल्क वाढवून घेतले; प्रत्यक्षात कर्मचाऱ्यांना कमी वेतन दिले. असा हा उद्योग अव्याहत सुरू राहिला.




तेव्हा या संस्थाचालकांना हे कळलेच नाही की, शिक्षण शुल्क समितीला खरी परिस्थिती विशद केली असती तर प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या हक्काचे वेतन गृहीत धरूनच शुल्क निश्चिती झाली असती. पण लाभाच्या हव्यासापोटी असेच चालत राहिले आणि मग जेव्हा प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी आवाज उठवला तेव्हा संस्थाचालकांना आपल्या खिशातून पैसे देणे कठीण झाले. कारण ही रक्कम एव्हाना कोट्यवधींच्या घरात गेली होती. शेवटी हात वर करण्यापलीकडे त्यांच्याकडे मार्गच उरला नाही आणि मग महाविद्यालये बंद करण्याची भाषा झाली. त्यावरही न्यायालयाने फटकारले. औरंगाबादच्या ‘जेएनईसी’ महाविद्यालयाचे प्रकरण असेच आहे. कॉलेज बंद करायचा पर्याय थकित वेतन न देण्याचे ‘टुल’ म्हणून वापरू नका, असे न्यायालयाने म्हटले.

एआयसीटीई आणि राज्य शासनाचा तंत्र शिक्षण विभाग गेल्या तीन दशकांपासून हे स्पष्टपणे सांगत आले की, खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी, औषधी निर्माण व व्यवस्थापन अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राध्यापकांना शासन नियमानुसार वेतन दिले पाहिजे. याचाच आधार घेत बऱ्याच महाविद्यालयांतील प्राध्यापक व कर्मचारी न्यायालयात दाद मागत आहेत. असे जवळपास २८० याचिका राज्यभरात प्रलंबित आहेत. नव्याने तयार झालेल्या खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयाने मात्र यावर उपाय शोधत आपल्या प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे ‘अप्रुअल’च घेतले नाही. ‘अप्रुअल’ घेतल्याशिवाय त्यांची याचिका टिकत नाही, हे त्यांना माहीत होते.

चंद्रपूरच्या ‘आरसीईआरटी’ महाविद्यालयातील कर्मचारी व प्राध्यापकांच्या अशाच मुद्द्यांवर तीन प्रकरणे उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सुरू आहेत. त्यापैकी दोन प्रकरणांत न्यायालयाने तंत्र शिक्षण संचालक कार्यालयाला २००६ पासून २०१६ व २०१६ पासून २०२२ असे १६ वर्षांचे सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या निकषानुसार किती वेतन देय आहे व महाविद्यालयाने किती दिले, वेतनातील फरक किती असा सर्व हिशेब मागितला असून दोन याचिकाकर्त्यांचे एकूण थकबाकीचे आकडे न्यायालयाला व संबंधितांना दिले गेले आहेत. याचिकाकर्त्यांचे म्हणणे असे आहे की, जे वेतन महाविद्यालयाने ठरवले होते तेदेखील २०१७ पासून पूर्णपणे दिलेले नाही. दरवर्षी कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील आयकर भरायचे आणि शिक्षण शुल्क समितीला असे दाखवायचे की, पूर्ण वेतन दिले आहे. अशा या ‘मॉडल’वर राज्यातील अनेक खाजगी विनानुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांचा डोलारा उभा आहे. एक एक करून अनेक महाविद्यालयांचे कर्मचारी जेव्हा न्यायालयात जातील, तेव्हा हा प्रचंड मोठा आर्थिक भार घेऊन या संस्था जगतील कशा, हा कळीचा मुद्दा आहे.

९८८१७१७८३२

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# ‘बुलडोझर’भाऊ फडणवीस

दंगल सांगून होत नाही. नागपुरात तर होऊच शकत नाही, या मुद्यावर सारे बिनधास्त होते. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस ज्या गावचे आहेत त्या नागपुरात दंगल कशी होऊ शकते? पण झाली. विचित्र मानसिकता आहे. एकीकडे अंतराळात नऊ महिने अडकलेल्या महिलेला सुखरूप परत आणल्याचे आपण पाहतो तर दुसरीकडे काही माणसे थडग्याखाली अस्मिता शोधत आहेत, हेही दुदैवाने आपल्याला पाहावे लागते. १७ मार्चच्या रात्री दगा झाला. शांतताप्रिय नागपूरला बट्टा लागला. तब्बल चार तास जुन्या नागपूरच्या काही भागात राडा चालला. ११ पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांना संचारबंदी लावावी लागली. यावरून दंगलीची भयावहता लक्षात यावी. पोलिसांनी दगड खाल्ले. मात्र दंगल पसरू दिली नाही याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे. दंगल पूर्वनियोजित होती, असे फडणवीसांनी म्हटले. त्यावरून विरोधकांनी त्यांना टार्गेट करू पाहिले. झोपा काढता काय? म्हणाले. काहींनी हे गुप्तचर यंत्रणेचे अपयश असल्याचे म्हटले. पोलिसांनी शंभरांवर दंगलखोरांना अटक केली आहे. सीसीटीव्हीच्या आधाराने आणखी दंगेखोरांची ओळख शोधली जात आहे. या दंगलीचे घाव फडणवीसांच्या जिव्हारी लागले. साहजिक आहे. या दंगलीने बरेच काही शिकवले आहे. फडणवीसांनी तर तिसरा डोळा उघडला. दंगलीत झालेल्या नुकसानीची भरपाई दंगलखोरांची संपत्ती विकून केली जाईल, बुलडोझर फिरवला जाईल, असे फडणवीसांनी जाहीर केले. लगेच या दंगलीचा सूत्रधार फहीम खान याच्या घरावर महापालिकेने बुलडोझर फिरवला. अशा प्रकारची कारवाई उत्तर प्रदेशात पाहायला मिळते. तिकडे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ दंगेखोरांच्या घरावर बुलडोझर फिरवतात. त्यामुळे त्यांना ‘बुलडोझरबाबा’ म्हटले जाते. पण नागपुरात प्रथमच बुलडोझर चालला. हिंसाचारी दंगेखोरांना अद्दल घडावी, पुन्हा हातात दगड घेण्याची त्यांची हिंमत होणार नाही यासाठी असले इंजेक्शन जरूरी होते. पण त्यावरही विरोधकांनी गळे काढले. एवढेही करायचे नाही तर नेमके करायचे काय? एक लक्षात घ्या. हा बुलडोझर फहीमच्या घरावर चालला नाही, दंगेखोरांच्या मानसिकतेवर चालला आहे. यापुढे दंगा करताना दंगेखोर हजार वेळा विचार करतील. फडणवीसांना कुणी ‘चाणक्य’ म्हणून ओळखतो तर कुणी धर्मयोद्धा म्हणून तर कुणी कुशल प्रशासक देवाभाऊ म्हणून अभिमानाने त्यांच्याकडे पाहतो. फडणवीसांच्या बायोडाटामध्ये एक नवी ओळख जमा झाली आहे ती म्हणजे बुलडोझरबाबा.




राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पी अधिवेशनाचे बुधवारी सूप वाजलं. सद्यस्थितीत सरकारच्या खजिन्यावर ताण आला आहे. त्यामुळे अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्याकडून फार अपेक्षा नव्हती. मात्र आहे त्या स्थितीत त्यांनी समतोल बजेट दिले आहे. त्यामुळे विरोधी पक्षालाही फारशी टीका करायची संधी मिळाली नाही. विरोधकांची मोठी विचित्र अवस्था आहे. त्यांच्याकडे पुरेसे संख्याबळ नाही. आहेत त्या आमदारांनाही सरकारला कोंडीत पकडणे जमत नाही. एकेकाळी एक से एक दबंग आमदार विरोधी बाकांवर दिसायचे. एकटे छगन भुजबळ सारे सभागृह दणाणून सोडायचे. सध्या विरोधकांना संख्याबळ अनुकूल नाही. जे आहेत त्यातही काही कुंपणावर आहेत. लढणार कोण? जे मुद्दे विरोधकांनी लढायचे ते मुद्दे घेऊन महायुतीचे आमदारच लढताना अनेक वेळा दिसले. सुधीर मुनगंटीवार हे भाजपाचे ज्येष्ठ नेते. सध्या मंत्री नाहीत. पण त्यांनी मांडलेल्या विषयांना सामोरे जाताना मंत्र्यांना घाम फुटला होता. विरोधकांची ‘स्पेस’ सत्ता पक्षाच्या आमदारांनी खाल्ली, असे म्हणता येईल. यावेळी फडणवीसांनी विरोधकांच्या हाती कुठलेही हत्यार राहू दिले नव्हते. बीड जिल्ह्यातले सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मीक कराडला मकोकामध्ये घेऊन फडणवीसांनी विरोधकांची नखंच काढून टाकली. अजितदादांच्या राष्ट्रवादीचे वादग्रस्त मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेऊन विरोधकांची तोंडं बंद केली. बोलणार काय? शेतकरी आत्महत्या, शेतकरी कर्जमाफी, कायदा आणि सुव्यवस्था हे नेहमीचे विषय विरोधकांनी चालवले. सरकारला घेरताना विरोधकांचीच दमछाक सुरू होती. संपूर्ण अधिवेशन काळात सत्ता पक्षच जोरात दिसला. महाआघाडीमध्ये शिवसेनेकडे सर्वाधिक म्हणजे २० आमदार आहेत. त्या हिशोबाने विधानसभेतलं विरोधी पक्षनेतेपद मिळावे, अशी उबाठा म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा आग्रह होता. त्यासाठी ज्येष्ठ आमदार भास्कर जाधव यांचे नावही महाआघाडीच्या वतीने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे देण्यात आले. अधिवेशन संपून गेले. मात्र निर्णय झाला नाही. होणारच नव्हता. कशाला पाहिजे यांना विरोधी नेतेपद? जनतेने त्यांना त्या लायकीचेही मानले नाही. १९८५ मध्ये शेकापकडे फक्त १३ आमदार होते. तरीही त्यांचे नेते दत्ता पाटील यांची विरोधी नेतेपदी निवड झाली होती. संख्याबळाचा प्रश्न नव्हता. तसा नियमही नाही. मात्र, उबाठाच्या दोघा मित्रपक्षांना भास्कर जाधव खरेच चालणार होते का? हा आतला मामला आहे. शरद पवार आणि काँग्रेस यांनी भास्कर जाधव यांचे नाव लावून धरले असते तर चित्र काही वेगळे असते. ‘मी चालत नसलो तर दुसरा नेमा’ इतकेही जाधव बोलले. पण पुढे काही होण्याच्या आत अधिवेशनाचे सूप वाजले. पुढच्या अधिवेशनातही भास्कर जाधव यांचे घोडे गंगेत न्हाईल, याचा भरवसा देता येत नाही. उद्धव ठाकरे यांनी एवढी कटुता वाढवली आहे की, उबाठाला जवळ करायला कोणी तयार नाही. उबाठा दिवसेंदिवस एकटा पडत चालला आहे. मात्र सुधारायला तयार नाही. बंड करून एकनाथराव शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडले हा घाव तीन वर्षे उलटूनही विसरायला उद्धव तयार नाहीत. शिंदे म्हटले की उद्धव ‘गद्दार’, ‘खोके’ बोलायला सुरू होतात. तीच रेकॉर्ड कुणाल कामरा नावाच्या एका प्रसिद्ध स्टँडअप कॉमेडियनने गाऊन आग लावली आहे. एकनाथ शिंदे यांची खिल्ली उडवणारे गाणे त्याने गायिले आणि राजकारण तापले. हे गाणे त्याने जिथे रेकॉर्ड केले तो स्टुडियो तोडफोड करून शिंदे समर्थकांनी राग काढला. कामरा याने माफी मागावी असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगून दोन दिवस झाले. हा गडी ऐकायला तयार नाही. त्याने आणखी दोन व्हिडीयो टाकून सत्ताधाऱ्यांना खाजवले आहे. आपण जे काही करतो ते अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, असा कामरा याचा दावा आहे. मात्र, त्याचे विनोद एकदम फालतू असतात. तरीही महागडी तिकिटं घेऊन कोण लोक या कामराला ऐकायला जातात, हाही आता संशोधनाचा विषय झाला पाहिजे. ‘माफी मागा’ सांगूनही कामरा माफी मागत नाही, याचा अर्थ त्याच्या पाठीशी विरोधकांची लॉबी आहे. कोणाची सुपारी घेऊन कुणाल कामरा नेत्यांची टिंगल उडवतो आहे? हे न समजण्याएवढे लोक बुद्धू नाहीत. उद्धव यांना आणखी एक टेन्शन आहे आणि ते भारी आहे. दिशा सालियनचे भूत बाटलीतून बाहेर आले आहे. सेलिब्रेटी मॅनेजमेंट सांभाळणाऱ्या या तरुणीचा पाच वर्षांपूर्वी घराच्या १४ व्या मजल्यावरून उडी मारल्याने मृत्यू झाला. मात्र तिच्यावर अत्याचार करून तिला फेकण्यात आले, असा दावा तिच्या वडिलांनी केला आहे. त्यासाठी आवश्यक मसाला जमवून दिशाच्या वडिलांनी हायकोर्टात धाव घेतली आहे. आदित्य ठाकरे यांचे नाव त्या पित्याने घेतले आहे. कोर्टाने केस रजिस्टर केली म्हणजे आज ना उद्या सुनावणीला येणार. काय होणार आदुबाळाचं?

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची पातळी कायम ठेवा



सध्या उन्हाळा चांगलाच जाणवू लागला आहे. त्यामुळे सतत घाम येतो. या सततच्या घामामुळे शरीरातील केवळ पाण्याचे प्रमाण कमी होत नाही तर शरीरातील क्षारही कमी होतात. त्यामुळे तापातदेखील डॉक्टर नेहमी सल्ला देतात की, भरपूर पाणी आणि ओआरएस प्या. एसीत दिवसभर राहिल्याने घाम वगैरे येत नाही. पण नैसर्गिक तहान कमी होते. त्यामुळे शरीरावर विपरीत आणि दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात, असे तज्ज्ञ सांगतात. बरेचदा उन्हाळ्यात चक्कर आल्यासारखे वाटणे, तोंड, घसा कोरडा पडणे, थकल्यासारखे वाटणे अशा समस्या येतात. तेव्हा शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्याची शक्यता असते. अशा वेळेस शरीरातून गेलेले पाणी आणि क्षार भरून काढण्याचा प्रयत्न करावा आणि डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. तज्ज्ञ सांगतात कडक उन्हाळ्यात त्रास टाळायचा असेल तर केवळ पाणी पिऊन चालत नाही, याच्या जोडीला कैरीचे पन्हे, ताक, कोकम, लिंबुयुक्त फळांचे सरबत, उसाचा रस, नारळ पाणी हे द्रवयुक्त पदार्थ प्यावे. तसेच टरबूज, खरबूज, संत्री, मोसंबी, आंबा या फळांचा आहारात समावेश करावा. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे घरच्या बाहेर पडताना थोडे खाऊन निघावे आणि सोबत पाण्याची बाटली ठेवावी.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### नाशिक कुंभमेळ्याची तयारी करताना सोयी करा

नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी ११०० कोटींचा आराखडा ही बातमी समाधानकारक आहे. दोन महिन्यांपूर्वी प्रयागराजमध्ये महिनाभर चालणाऱ्या कुंभमेळ्याचे आयोजन खूप गाजले. असंख्य लोकांनी तिथे हजेरी लावली होती. उत्तरप्रदेश सरकारने तिथे ज्याप्रमाणे व्यवस्था व आयोजन केले, त्यात काही गोष्टी वगळता लोकांनी कौतुक केले होते.



पुढच्या दोन वर्षांनी नाशिकला कुंभमेळा होणार असून त्याची आतापासूनच तयारी करणे गरजेचे आहे. मात्र काही दिवसांपूर्वीच त्र्यंबकेश्वर मंदिर व आजूबाजूचा परिसरात गेल्यावर येथे अस्वच्छता, नीटनेटकेपणाचा अभाव व मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे बघितले. भाविक परगावातून मोठ्या संख्येने येथे येतात. मात्र पुरेशी व्यवस्था दिसत नाही. पादत्राणे ठेवण्याची व्यवस्था व मौल्यवान वस्तू ठेवायची पुरेशी सोय नाही. परिणामी काही लोक रस्त्याच्या किनारी भिंतीला लागून चपलांचा ढीग लावतात. शिवाय वाहनस्थळांची जागा अपुरी वाटते. मंदिराच्या जुन्या वास्तू प्रवेशद्वाराच्या जवळचा मार्ग फार अरुंद आहे. त्यामुळे दर्शनाला फार वेळ लागतो. शासनाने देवस्थान ट्रस्टला विश्वासात घेऊन मंदिराचे प्रवेशद्वार मोठे होऊ शकते का यासाठी प्रयत्न करावा. मंदिर प्रवेश होण्यापूर्वी येथे प्रतीक्षालयाची तीन सभागृहे आहेत. जिथे शेगावसारखीच स्टीलची बाके लावली आहेत. मात्र या बाकाखाली कुत्रे असतात. देवस्थान ट्रस्टला विनंती आहे की, सद्यस्थितीत शासनाच्या मदतीने स्वच्छता व भाविकांच्या सोयीसाठी जास्तीत जास्त जे करता येईल त्याकडे लक्ष द्यावे.

**अमोल पाठक**/पुणे

### खासदारांचे पगार, भत्ते वाढ ईपीएस-९५ पेन्शनर्सना चपराक

ईपीएस-९५ पेन्शनर्स मागील अनेक वर्षांपासून पेन्शनवाढीसाठी संघर्ष करीत आहेत. तुटपुंज्या पेन्शनमध्ये म्हणजे केवळ हजार-दोन हजारांमध्ये, ज्याला महागाई भत्त्याची जोड नाही, वैद्यकीय सुविधा नाही, किमान ५०००-७५०० तरी करावी म्हणून संघर्ष करणारे लाखो पेन्शनर्स, संघटना, मजदूर संघटना काही आमदार, खासदार, सरकारला निवेदने, विनंती, धरणे, आंदोलने करून थकले, कोणी ऐकले नाही. परंतु खासदारांना विनासायास त्यांचे पगार, पेन्शन, भत्ते काहीही संघर्ष, आंदोलने, मागण्या न करता रातोरात वाढवून मिळतात. निवडून येण्यापूर्वी आर्थिकदृष्ट्या कमजोर असलेली व्यक्ती खासदार होताच अल्प काळातच कोट्यधीश होते व तरीही अनेक सुविधांचा लाभ मिळत असतानादेखील अशाप्रकारे पगार, भत्ते, पेन्शन वाढीचा लाभ घेते. माझ्या मते ईपीएस-९५ पेन्शनधारकांच्या जखमेवर मीठ चोळले गेल्याचे उदाहरण आहे. त्यांच्या रास्त मागण्यांवर चपराक आहे.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस tbedit2016@gmail.com

तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### पॅरा-ॲथ्लिट्सना पाठिंबा देण्यासाठी कटिबद्ध : रक्षा खडसे



**नवी दिल्ली** : भारत सरकार विविध उपक्रमांद्वारे पॅरा-ॲथ्लिट्सना प्रोत्साहन देण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पॅरा-ॲथ्लिट्सना पाठिंबा देण्यासाठी कोणतीही कसर सोडली जाणार नाही, असे प्रतिपादन युवा व्यवहार व क्रीडा राज्यमंत्री रक्षा निखिल खडसे यांनी केले. खेलो इंडिया पॅरा गेम्स २०२५ स्पर्धेच्या समारोप समारंभात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. यावेळी त्यांनी या यशस्वी आयोजनाचे कौतुक केले. दिल्लीतील तीन ठिकाणी सहा पॅरा विषयांमध्ये सुमारे १३०० खेळाडूंनी भाग घेतला. हरयाणाने तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशला मागे टाकत संघ विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत पदके जिंकणाऱ्या पॅरा-खेळाडूंनी सर्वांना प्रचंड प्रेरणा दिली आहे. खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये ईशान्येकडील राज्यांमधील खेळाडूंचा मोठा सहभाग होता. १८ राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित झाले, त्यापैकी १२ महिलांनी केले. या स्पर्धेत चारशेपेक्षा अधिक महिलांनी भाग घेतला आणि महिलांचा इतका मोठा सहभाग पाहून मनाला आनंद झाला. २०२८ च्या लॉस एंजेलिस पॅरालिम्पिकमध्ये खेलो इंडिया पॅरा गेम्स २०२५ मधील अनेक खेळाडू सहभागी होतील व खूप पदके मिळवून जिंकतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

### आशियाई कुस्ती स्पर्धेत नितीश, सुनीलला कांस्यपदक

**अम्मान** : येथे सुरु असलेल्या वरिष्ठ गट आशियाई कुस्ती स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी भारतीय कुस्तीपटूंनी आपली विजयी घोडदौड कायम राखली. नितेशने भारतासाठी दुसरे कांस्यपदक जिंकले. ग्रीको-रोमन प्रकारात नितेशने उल्लेखनीय कौशल्य व दृढनिश्चय दाखवला व पुरुषांच्या ८७ किलो वजनी गटात सुनील कुमारने कांस्यपदक जिंकून भारताच्या झोळीत आणखी एक कांस्यपदकाची भर टाकली. कांस्यपदकाच्या सामन्यात नितेशने तुर्कमेनिस्तानच्या अमानबर्डी अगामाम्मेदोव्हवर ९-० असे दमदार वर्चस्व गाजविले. २२ वर्षीय नितेशने कझाकस्तानच्या इलियास गुचिगोव्हवर ९-० असा विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली. तथापि, उपांत्य फेरीत त्याला इराणी कुस्तीपटू मोहम्मदहादी अब्दुल्लाह सारावीने पराभूत केले. या विजयासह, भारतीय ग्रीको-रोमन संघाने आता स्पर्धेत दोन कांस्यपदके जिंकली आहेत. भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे. ग्रीको-रोमन कुस्तीगीर सुनील कुमारने पुरुषांच्या ८७ किलो गटात प्रशंसनीय कामगिरी केली आणि कांस्यपदकाच्या लढतीत चीनच्या जियाशिन आंगला पराभूत करून देशासाठी कांस्यपदक मिळवले.

### एम्मा राडुकानूला नमवून जेसिका पेगुला उपांत्य फेरीत

**मियामी** : अमेरिकेच्या चौथ्या क्रमांकाच्या जेसिका पेगुलाने हार्ड रॉक स्टेडियमवर ब्रिटनच्या एम्मा राडुकानूला ६-४, ६-७ (३), ६-२ असे पराभूत करून मियामी ओपन टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. अमेरिकन खेळाडूने गत चार वर्षांत मियामीमध्ये तिसऱ्यांदा २०२१ च्या अमेरिकन ओपन विजेतीला नमवित कारकिर्दीतील तीन स्पर्धेत अव्वल स्थान मिळवले. आता पेगुला आपल्या कारकिर्दीतील डब्ल्यूटीए १००० स्पर्धेचे विजेतेपद जिंकण्याचा प्रयत्न करणार आहे. आता तिचा सामना फिलिपाईन्सच्या १९ वर्षीय ॲलेकझांड्रा इलाशी होईल. अलिकडेच वाईल्ड कार्डधारी खेळाडू इलाने द्वितीय विश्वमानांकित पोलंडच्या इगा स्वियातेकला पराभवाचा हादरा दिला व उपांत्य फेरी गाठली.

### न्यूझीलंड वन-डे संघाचे कर्णधारपद ब्रेसवेलकडे

**नेपियर** : न्यूझीलंडचा यष्टिरक्षक-फलंदाज टॉम लॅथम याच्या उजव्या हाताला दुखापत झाल्यामुळे त्याला पाकिस्तानविरुद्धच्या आगामी वन-डे मालिकेतून बाहेर करण्यात आले आहे. त्याच्या जागी संघाच्या नेतृत्वाची धुरा मायकेल ब्रेसवेलकडे सोपविण्यात आली आहे, असे न्यूझीलंड क्रिकेटने गुरुवारी सांगितले. या आठवड्यात सराव सत्रात फलंदाजी करताना लॅथमला चेंडू लागला व त्याचा उजव्या हाताला दुखापत झाली. त्याला तंदुरुस्त होण्यासाठी किमान चार आठवडे विश्रांती आणि पुनर्वसन आवश्यक असेल. लॅथमची जागा हेनरी निकोल्स घेणार असून सध्याचा टी-२० संघाचा कर्णधार मायकेल ब्रेसवेल एकदिवसीय मालिकेतेही संघाचे नेतृत्व करत राहील आणि मिच हे यष्टिरक्षण करेल, असे मुख्य प्रशिक्षक गॅरी स्टीड यांनी सांगितले. तीन महिन्यांच्या दुखापतीतून सावरल्यानंतर हेनरी निकोल्स चांगल्या फॉर्ममध्ये आहे आणि त्याच्या समावेशामुळे संघात मौल्यवान कौशल्ये आणि अनुभवाची भर पडेल. मालिकेच्या पूर्वसंध्येला टॉमला कर्णधारपदावरून गमावणे हे निश्चितच निराशाजनक आहे व तो लवकर बरा व्हावा अशी शुभेच्छा देता, असेही गॅरी स्टीड म्हणाले.

# बंगळुरूसमोर चेन्नईचे आव्हान



**चेन्नई, २७ मार्च**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी येथे पाच वेळच्या विजेत्या चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके) आणि पहिल्यांदा विजेतेपद पटकावण्यास उत्सुक असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. आरसीबीला १७ वर्षांच्या निराशेचा सामना करण्याची आशा असून त्यांना सीएसकेचा सामना करताना आपल्या अनुभवी फलंदाजी विभागावर अधिक लक्ष केंद्रित करावे लागणार आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने २००८ मध्ये झालेल्या आयपीएलच्या पहिल्या हंगामात चेपॉक येथे चेन्नई सुपर किंग्जला केवळ एकदाच हरवले आहे. सध्याच्या आरसीबी संघात केवळ स्टार फलंदाज विराट कोहली त्या क्षणाचा भाग होता व आता तो दुसऱ्यांदा सीएसकेचा किल्ला तोडण्यास उत्सुक असेल. पण ते स्वप्न पाहणे सोपे आहे. नेहमीप्रमाणे, चेन्नई संघ फिरकी गोलंदाजांना बरीच मदत करणाऱ्या खेळपट्टीवर आपल्या घरच्या मैदानावर सामने जिंकण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यांच्याकडे अनुभवी रवींद्र जडेजा आहे. याशिवाय त्यांनी गत वर्षीच्या खेळाडूंच्या लिलावात आपला जुना खेळाडू रविचंद्रन अश्विनला संघात परत आणले आहे. चेन्नई संघाने अफगाणिस्तानचा डावखुरा मनगट फिरकी गोलंदाज नूर अहमदलाही संघात स्थान दिले आहे व काही दिवसांपूर्वी या तिघांनी पाच वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सविरुद्ध चांगली कामगिरी केली होती. या त्रिकुटाने मुंबईविरुद्ध ११ षटके टाकली व ७० धावा देत ५ फलंदाज बाद केले.

या सामन्यातही खेळपट्टीचे वैशिष्ट्य कायम राहण्याची अपेक्षा आहे व कोहलीच्या नेतृत्वाखालील आरसीबीच्या फलंदाजांना अनुभवी गोलंदाजावर वर्चस्व गाजविण्यासाठी आपल्या खेळाचा दर्जा अधिक उंचवावा लागेल.

आरसीबीच्या फलंदाजी विभागाने सीएसकेच्या तीन स्तरीय फिरकी विभागाविरुद्ध खेळताना आक्रमक असण्यापेक्षा सजग असले पाहिजे व कोहलीने त्या जबाबदारीचे नेतृत्व केले पाहिजे. कोहलीला फिरकी गोलंदाजांविरुद्ध अधिक स्वीप/स्लॉग स्वीप खेळण्याचे सर्व कौशल्य दाखवावे लागणार आहे. केवळ कोहलीच नव्हे, तर फिल साल्ट, कर्णधार रजत पाटीदार, लियाम लिव्हिंगस्टोन, जितेश शर्मा आदिंनीसुद्धा आपली शक्ती पणाला लावावी लागणार आहे.

एम.ए. चिदम्बरम् स्टेडियमच्या खेळपट्टीकडे बघता आरसीबी कदाचित टिम डेव्हिडऐवजी जेकब बेथेलला संधी देण्याचा विचार करू शकत. बेथेल हा डावखुरा फिरकी गोलंदाज टिम डेव्हिडसाठी पर्याय आहे. ते वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारच्या तंदुरुस्तीवर सुद्धा लक्ष ठेवतील. दुखापतीमुळे भुवनेश्वर केकेआरविरुद्धच्या पहिल्या सामन्याला मुकला होता. जर अनुभवी खेळाडू भुवनेश्वर तंदुरुस्त असेल तर तो रसिख सलामची जागा घेईल.

दुसरीकडे, शिवम दुबे, दीपक हुडाव सॅम करन गत सामन्यात एमआयविरुद्ध अपयशी ठरल्याने चेन्नई सुपर किंग्ज आपल्या मधल्या फळीला पुन्हा चांगली कामगिरी करण्यासाठी उत्सुक असतील.

त्यांनी रचिन रवींद्र व कर्णधार ऋतुराज गायकवाडला अधिक पाठिंबा द्यावा, तर एम. एस. धोनीकडून आणखी एक मजबूत कामगिरीची अपेक्षा आहे.

मुंबईविरुद्धच्या सामन्यात न खेळणारा वेगवान गोलंदाज मथिशा पाथिरानाच्या तंदुरुस्तीवरसुद्धा सीएसकेचे बारकाईने लक्ष असेल. जर श्रीलंकेचा मथिशा वेळेत तंदुरुस्त झाला, तर नॅथन एलिसला विश्रांती घ्यावी लागेल. (वृत्तसंस्था)

### भुवनेश्वर, पाथिरानाचे तंदुरुस्तीवर लक्ष


**आजचा सामना**

**चेन्नई सुपर किंग्ज वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**
**स्थळ** : एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# इम्पॅक्ट प्लेअर नियम अष्टपैलूंसाठी अडसर

**नवी दिल्ली, २७ मार्च**

आयपीएलमध्ये इम्पॅक्ट प्लेअर नियम सध्या ठिकपणे काम करत आहे, पण या नियमामुळे काही टप्प्यावर अष्टपैलू खेळाडूंच्या विकासात अडचणी येऊ शकतात, असे मत न्यूझीलंड आणि गुजरात टायटन्सचा अष्टपैलू खेळाडू ग्लेन फिलिप्सने व्यक्त केले आहे.



या इम्पॅक्ट प्लेअर नियमाबद्दल मते-मतांतरे आहे, परंतु बीसीसीआयने हा नियम किमान २०२७ च्या आयपीएल हंगामापर्यंत लागू राहील अशी घोषणा केली आहे.

हे मूलतः संघांना इम्पॅक्ट प्लेअरच्या रूपात अतिरिक्त फलंदाजाच्या आधारासह पहिल्या चेंडूपासून कठोर परिश्रम करण्याचा परवाना देते. त्याचप्रमाणे, संघ अष्टपैलू खेळाडूऐवजी एक विशेषज्ञ गोलंदाज देखील आणू शकतात.

'मी येथे नाही आणि तिथेही नाही. हे निश्चितपणे एका लाइनअपला वेगवेगळ्या गोष्टी करण्यास परवानगी देते, परंतु मला असे वाटते की एखाद्या टप्प्यावर अष्टपैलू खेळाडू गमावल्याने काही समस्या उद्भवू शकतात व त्याचा परिणाम सामन्यावर होतो, असेही तो म्हणाला.

सध्या तरी, हा क्रिकेटचा एक उत्तम मनोरंजक ब्रॅण्ड आहे, पण मला वाटतं की आयपीएलने खरोखरच चांगले काम केले आहे व वातावरणात काय चालले आहे व त्यानुसार नियम बदलले आहेत, असे फिलिप्स म्हणाला.

हा नियम भारतीय अष्टपैलू खेळाडूंच्या वाढीस अडथळा निर्माण करतो, असे रोहित शर्मा गत हंगामात म्हणाला होता. फिलिप्सने आयपीएल २०२५ च्या आधी लाळेवरील बंदी उठवण्याचे समर्थन केले. (वृत्तसंस्था)




### राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीबद्दल देसाई यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

डेहराडून, उत्तराखंड येथे दिनांक २८ जानेवारी ते १४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्य लॉन टेनिस संघटनेने सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई यांची महाराष्ट्र लॉन टेनिस संघाच्या व्यवस्थापक पदी नियुक्ती केली होती .या स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष व महिला संघाने पदक तालिके मधे तिसरा क्रमांक पटकावला होता. या स्पर्धेत संघ व्यवस्थापक म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल राजीव देसाई यांना राज्य संघटनेचे अध्यक्ष प्रशांत सुतार यांच्या शुभ हस्ते मुंबई येथे एका छोटे खानी कार्यक्रमात रिवॉर्ड देऊन गौरविण्यात आले .




### सिंहगड पब्लिक स्कूलच्या सृष्टी घायाळ हिची राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ मार्च -**

भिवानी (हरियाणा) येथे २७ ते २९ मार्च दरम्यान होणाऱ्या तिसरी सब ज्युनियर राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेसाठी सिंहगड पब्लिक स्कूलच्या सृष्टी घायाळ हिची निवड झाली. त्यापूर्वी भंडारा येथे तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिर होणार आहे. सृष्टीचे संस्थेचे संस्थापक एम. एन. नवले, कॅम्पस डायरेक्टर कैलास करांडे, प्राचार्या स्मिता नवले, मुख्याध्यापिका स्मिता नायर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक करीत राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सृष्टीला क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# कर्माकर यांच्या निलंबन प्रकरणाची चौकशी करणार

**नवी दिल्ली, २७ मार्च**

अर्जुन पुरस्कार विजेते नेमबाज व विद्यमान प्रशिक्षक जॉयदीप कर्माकर यांना पश्चिम बंगाल नेमबाजी संघटनेने राज्यातील सर्व नेमबाजी उपक्रमांमधून निलंबित करण्याचा निर्णय घेतला. राज्य संघटनेने घेतलेल्या या निर्णयावर "योग्य पातळीवर" चौकशी करण्यात येणार आहे, असे राष्ट्रीय रायफल असोसिएशन ऑफ इंडियाने (एनआरएआय) गुरुवारी सांगितले.

या वर्षाच्या सुरुवातीला उत्तराखंडमध्ये झालेल्या २०२५ च्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवडींवर ऑलिम्पियन कर्माकर यांनी प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर सध्या रायफल प्रशिक्षक असलेल्या कर्माकर यांना राज्यातील नेमबाजीशी संबंधित उपक्रमांपासून बंदी घालण्याचा पश्चिम बंगाल रायफल संघटनेने (डब्ल्यूबीआरए) निर्णय घेतला.



पश्चिम बंगाल रायफल संघटनेने घेतलेल्या त्या निर्णयावर योग्य पातळीवर चौकशी केली जाणार आहे. कर्माकर यांचे पत्र कालच मिळाले, असे एनआरएआयचे सचिव राजीव भाटिया म्हणाले.

कर्माकर यांनी विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये रायफल प्रोन स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आणि २०१६ मध्ये रिओ आलिम्पिकमध्ये फार कमी गुणफरकाने पदक हुकले.

कर्माकर यांनी संघनिवडीवर टीका करताना समाज माध्यमात डब्ल्यूबीआरए चे काही पदाधिकारी भ्रष्ट असल्याचा आरोप केला. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी राज्य संघाची निवड योग्य नव्हती. २० व्या राष्ट्रीय रँकिंग असलेल्या नेमबाजांना दुर्लक्षित करत २५० व्या किंवा त्याहून अधिक रँकिंग असलेल्या नेमबाजांची निवड केली असा आरोपही कर्माकर यांनी केला होता.

समाजमाध्यमावरील या आक्षेपार्ह पोस्ट केल्याबद्दल कर्माकर यांना पश्चिम बंगाल रायफल संघटनेने त्यांना स्पष्टपणे दोषी ठरवले होते. संघटनेने कर्माकर यांना अधिकृत पत्रव्यवहारात कारणे दाखवा नोटीस बजावली आणि १२ फेब्रुवारी रोजी त्याला सर्व शूटिंग क्रियाकलापांमधून निलंबित केले.

आता, कर्माकर यांनी राष्ट्रीय रायफल असोसिएशन ऑफ इंडियाला (एनआरएआय) या प्रकरणात लक्ष घालण्याची व तोडगा काढण्याची विनंती केली आहे. (वृत्तसंस्था)

# ग्रामीण विभागातून रामशेजगड संघ उपांत्य फेरीत




**मराठा प्रीमियर लीग २०२५**

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

येथील विजापूर रोडवरील शासकीय मैदानावर सुरू झालेल्या मराठा प्रीमियर लीग २०२५ सीजन २ चे दुसरे दिवशी ग्रामीण भागातील संघांसाठी साखळी सामने (वन हाफ पद्धतीने) खेळविण्यात आले आणि त्यातून राम शेजगड संघ उपांत्य फेरीत पोहोचला. दुसऱ्या दिवशी ग्रामीण भागातील खेळाडूंचा खेळ पाहण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी तसेच सामन्यातील सामनावीर चे पुरस्कार देण्यासाठी आणि सामन्याची नाणेफेक करण्यासाठी रोहित तडवळकर, स्पर्धा आयोजक प्रशांत बाबर, रवी घाडगे, राम साठे, तुषार पवार हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

**सामन्यांचा संक्षिप्त धावफलक**

**सज्जनगड** : ३७/७ (६) अजित जाधव दादा उबाळे ९ सागर वाणी २ बळी, निलेश पाटील नंदकुमार शिंदे सोमनाथ मोरे प्रत्येकी १ बळी. **पराभूत विरुद्ध पुरंदर** : ३९/२ (३.१) राहुल शेलार नाबाद १६, महेश नलावडे १९उमेश पवार महेश शिंदे प्रत्येकी १ बळी.

**सुवर्णदुर्ग** : ७०/४ (६) सीताराम रोंगे नाबाद ४३, समाधान रोंगे १०, नवनाथ निंबाळकर २ बळी, माउली सिरसट, विजय वीर प्रत्येकी १ बळी. **पराभूत विरुद्ध रामशेजगड** : ७१/१ (४.१) विजय वीर नाबाद ५२, विनायक शितोळे नाबाद १७

**पुरंदर** : ६७/६ (६) सागर वाणी नाबाद ४७, माउली सिरसट १५/३ बळी, नवनाथ निंबाळकर, विजय वीर प्रत्येकी १ बळी. **विजयी विरुद्ध रामशेजगड** : ५६/७ (६) अरुण कोकाटे २५, निलेश पाटील, नंदकुमार शिंदे, अतिश सुरवसे प्रत्येकी २ बळी.

**सुवर्णदुर्ग** : ७९/२ (६) स्वप्निल नकाते ३८, सिताराम रोंगे नाबाद १९, रोहित रोंगे नाबाद १७ **विजयी विरुद्ध सज्जनगड** : ५१/७ (६) उमेश पवार १४, माउली मोटे ११, अविनाश राऊत १० रोहित रोंगे १२/४ बळी, समाधान रोंगे २ बळी, स्वप्निल नकाते १ बळी.

**सुवर्णदुर्ग** : ७०/४ (६) महेश जाधव २२, बिभीशन रोंगे १५, बालाजी जाधव नाबाद १७, नवनाथ निंबाळकर, विजय वीर प्रत्येकी २ बळी **पराभूत विरुद्ध रामशेजगड** : ७४/३ (५.४) विजय वीर, विनायक शितोळे नाबाद, माऊली शिरसाट नाबाद प्रत्येकी २२, समाधान रोंगे २ बळी रोहित रोंगे १ बळी.

**पुरंदर** : ६२/७ (६) राहुल शेलार १९, महेश नलावडे १४, अभी ठाकरे १५, विजय वीर १८/४ बळी, माऊली शिरसट समाधान मसाळ प्रत्येकी १ बळी **विजयी विरुद्ध रामशेजगड** : ६७/२ (५) विजय वीर २२, शिवाजी पवार नाबाद १९, विनायक शितोळे नाबाद २०, निलेश पाटील १९/२ बळी.

### विजय वीरला तीन सामनावीर पुरस्कार

रामशेजगड संघाचा विजय वीर याने ४ पैकी ३ सामनावीरचा पुरस्कार पटकावीत एक अर्धशतक, एक हॅट्ट्रिकसह ९६ धावा, ८ बळी घेत अष्टपैलू खेळी करताना एक निर्धाव षटक टाकताना त्यात ४ बळी घेण्याची किमया केली.

# कोल्हापूर, पुणे व सांगलीचे दोन संघ अंतिम फेरीत


### कै भाई नेरुरकर चषक राज्य खो-खो स्पर्धा

### धाराशिव, मुंबई उपनगरचीही अंतिम फेरीत धडक

**इचलकरंजी, दि. २७ मार्च-**

कोल्हापूरने पुरुष व किशोर गटात, पुणे जिल्ह्याने महिला व किशोरी गटात तर सांगलीने किशोर व किशोरी गटातून कै. भाई नेरूरकर चषक राज्य खो-खो स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. तसेच धाराशिवच्या महिला व मुंबई उपनगरच्या पुरुष संघानेही अंतिम फेरीत धडक मारली आहे.

राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा खात्याच्या वतीने इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथील विठ्ठल रामजी शिंदे शाळा क्रमांक २१च्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. उपांत्य फेरीत मुंबई उपनगरने सांगलीचा १७-१६ असा १.३० मिनिटे राखून पराभव केला. मुंबई उपनगरच्या अक्षय भांगरे याने (१.३०, १.५०मिनिटे संरक्षण व १ गुण), दीपक माधव (१.४० मिनिटे व ४ गुण), अनिकेत पोटे (१.२० मिनिटे व ४ गुण) यांनी अष्टपैलू खेळी केली. सांगलीकडून ओंकार पाटील (१.३० नाबाद व ६ गुण) व सौरभ घाडगे (१.३० मिनिटे व ४ गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात मध्यंतरापर्यंत १०-११ अशी कडवी लढत दिलेल्या पुण्यास यजमान कोल्हापूरने २२-१८ असे ४ गुणांनी हरविले. कोल्हापूरच्या श्रीराम कांबळे (१.१० मिनिटे २ गुण), सौरभ आडावकर (५ गुण) व शरद घाटगे (४ गुण) यांनी संघाचा विजय खेचून आणला. पुण्याच्या अभिषेक भोसले (१.४०, १.४० मिनिटे), रितेश कडगी (५ गुण) व विवेक ब्राह्मणे (४ गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले.



**असे होणार अंतिम सामने**

**पुरुष : कोल्हापूर विरुद्ध मुंबई उपनगर**
**महिला : धाराशिव विरुद्ध पुणे**
**किशोर : कोल्हापूर विरुद्ध सांगली**
**किशोरी : सांगली विरुद्ध पुणे.**

महिला गटातील उपांत्य सामन्यात मध्यंतरापर्यंत ७-७ असे बरोबरीत रोखलेल्या कोल्हापूरला धाराशिवने १२-१० असे २ गुण आणि ३.१० मिनिटे राखून नमविले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात मध्यंतराच्या ६-८ अशा पिछाडीवरून पुण्याने ठाण्यावर १६-१२ असा ४ गुणांनी विजय मिळविला. पुणेकडून पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेतील भारतीय संघाची कर्णधार प्रियंका इंगळे हिने (२.१०, २.३० मिनिटे संरक्षण व ४ गुण) अष्टपैलू कामगिरी केली. तिला दिपाली राठोड (२.२० मिनिटे व ४ गुण) व भाग्यश्री बडे ( १.१०, १.४० मिनिटे व एक गुण) यांनी साथ दिली. ठाणेकडून रेश्मा राठोड (२.२०, २.०० मिनिटे), दीक्षा सोनुरकर (१.३०, १.३० मिनिटे व ३ गुण) व गीतांजली नरसाळे (२.१० मि. संरक्षण) यांनी लढत दिली.

किशोर गटातील उपांत्य सामन्यात कोल्हापूरने धाराशिववर १५-१४ असा १ गुण व २.२० मिनिटे राखून मात केली. मध्यंतराची ९-८ ही एका गुणाची आघाडीच त्यांना विजय मिळवून दिली. कोल्हापूरकडून देवराज यड्रावे (१.४०, २.०० मिनिटे व १ गुण), रुद्र यादव (२.५० मिनिटे व २ गुण) व ओजस बंडगर (६ गुण) यांनी संघाच्या विजयात महत्वपूर्ण कामगिरी बजावली. धाराशिवच्या (सुरेश वसावे १.२०,१.१० मिनिटे व ४ गुण), भीमसिंग वसावे (१.००, १.२० मिनिटे व ५ गुण), आदित्य पांचाळ (१. ३० मिनिटे व १ गुण) यांचे प्रयत्न निष्फळ ठरले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात सांगलीने सातारास २०-१६ असे ४ गुणांनी हरविले. साताराकडून वैभव जाधव याने दोन्ही डावांमध्ये प्रत्येकी १.४० मिनिटे संरक्षण करीत २ गडी बाद गेले व वरद पोळ (१.१०, २.०० मिनिटे व ३ गुण) यानेही अष्टपैलू खेळ करीत लढत दिली. सांगलीकडून सार्थक हिरेकुर्ब (२.५० मिनिटे व ४ गडी), आदर्श सरगर (१.१० मि. व ३ गडी), दक्ष जाधव (१.१० मिनिटे व ४ गुण) यांनी अष्टपैलू खेळ करीत संघाचा विजय सुकर केला,

किशोरी गटातील उपांत्य सामन्यात सांगलीने ठाण्यास १४-८ असे ६ गुणांनी नमविले. सांगलीकडून श्रावणी तामखडे (३.००, १.०० मिनिटे), अनुष्का तामखडे (१.४०, २.४० मिनिटे व ७ गडी) व वेदिका तामखडे हिने (१.००, २.०० मिनिटे ) तर ठाण्याकडून प्रणिती जगदाळे (२.१०, १.१० मिनिटे), स्वरा साळुंखे (१.४० मि.) व निधी जाधव (१.२० मिनिटे व २ गडी) यांनी कामगिरी केली. दुसऱ्या उपांत्य सामन्यात पुण्याने धाराशिववर १२-१० असा २ गुण व ३ मिनिटे राखून विजय मिळविला. पुणे संघाकडून अपर्णा वर्धे हिने २.०० व १.१० मिनिटे संरक्षण करीत ४ गडी बाद केले. आराध्या गीते हिने १.४० मिनिटे पळती करीत २ गडी बाद करीत संघाच्या विजयात साथ दिली. धाराशिवकडून (कृष्णावली कवडे हिने १.२० मिनिटे व १ गडी), राही पाटील (१.००, १.३० मिनिटे व १ गडी), श्रावणी गुंड (१.०० मिनिटे व २ गडी) यांचे प्रयत्न अपुरे पडले.

## संक्षिप्त वृत्त

### स्व.आ.काकासाहेब साळुंखे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

**सांगोला,दि.२७ मार्च-**

सांगोल्याचे स्व.आ.काकासाहेब साळुंखे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त सांगोला शहर आणि तालुक्यात आज शुक्रवार दि.२८ मार्च रोजी दरवर्षी प्रमाणे विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याचे तानाजी पाटील यांनी सांगितले. जि.प.प्रा.शाळा महुद, जि.प.प्रा.शाळा एखतपूर, आश्रमशाळा व जि.प.प्रा.शाळा घेरडी, अंगणवाडी व जि.प.प्रा.शाळा कडलास, अंगणवाडी व जि.प.प्रा.शाळा नाझरे येथे ग्रामस्थांच्यावतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे व खाऊचे वाटप करण्यात येणार आहे. जवळा ग्राम स्थांच्या वतीने प्राथमिक मुलांची शाळा क्र.१ येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आरोग्य तपासणी आणि निदान शिबिर आयोजित केले आहे. तसेच कोळा ग्रामस्थांच्या वतीने गोपाळपूर ता.पंढरपूर येथील मातोश्री आश्रमात असणाऱ्या सर्व निराधार लोकांना भोजन देण्यात येणार आहे. तसेच सांगोला शहरवासी यांच्या वतीने शहरातील मातोश्री वृद्धाश्रम येथे असणाऱ्या निराधार वयोवृद्ध नागरिकांना भोजनाचे सर्व साहित्य देण्यात येणार आहे.





### सुलाखे कॉलेज येथे पारंपारिक वेशभूषा दिवस साजरा

**बार्शी, दि. २७ मार्च -**

येथील बी.पी.सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी येथे पारंपारिक वेशभूषा दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध पारंपारिक पेहराव घालून सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. या कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे, व्यावसायिक गौतम कांकरिया, प्राचार्य एस.बी. करंडे, आय क्यू एस सी प्रमुख प्रा.बी.डी.लांडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अक्षय पवार, राष्ट्रीय छात्र प्रमुख प्रा.के.बी. चपटे, ज्येष्ठ प्रा.एन.आर.सारफळे, राष्ट्रीय सेवा विभागप्रमुख के.एम. माळी व प्रा. ढगे एम. ए., डॉ.अजय पाटील, प्रा.कविता वरडे , प्रा.लिंगे बाळासाहेब, ग्रंथपाल ज्योती यादव, शारीरिक संचालक दत्तप्रसाद सोनटक्के उपस्थित होते.

### आर्णव मुळेची नवोदयसाठी निवड

**पंढरपूर,दि.२७ मार्च -**



येथील कर्मयोगी विद्यानिकेतन, पंढरपूर मधील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी आर्णव सुशेन मुळे याची पोखरापूर नवोदय विद्यालयामध्ये इयत्ता ६ वी साठी निवड झाली आहे. आर्णवच्या कष्ट व जिद्दीबद्दल त्याचे व त्याच्या पालकांचे अभिनंदन करून शाळेच्या प्राचार्या सरदेसाई, संस्थेचे रजिस्ट्रार गणेश वाळके आणि प्रमुख विश्वस्त रोहन परिचारक यांनी शुभेच्छा दिल्या.



### सांगली-सोलापूर-सांगली रेल्वे सुरू करा : शहीद अशोक कामटे संघटनेची मागणी

**सांगोला,दि.२७ मार्च-**

उन्हाळी सुट्टीत होणारी गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने सांगली-सोलापूर-सांगली रेल्वे कायमस्वरूपी दररोज सुरू करावी या मागणीचे निवेदन सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे मुंबई यांना देण्यात आले. सांगली-सोलापूर-सांगली रेल्वे पॅसेंजर रेल्वे १० वा. सकाळी सत्रात सांगली येथून सुरू करावी हीच रेल्वे सोलापूर येथून सायं.५ वा. सोलापूर येथून सोडावी. त्यामुळे मिरज, आरग, सलगरे, कवठेमंकाळ, ढालगाव, जतरोड, डोंगरगाव, सांगोला, पंढरपूर, मोडलिंब, कुर्डूवाडी, माढा व मोहोळ असे थांबे मंजूर करून या भागातील लोकांचे दैनंदिन मोठी सोय होईल. या गाडीचा कोल्हापूर, सांगली, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांना जोडण्याचा मोठा फायदा होणार आहे. तसेच परतीच्या प्रवासात कुर्डूवाडी, पंढरपूर, सांगोला, ढालगाव येथील प्रवाशांना दररोज गोवा(वास्को) व दिल्ली येथे जाण्याकरिता रात्री १० वा. मिरजेतून या गाडीतून हज.निजामुद्दीन एक्सप्रेसचे कनेक्शन मिळू शकेल. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील प्रवाशांना दुपारी एक नंतर कोणतीही गाडी या मार्गावर नाही तरी सदरची गाडी सुरू करणे आवश्यक आहे. तसेच सांगली परळी या डेमो गाडीस आयसीएफ कोच डबे जोडावे अशी मागणी देखील करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, खा.धैर्यशील मोहिते-पाटील, खा.विशाल पाटील, खा.प्रणितीताई शिंदे, विभागीय रेल्वे व्यवस्थापक सोलापूर, पुणे यांनाही शहीद अशोक कामटे संघटनेच्यावतीने देण्यात आले आहेत.

## निधन वृत्त...

### कांतीलाल करपे

**करकंब, दि.२७ मार्च-**



सांगोला येथील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक कांतीलाल लक्ष्मण करपे (वय८५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.माध्यमिक शिक्षक अविनाश करपे व व्यापारी नागेश करपे यांचे ते वडील होत.त्यांच्या पार्थिव देहावर वैकुंठ स्मशानभूमी सांगोला येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन सुना, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# लग्नाचे कार्ड म्हणून होतोय सायबर हल्ला

**APK फाईल्सद्वारे फसवणुकीची नवी युक्ती**

**व्हॉट्स ॲप आणि सोशल मीडियाद्वारे हॅकर्सचा नवा डाव**

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे**
**मंद्रुप, दि. २७ मार्च-**

स्मार्टफोनच्या वापरात झालेल्या वाढीमुळे अनेकदा नागरिक विविध ॲप्लिकेशन्स डाऊनलोड करतात. मात्र, थेट इंटरनेटवरून किंवा अनोळखी स्रोतांमधून APK फाईल्स डाऊनलोड केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर फसवणुकीचे प्रकार उघडकीस येत आहेत. विशेषतः व्हॉट्सॲप, टेलिग्राम आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून अनोळखी दुवे (links) पाठवून नागरिकांना आकर्षित केले जात आहे.

सायबर गुन्हेगार आता लग्नाचे निमंत्रण, मोफत ऑफर, बक्षीस योजना, नवीन चित्रपटाचे लिंक किंवा महत्त्वाचे अपडेट या नावाखाली APK फाईल्स पाठवतात. काही वेळा या फाईल्स बँकिंग ॲप, सरकारी योजना किंवा लोकप्रिय खेळाच्या अपडेट्स च्या स्वरूपात असतात. वापरकर्त्याने एकदा ही फाईल डाऊनलोड केली की, त्या फाईलमधील मालवेअर किंवा व्हायरस फोनमध्ये इन्स्टॉल होतो. एकदा मालवेअर इन्स्टॉल झाल्यानंतर ती फाईल आपोआप व्हॉट्सॲप ग्रुप आणि इतर संपर्कांना पाठवली जाते. त्यामुळे हा मालवेअर झपाट्याने पसरतो. सायबर तज्ज्ञांच्या मते, Google Play Store किंवा Apple app Store व्यतिरिक्त इतर स्रोतांवरून ॲप डाऊनलोड करणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. अशा ॲप्सद्वारे फोन हॅक होण्याची आणि आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता जास्त असते. बँकिंगशी संबंधित कोणतीही माहिती कोणालाही शेअर करू नका. अनोळखी ॲप्स आणि लिंकवर क्लिक करताना सावधान राहा.



**अधीक सतर्क राहण्याची गरज**

वेबसाईटचा वापर करताना काळजीपूर्वक करावे. काही वेबसाईटवर अनोळखी जाहिराती असतात. त्या जाहिरातींवर क्लिक केल्यास APK फाईल डाऊनलोड होऊन मोबाईल हॅक होण्याची शक्यता जास्त असते. कोणत्याही ॲपला लोकेशन, कॉन्टॅक्ट आणि मेसेजेस ॲक्सेस देताना अधिक सतर्क राहिले पाहिजे.

**- तेजस्विनी कोणदे, संगणक अभियंता**

**फसवणूक होऊ नये म्हणून काय करावे?**

- केवळ अधिकृत ॲप स्टोअरवरूनच ॲप डाऊनलोड करावेत.
- अनोळखी लिंक किंवा मेसेजवर क्लिक करू नये.
- APK फाईल्स डाऊनलोड करण्यापूर्वी त्याची सत्यता तपासा.
- सोशल मीडियावर येणारे कोणतेही ॲप्लिकेशन डाऊनलोड करून इन्स्टॉल करताना तपासणी करा.
- कोणत्याही संशयास्पद ॲपला ॲक्सेस परवानगी देताना काळजी घ्या.







**सायबर गुन्हेगारांचा नवा फंडा**

सायबर गुन्हेगार आता लग्नाचे निमंत्रण, मोफत ऑफर, बक्षीस योजना, नवीन चित्रपटाचे लिंक किंवा महत्त्वाचे अपडेट या नावाखाली APK फाईल्स पाठवतात. APK फाईल इन्स्टॉल झाल्यानंतर हे मालवेअर एकदा फोनमध्ये इन्स्टॉल झाले की, ते फोनमधील वैयक्तिक माहिती, बँक खात्याचा तपशील, जढझ, पासवर्ड यासह अनेक महत्त्वाचे डेटा हॅकर्सपर्यंत पोहोचवू शकते. विशेष म्हणजे, या फाईल्समध्ये एकदा मालवेअर इन्स्टॉल झाले की, ती फाईल आपोआप व्हॉट्सॲप ग्रुप आणि इतर संपर्कांना पाठवली जाते. त्यामुळे हा मालवेअर झपाट्याने पसरतो.

# बळीराजा प्रतिष्ठानचे साहित्य पुरस्कार जाहीर


**१ एप्रिल रोजी होणार वितरण**

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२७ मार्च -

शेळवे (ता. पंढरपूर) येथील बळीराजा प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात येणाऱ्या रानशिवार राज्यस्तरीय साहित्य पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून त्याचे वितरण १ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता खेडभाळवणी (ता. पंढरपूर) येथे होणार असल्याचे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश गाजरे यांनी सांगितले.

बळीराजा प्रतिष्ठानच्यावतीने साहित्य व साहित्यिकांना गेल्या दहा वर्षांपासून हे राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतात. चार साहित्यिकांना पुया पुरस्काराने गौरविण्यात येणार ाहे तर दोघांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. याचे वितरण मंगळवार दि. १ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता खेड भाळवणी (ता. पंढरपूर) येथे होणार आहे. आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार शहाजी (बापू) पाटील, माजी आमदार दत्तात्रय सावंत यांचे शुभहस्ते तर ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक हरिश्चंद्र पाटील, कृष्णा गोदावरीचे संचालक संदीप नळंदवार, आयुर्वेदाचार्य बाबुशेठ पांडकर या मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा होणार आहे. साहित्य रसिकांनी व साहित्यप्रेमींनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अध्यक्ष श्री.गाजरे यांनी केले आहे.








**रानशिवार साहित्य पुरस्कार प्राप्त लेखक**

सुनील दबडे, आटपाडी, सांगली (बनगी आणि बिरमुटं , कथासंग्रह), विशाल मोहोड, चांदुर बाजार, अमरावती ( कीड, कादंबरी), इंद्रजीत पाटील, बार्शी, सोलापूर (कळ पोटी आली ओठी, कवितासंग्रह), ॲड. संतोष मळवीकर, चंदगड, कोल्हापूर (संत्या कुली, आत्मकथन) या बरोबरच गणपत जाधव, अकलूज, आणि गणेश अटकळे, पंढरपूर यांचा विशेष साहित्य गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

# भूमी अभिलेख दिन लोकांसमवेत साजरा करावा

**जमा बंदी आयुक्तांकडे ग्राहक पंचायतीची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ मार्च -**

राष्ट्रीय भूमी अभिलेख दिन सर्व नागरिकांसमवेत साजरा करावा अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने जमाबंदी आयुक्त यांचेकडे समक्ष भेटून निवेदनाद्वारे केली असल्याची माहिती सोलापूर जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

१० एप्रिल हा दिवस राष्ट्रीय भूमी अभिलेख दिन म्हणून त्या विभागाच्या सर्व कार्यालयामध्ये फक्त मोजणीयंत्र व सामुग्रीचे पूजन करून कर्मचारी साजरा करतात.

शासनाचा भूमीअभिलेख (मोजणी) हा विभाग अतिशय महत्त्वाचा विभाग असून सामान्य जनतेशी अत्यंत जवळचा व थेट संपर्क येणारा असा विभाग आहे. या विभागासंबंधी असलेले गैरसमज दूर होण्यासाठी १० एप्रिल या भूम ीअभिलेख दिनाच्या निमित्तानच्या कार्यक्रमात नागरिकांना, सामाजिक संघटनांना सहभागी करून थेट संवाद साधता येईल. त्यांच्या शंका,अडचणी जाणून घेता येतील, तसेच उपयुक्त सुचनाही समजतील. प्रशासन व जनता यांच्यातील सुसंवादासाठी नागरिकांना सहभागी करून घेतले जाईल अशी अपेक्षा प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, प्रांत विधी आयाम प्रमुख श्रीकांत जोशी, सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा संघटक दीपक इरकल,जिल्हा सचिव सुहास निकते, महिला प्रमुख माधुरी परदेशी यांनी व्यक्त केली.




### माळशिरस तालुक्यात चार टँकर सुरु

**तभा वृत्तसेवा**
**सदाशिवनगर,दि.२७ मार्च -**

तालुक्यात पश्चिम भागातील गावांत पाणी टंचाई तीव्र आहे. गारवाड, मगरवाडी, सुळेवाडी, बचेरी या चार गावात टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याची माहिती माळशिरसचे गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांनी दिली.

पाऊस कमी झाल्याने या भागातील नाले, ओढे वाहिले नाहीत. तलाव, बंधारे पूर्ण क्षमतेने भरले नाहीत. पाणी पुरवठा विहिरी कोरड्या पडत आहेत. गतवर्षी मार्च महिन्यात भांब, कोथळे, बचेरी, फडतरी, शिवारवस्ती, गारवाड, मगरवाडी, मांडकी, लोणंद, लोंढे मोहितेवाडी, सुळेवाडी, जळभावी या गावांना टँकर होता. आता याच गावांपैकी मगरवाडी, सुळेवाडी, बचेरी, गारवाड या गावात टंकरने पाणी पुरवठा करण्यात येत असून लोंढे मोहितेवाडी व लोणंद या दोन्ही गावांनी टँकरसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

# जि.प.च्या लाचखोर शाखा अभियंत्यास अटक

**रस्त्याच्या कामाचे बिल देण्यासाठी मागितली २० हजारांची लाच**

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मार्च -**

रस्त्याच्या कामाचे बिल देण्यासाठी २० हजारांची लाच घेणाऱ्या जिल्हा परिषदेच्या करमाळा येथील शाखाअभियंत्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात अटक केली. ही कारवाई गुरुवारी करण्यात आली असून याबाबत करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बबन हिरालाल गायकवाड (वय ५७, रा. फ्लॅट नं. ३०६, ग्रीष्म अपार्टमेंट, करमाळा, जि. सोलापूर, मूळ रा. फ्लॅट नं. ३०२, साई समर्थ अपार्टमेंट, केशव नगर, मुंढवा, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या शाखा अभियंत्याचे नाव आहे.



यातील तक्रारदार एका कॉन्ट्रॅक्टरकडे सुपरवायझर म्हणून कामास आहे. त्या कॉन्ट्रॅक्टर यांना जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र. २ अंतर्गत वांगी नं. २ ते इझिमा १२ रस्ता सुधारणा करणे, वरकुटे ते साडे रस्ता सुधारणा करणे, वीट चोपडे वस्ती ते झरे रस्ता सुधारणा करणे या कामांची ई-निविदेद्वारे वर्क ऑर्डर मिळालेली होती. कॉन्ट्रॅक्टर यांनी सदर कामे पूर्ण करून बिलाच्या अनुषंगाने सर्व प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी तक्रारदार सुपरवायझर यांच्यावर दिलेली आहे.

त्या अनुषंगाने तक्रारदार सुपरवायझर यांनी पाठपुरावा केला असता सदर कामांपैकी वांगी नं. २ ते इझीमा १२ रस्ता सुधारणा या कामाचे प्राथमिक बिल ५ लाख ८७ हजार ८६१ रुपये तक्रारदार यांना मिळाले. सदर बील काढण्याचा मोबदला तसेच उर्वरीत दोन कामाचे प्राथमिक बिल काढण्यासाठी म्हणून प्रभारी उपअभियंता म्हणून काम पाहणारे शाखा अभियंता बबन गायकवाड यांनी तक्रारदार यांच्याकडे ३० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती २० हजार रुपये देण्याचे ठरले.

दरम्यान, तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार नोंदविली. त्यानंतर लाचलुचपत प्रबितंधक विभागाने सापळा लाऊन गुरुवारी लाचेची २० हजारांची रक्कम स्विकारल्यानंतर शाखा अभियंता गायकवाड यांना रंगेहात अटक केली. याबाबत करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर अधिक्षक डॉ. शीलतल जानवे-खराडे, उपअधिक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गणेश पिंगुवाले, अमंलदार प्रमोद पकाले, राजू पवार, रवि हटखिळे, शाम सुरवसे यांनी केली.

# तापमान नियंत्रणासाठी गाडीला चक्क देशी गाईचे शेण

**गोमुत्राचे लेपनही; पंढरपूरातील डॉक्टराचा चारचाकी गाडीतील थंडाव्यासाठी अनोखा प्रयोग**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२७ मार्च -**

आलिशान चारचाकी गाडीतील तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी पंढरपूर येथील एका आयुर्वेदिक डॉक्टरने चक्क आपल्या चारचाकी गाडीला देशी गाईचे शेण आणि गोमूत्राचा लेप दिला आहे. त्यांच्या या अनोख्या प्रयोगामुळे गाडीतील तापमान चक्क ५० टक्क्यांनी नियंत्रित झाल्याचा दावा डॉक्टरांनी केला आहे. फार मोठा खर्च न करता केवळ शेण आणि गोमुत्राच्या अभ्यासातून केवळ आठ दिवसांत आयुर्वेदिक डॉक्टरने स्वतःच्या आलिशान चारचाकी गाडीला केलेल्या गोमुत्र आणि शेण लेपनाच्या प्रयोगाची सध्या पंढरपुरात जोरदार चर्चा आहे.

येथील डॉ.रामहरी कदम हे गेल्या अनेक वर्षांपासून देशी गोवंश आणि त्यांपासून मिळणाऱ्या शेण व गोमूत्राचा प्रचार आणि प्रसार करतात. आयुर्वेदामध्ये देशी गाईच्या शेणाचे महत्व सांगितले आहे. दैनंदिन आयुष्यात देशी गाईचे महत्व लोकांना पटवून देण्यासाठी त्यांनी चक्क आपल्या एक्सयूव्ही या आलिशान चारचाकी गाडीला शेण आणि गोमुत्राचे लेपन दिले आहेच,




शिवाय स्वतःच्या घराच्या भिंती ही त्यांनी शेणाने सारवल्या आहेत. सध्या उन्हाची तीव्रता अधिकाधिक होवू लागली आहे. सध्या सोलापूर जिल्ह्यात उन्हाचा पारा ४० अंशाच्या पुढे आहे. त्यामुळे उकाडा वाढला आहे. अशा परिस्थितीत तापमान नियंत्रित करण्यासाठी डॉ.कदम यांनी आपल्या चारचाकीला शेणाचा लेप देवून तापमान नियंत्रित ठेवण्याचा आगळावेगळा प्रयोग केला आहे. यामुळे गाडीतील तापमान ५० टक्क्यांनी नियंत्रित झाल्याचा मोठा दावा ही डॉ.कदम यांनी केला आहे. दरम्यान त्यांचा हा दावा वैज्ञानिक कसोटीवर कितपत खरा ठरतो या पेक्षा डॉक्टरसाहेबांना तरी स्वतःच्या अभ्यासातून केलेल्या गाईचे शेण आणि गोमुत्र लेपनापासून वाढत्या उन्हाळ्यात आपल्या गाडीत बसल्यावर चक्क थंडावा मिळतो आहे ही काही कमी महत्वाची गोष्ट नाही. शिवाय या प्रयोगासाठी फार मोठा खर्च देखील त्यांना आलेला नाही.

**गाडीचा रंग देखील राहतो टिकून**

शेण हे उष्णता परावर्तीत करते. त्यामुळे गाडीला शेणाचे लेपन केले आहे. गाडीला किंवा गाडीत बसणाऱ्या व्यक्तीला याचा कोणताही त्रास होत नाही. लेपन केल्यामुळे गाडी पुसण्याची गरज नाही. शिवाय गाडीचा रंग खराब होण्याचा प्रश्नच येत नाही, उलट गाडीचा रंग टिकवून ठेवण्यास मदत होते. गाडीला शेण आणि गोमूत्राचे लेपन प्रयोगासाठी फार खर्च तर आलाच नाही शिवाय केवळ आठ दिवसांचा कालावधीत लेपन प्रक्रिया पुर्ण झाल्याची माहिती ही डॉ.रामहरी कदम यांनी दिली.

### पिलीव ग्रामपंचायत निवडणुकीसाठी अंतीम मतदार यादयांचे प्रसिद्धीकरण

**तभा वृतसेवा**
**पिलीव दि २७ मार्च -**

पिलीव ग्राम पंचायतीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी २६ मार्च रोजी अंतीम मतदार यादयांचे प्रसिद्धी करण केले आहे.

येथे एकुण सहा प्रभागात प्रभाग क्रमांक एकमधे ११९७, प्रभाग दोनमधे ८३९, प्रभाग तीनमधे १८५५, प्रभाग चारमधे १२३५. प्रभाग पाचमधे ९६७ तर प्रभाग सहामधे १६६४ असे एकुण ७७५७ एवढी मतदार संख्या आहे. यंदा सरपंच पदाची थेट जनतेतुन निवड होणार असुन सरपंच पद हे सर्व साधारण महीलेसाठी राखीव आहे. यंदा पिलीवची निवडणुक ही तिरंगी होणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे. यामध्ये सत्ताधारी जहागिरदार पार्टी, नागरी आघाडी व भाजपप्रणीत महालक्ष्मी ग्रामविकास पॅनल अशी तिरंगी लढत होणार असल्याचे जवळपास स्पष्ट झाले असुन, जातिनिहाय गणीत पाहीली तर धनगर, माळी,रजपुत, लिंगायत, रामोशी व इतर समाजाची मतदार संख्या निर्णायक राहणार आहे. यामुळे सरपंच पदाच्या निवडणुकीत जातीची गणीतेच निर्णायक ठरणार आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सोलापुरातील प्रशासकीय समस्यांचे निराकरण करा

## मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मार्च-**

राज्याचे कॅबिनेट मंत्री दत्तात्रेय भरणे यांच्या मंत्रालयातील कार्यालयामध्ये सोलापूर शहरातील विविध समस्या बाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी या बैठकीमध्ये सोलापूर महानगरपालिका तसेच जिल्हाधिकारी कार्यालय यामाध्यमातून दैनंदिन होणाऱ्या प्रशासकीय कामकाजाबद्दल व नागरिकांच्या सोई सुविधाबद्दल प्रामुख्याने विषय मांडण्यात आले.

बैठकीदरम्यान मंत्री दत्तात्रेय भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना नागरिकांच्या प्रश्नाबाबत सहकार्य करा, नागरिकांना विविध सोयीसुविधा कशा पद्धतीने उपलब्ध करून देता येईल याबाबत योग्य त्या सूचना दिल्या. बैठकीस गणेश पुजारी, अविनाश भडकुंबे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

> सोलापूर शहरातील महापालिका तसेच जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत येणाऱ्या विविध विभागांविषयी आणि प्रलंबित प्रश्नांविषयी बैठक घेण्यात आली. महापालिकेच्या अंतर्गत असणारे रमाई आवास योजना, महापालिका रोजंदारी बिगारी कामगार, क्रीडा संकुल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, माता रमाई पुतळा सुशोभीकरण, जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीतील संजय गांधी निराधार योजना, नॉर्थकोट मैदान येथील बाबासाहेब आंबेडकर स्मारक आदींचे विषय चर्चेत आणले. डीपीसी मधून विविध प्रलंबित कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याविषयी मागणी यावेळी करण्यात आली.
>
> **- आनंद चंदनशिवे,**
> प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तथा माजी नगरसेवक

# जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठेंसह १४७ जणांचे अर्ज दाखल

## ● कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक; आतापर्यंत २०९ जणांनी भरले अर्ज





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च -**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी आतापर्यंत ७८७ अर्जाची विक्री झाली आहे. त्यातील २०९ जणांनी अर्ज दाखल केले आहेत. गुरुवारी दि. २७ राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठेंसह १४७ जणांनी जिल्हा उपनिबंधक कार्यालयात अर्ज दाखल केले आहेत.

शुक्रवारी दि. २८ रोजी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत असल्याने गुरुवारी तब्बल १६२ जणांनी अर्ज खरेदी केले आहेत. तसेच १४७ जणांनी निवडणुकीसाठी अर्ज भरले आहेत. यामध्ये उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर तालुक्यातील अनेक मातब्बर नेत्यांचा समावेश आहे. दरम्यान बाजार समितीच्या निवडणुकीसाठी अर्ज खरेदी करणे, दाखल करण्यासाठी फक्त एक दिवस शिल्लक असल्याने दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील विविध पक्षाचे नेते, पदाधिकारी हे धावपळ करत असून, शुक्रवारी शेवटच्या दिवशी मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे.

| विभागनिहाय दाखल झालेले अर्ज | |
|---|---|
| सहकारी संस्था सर्वधारण | ८० |
| सहकारी संस्था महिला राखीव | १५ |
| सहकारी संस्था इतर मागासवर्ग | ९ |
| सहकारी संस्था विमुक्त जाती भटक्या जमाती | १७ |
| ग्रामपंचायत सर्वसाधारण | ४१ |
| ग्रामपंचायत अनुसूचित जाती, जमाती | ८ |
| ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल घटक | ४ |
| व्यापारी प्रतिनिधी | २७ |
| हमाल तोलार प्रतिनिधी | ८ |
| एकूण | २०९ |

**अर्ज दाखल, विक्रीचा आढावा**
- आतापर्यंत अर्जाची विक्री: ७८७
- अर्ज दाखल संख्या : २०९
- डबल अर्ज दाखल : २२





# विजापूर रोड भागातील विविध नगरात आजपासून पाच दिवसाआड पाणीपुरवठा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च -**

सध्या शहरामध्ये उन्हाळा चालू झाल्याने पाण्याचा उपसा कमी-अधिक प्रमाणात होत आहे. त्यामुळे शहरातील विजापूर रोड भागातील विविध नगरात शुक्रवार दि. २८ मार्च २०२५ पासून चार दिवसाआड ऐवजी पाच दिवसाआड करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.

सध्या शहरामध्ये उन्हाळा चालू झाल्याने पाण्याचा उपसा कमी-अधिक प्रमाणात होत आहे. त्यामुळे सोलापूर शहरातील विजापूर रोड भागातील आदित्य नगर टाकी, नेहरु नगर टाकी, सैफुल हॉटेल परिसरातील वॉल वरील जयजलाराम नगर, कित्तुर चन्नम्मा नगर, द्वारका नगर, कुरेशी नगर, अत्तार नगर, सुंदरम नगर, अशोक नगर, बेघर सोसायटी, अमृत नगर, शांती नगर, सैफुल चौकातील डावी व उजवी बाजू या परिसरातील पाणी पुरवठा शुक्रवार दि. २८ मार्च २०२५ पासून चार दिवसाआड ऐवजी पाच दिवसाआड करण्यात येणार आहे. शहरातील नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी केले आहे.

# एक एप्रिलपर्यंत आरटीई प्रवेशासाठी मुदतवाढ

## शिक्षण हक्क कायद्यांतर्गत मोफत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

शिक्षणाचा हक्क कायद्यांतर्गट आरटीई २५ टक्के आरक्षित जागांसाठी राबविण्यात येत असलेल्या प्रवेश प्रक्रियेसाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाने एक एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. प्रतीक्षा यादीतील ४४२ विद्यार्थ्यांपैकी १३६ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत.

प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांचे पहिल्या टप्प्यातील प्रवेश १८ ते २४ मार्चदरम्यान पार पडले. मात्र, विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत म्हणून आता मुदतवाढ देण्यात आली आहे.रटीई प्रवेश प्रक्रियेत साधारण प्रतीक्षा यादीतील प्रवेशासाठी साधारणपणे चार फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. त्यामुळे २४ मार्च ते १ एप्रिल ही मुदतवाढ प्रवेशासाठी अंतिम मुदतवाढ राहणार असून, २ एप्रिलनंतर दुसऱ्या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी संधी दिली जाणार आहे.

> **संकेतस्थळावर भेट देऊन अधिकची माहिती घ्या**
>
> सोलापूर जिल्ह्यातील आरटी प्रवेश प्रक्रियेतील प्रतीक्षा यादी जाहीर झाली आहे. प्रतीक्षा यादीतील पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश निश्चित करून घ्यावा. १ एप्रिल ही प्रवेशाची अंतिम तारीख आहे. मोबाईल संदेश प्राप्त न झाल्यास संकेतस्थळावर भेट देऊन अधिकची माहिती जाणून घ्यावे.
>
> **- कादर शेख,**
> शिक्षणाधिकारी प्राथमिक
> जिल्हा परिषद, सोलापूर

# मिळकत कर थकबाकीपोटी मनपाने ५ गाळे, १ गोडाऊन केले सील

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

मार्च एंडच्या दरम्यान महापालिका प्रशासनाकडून मिळकतकर थकबाकी वसुलीची जोरदार मोहीम सुरू आहे. मिळकत कर थकबाकी पोटी आज महापालिकेच्या मिळकतकर संकलन विभागाच्या पथकांकडून विविध दोन पेठांमधील ५ गाळे आणि एक गोडाऊन सील करण्याची कारवाई करण्यात आली.

सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मिळकत कर थकबाकी वसुली व कारवाईची मोहीम सुरू आहे. या अंतर्गत आज महापालिका मिळकत कर संकलन विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्या माध्यमातून विविध पथकाद्वारे वसुली व कारवाई मोहीम राबविण्यात आली.

सोलापूर शहरातील विविध पेठांमध्ये ही मोहीम राबविण्यात येत आहे. आज मिळकत कर थकबाकी पोटी शहरातील पश्चिम मंगळवार पेठ आणि गुरुवार पेठेत थकबाकीपोटी गाळे सील करण्याची कारवाई केली. मिळकत कर वसुलीसाठी शहरातील पश्चिम पश्चिम मंगळवार पेठेतील एक गोडाऊन, एक दुकान



गाळा आणि हॉलचे तीन गाळे सील करण्यात आले तर गुरुवार पेठ येथील एक गाळा सील करण्यात आला आहे.सोलापूर शहरातील मिळकतकर थकबाकीदारांनी आपली थकबाकी भरून कटू कारवाई टाळावी अन्यथा यापुढे सील करण्याची, जप्ती व लिलावाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे,असे आवाहन महापालिका आयुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

# 'त्या' शाळेतील शिपायास वाढीव पोलिस कोठडी

**सोलापूर, दि. २७ मार्च -**

एका नामवंत शाळेत एलकेजीच्या बालिकेचा शिपायाने शारीरीक व मानसिक छळ केल्याची घटना घडली, याप्रकरणी आरोपींवर बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे. आरोपीस अटक करून दोन दिवसाची पोलिस कोठडी मिळाली होती. गुरुवारी पुन्हा एक दिवसाची वाढीव कोठडी मिळाली आहे. फ्रान्सिस आशिष पिंटो (वय ५५, रा. बापूजी नगर) असे आरोपीचे नाव आहे. सहा. पोलिस आयुक्त यशवंत गवारी हे तपास करीत आहेत, पोलिसांनी २० दिवसाचे सीसीटिव्ही फुटेजची तपासणी केली आहे. मात्र पोलिसांच्या हाती काहीच पुरावा सापडला नाही. तपासणीचे काम सुरु असल्याचे गवारी यांनी सांगितले.



# कलावंतांबरोबर विशेष मुलांच्या कलेचा बालरंगभूमी परिषदेतर्फे सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२७ मार्च-**

बालरंगभूमी परिषद जिल्हा शाखा सोलापूरतर्फे जागतिक रंगभूमी दिनाचे औचित्य साधून सोलापुरातील बालकलावंतांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. यामध्ये नृत्य, नाट्य, गायन, अभिनय यामधील गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सर्वसामान्य मुलांबरोबर दिव्यांग विद्यार्थ्यांच्याही कलेचा सन्मान म्हणून मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सीमा यलगुलवार यांनी मुलांचे विशेष कौतुक करून बालरंगभूमी तर्फे संस्कार शिबिर व विविध कार्यक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी प्रमुख अतिथी विद्या काळे, म राजू रंगम , गायकवाड मॅडम , संस्थेचे उपाध्यक्ष शशी भूषण यालगुलवार यांच्या हस्ते नटराजाचे पूजन करण्यात आले. पद्माकर कुलकर्णी व विद्या काळे यांनी नृत्य नाट्य, गायन, अभिनय विविध शिबिरे याविषयी सामान्य कलावंतांबरोबर दिव्यांग कलावंतांनी देखील विशेष शिक्षिका सौ केसकर यांच्या माध्यमातून हावभाव करून सांकेतिक भाषेतून मुक्त संवाद साधला. मुलांनीही आनंदाने त्यात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालरंगभूमी उपाध्यक्ष अर्चना अडसूळ यांनी केले. अन्नपूर्णा साखरे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी बालरंगभूमि परिषदेचे सुभाष माने, मिलिंद ठोंबरे आदी उपस्थित होते.

# ए. जी. पाटील अभियांत्रिकीच्या कार्यशाळेत ४० बांधकाम व्यावसायिकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

विजापूर रोडवरील ए. जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये वेदिक तंत्र वापरून व्यवसाय वृद्धी कशी करावी यावर, पुणे आणि विश्व फाउंडेशन अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेत वेदिक पद्धतीने व्यक्ती व व्यवसाय कसे काम करतात यावर मार्गदर्शन करण्यात आले. क्रिएटिव्ह पॉज, अँनालिसिस, व्यवसायामधील



इनोवेशन कसे करावे, शरीराची व मनाची संरचना कशी असते, तिला वृद्धिंगत कसे करावे, श्वसनावर नियंत्रण कसे मिळवावे, स्वाध्याय कसा करावा, व्यक्तिमत्व कसे डेव्हलप करावे, फायनान्शियल मॅनेजमेंट कसे करावे इत्यादी विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आल्याचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी सांगितले. या कार्यशाळेत पुढील दहा वर्षात व्यवसाय दहा पटीने कसे वाढवता येईल याबद्दल चर्चा झाली, डॉ. एस. पी. कलूरकर, डॉ. आनंद प्रकाश हे एक्सपर्ट होते. या कार्यशाळेत ४० बांधकाम व्यवसायिक उपस्थित होते. विश्व फाउंडेशन अक्कलकोट यांनी यासाठी अग्निहोत्रपात्र व इतर साहित्याची सोय करून दिली होती. याचे आयोजन सिव्हिल डिपार्टमेंटच्या विभाग प्रमुख प्रा. टी. डी. मसलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. सूत्रसंचालन प्रा. पी.एस. स्वामी यांनी केले.

# शालार्थमधील माहिती अद्ययावत करण्याचे आदेश

## ● शिक्षक व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणापूर्वी तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून येत्या मे महिन्यात शिक्षकांचे वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण आयोजित केले जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर ३१ मार्चपर्यंत शालार्थ प्रणालीवर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांची माहिती अद्ययावत करण्याचे आदेश शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांनी दिले आहेत.

वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थीची ऑनलाइन नोंदणी केली जाणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाने शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीची माहिती परिषदेकडे पाठवली होती. मात्र, त्यात नाव, ई मेल आयडी आदी माहिती अपूर्ण असल्याचे आढळून आली आहे. त्यामुळे ती अद्ययावत करण्याबाबत शिक्षण विभागाला कळवले होते. प्रशिक्षणार्थीची सर्व माहिती ऑनलाइन घेतली जाणार आहे. प्रशिक्षणार्थीनी आपल्या शालार्थ आयडीवरील वैयक्तिक माहिती तपासून काही दुरुस्ती असल्यास वेतन पथक कार्यालयाकडे दुरुस्तीसाठी फॉरवर्ड करावी. ती कार्यालयाकडून मंजूर करून घ्यावी. शाळेचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, ई मेल आयडी आदी माहिती अद्ययावत करून घेण्यासाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी मुख्याध्यापक व लिपिकांशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

> **माहीती अद्ययावत करण्याच्या सूचना**
>
> शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची माहीती अद्ययावत करण्याबाबत शिक्षण विभागाकडून सूचना देण्यात आले आहेत. कर्मचाऱ्यांची वैयक्तीक माहीती ऑनलाईन भरून शिक्षण कार्यालयास कळविण्याबाबत सांगण्यात आले आहे.
>
> **- अशोक लिगाडे,**
> मुख्याद्यापक, विंचूर

# आ. कल्याणशेट्टी यांची बाळराजे यांनी घेतली भेट

## भाजप प्रवेशाच्या चर्चेला उधाण; विकास कामासाठी भेट घेतली : बाळराजे

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ दि.२७ मार्च-**

भारतीय जनता पक्षाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष तथा अक्कलकोटचे आमदार सचिन (दादा) कल्याणशेट्टी यांची मोहोळ तालुक्यातील राष्ट्रवादीचे (अजित पवार गट)चे युवा नेते तथा लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील यांनी भेट घेतली. यावेळी उभय नेत्यांमध्ये मोहोळ तालुक्यातील विकासकामांबरोबर जिल्ह्यातील महायुतीच्या राजकीय पक्षसंघटनात्मक बाबी संदर्भात देखील विविध विषयावर चर्चा झाली. मात्र बाळराजे पाटील हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चेला यामुळे उधाण आले आहे.

गेले जवळपास वर्षभर बाळराजे पाटील यांचा भाजपमध्ये प्रवेश होणार होणार अशा चर्चा होत होत्या. मात्र माजी आमदार राजन पाटील यांचा अजित पवारांशी असलेला स्नेहसंबंध पाहता या गोष्टीला कितपत मूर्त स्वरूप येते याकडे सगळ्यांचे लक्ष होते तथापि या प्रवेशाच्या चर्चा वारंवार होत राहिल्या आहेत. दरम्यानच्या काळात लोकसभेमध्ये भाजपाच्या उमेदवारांची हार झाली आणि विधानसभेला उमेदवार पडला. मात्र राज्यात भाजपच्या एकट्याच्या १३३ जागा आल्या आणि अजितदादा पवार व एकनाथ शिंदे यांच्या साह्याने मजबूत आणि स्थिर सरकार राज्य स्थापन झाले उलट शरद पवार गट आणि शिवसेना(उबाठा) आणि उर्वरित विरोधी पक्ष मिळून त्यांना विरोधी पक्षनेते पदापर्यंत मजल मारेल एवढी ही संख्या आमदारांची झाली नाही.

यामुळे पाटील परिवारातील तरुण सदस्यांनी भविष्याच्या दृष्टीने पक्षप्रवेश करण्याचे उचल खाल्ली असल्याची चर्चा आहे या साऱ्या पार्श्वभूमीवर ही भेट झाली आहे. महायुती आणि घटक पक्षातील अंतर्गत समन्वय अधिक वृद्धिंगत करून संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेच्या कामाचा शासनस्तरावर पाठपुरावा करून राज्य शासनाच्या लोकाभिमुख निर्णयाबाबत



अधिक सकारात्मक मत व्हावे यासाठी लोकप्रतिनिधी या नात्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रीअजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही महायुतीचे सर्व आमदार प्रयत्नशील आहोत. मोहोळसह संपूर्ण जिल्ह्यातील मतदारसंघातील विकासाभिमुख वाटचालीसाठी तसेच निश्चितपणे सहकार्य करण्याचे अभिवचन यावेळी जिल्हाध्यक्ष कल्याणशेट्टी यांनी बाळराजे पाटील यांच्याशी बोलताना दिले असल्याचे समजते. यावेळी जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी बाळराजे यांच्या माध्यमातून अनगरकर-पाटील परिवारातील माजी आमदार राजन पाटील यांच्यासह परिवारातील सर्व सदस्यांच्या प्रकृतीची आपुलकीने विचारपूस केली.

गेल्या दोन दशकापासून पाटील आणि कल्याणशेट्टी परिवारातील स्नेह कायम असल्याची सांगत त्यांनी गत सत्ता कालावधीत मंजूर झालेल्या विकासकामांच्या वाटचालीचा विस्तृत आढावा घेतला. यापुढील काळात सुद्धा मोहोळ तालुक्यातील मूलभूत सुविधांसाठी आणि जनहिताच्या कामांसाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री महोदयांच्या विशेष सहकार्यातून निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे ठोस आश्वासन यावेळी दिले. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादीचे शशिकांत पाटील उपस्थित होते.

> **आ. कल्याणशेट्टी कुशल संघटक**
>
> भाजपा जिल्हाध्यक्ष तथा अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी हे एक कार्यक्षम आमदार असण्याबरोबर कुशल पक्षसंघटक देखील आहेत. गेल्या अनेक वर्षापासूनचा आमचा आणि त्यांच्या परिवाराचा आपुलकीचा स्नेहबंध आजही कायम आहे. अक्कलकोट येथील त्यांच्या निवासस्थानी झालेल्या भेटी दरम्यान राजकीय क्षेत्राबरोबर अनेक क्षेत्रातील विविध बाबींवर संवादाबरोबर विविध महत्त्वपूर्ण विषयांवर त्यांच्याकडून मौलिक मार्गदर्शन देखील प्राप्त झाले. या पुढील काळातही मोहोळ मतदारसंघातील विकासात्मक वाटचालीबाबत सातत्याने सहकार्याची भूमिका कायम ठेवण्याचे अभिवचन भेटी दरम्यान त्यांनी दिले.
>
> **- बाळराजे पाटील**
> चेअरमन लोकनेते शुगर




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

## व्ही.व्ही.पी. मध्ये उद्या विझोटेक २०२५ या तांत्रिक स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

व्ही. व्ही. पी. अभियांत्रिकी महाविद्यालयात शनिवार दि. २९ मार्च २०२५ रोजी विझोटेक २०२५ या राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्पस्पर्धा व शोधनिबंध स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अमोल चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विझोटेक २०२५ चे उद्घाटन बालाजी अम ईन्स मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. रामरेड्डी, यांचे हस्ते व महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या उपस्थितीत सकाळी १० वाजता होणार आहे. या स्पर्धेसाठी अर्टिफिशीएल इंन्टेलिजन्स अ‍ॅण्ड डेटा सायनस, सिव्हिल इंजिनिअरींग, कॉम्प्युटर सायन्स अ‍ॅण्ड इंजिनिअरींग, इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग, इलेक्ट्रोनिक्स अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग व मेकॅनिकल इंजिनिअरींग या शाखेच्या विद्यार्थ्यांना विविध विषयावर नाविण्यपुर्ण प्रकल्प सादरी करणावरोबरच रोवोरेस, कोड वार, पीक अ‍ॅण्ड स्पीक, गेमर्स हेल, वॉक्स किकेट व तसेच शोधनिबंध सादर करण्याची संधी मिळणार असल्याने भावी अभियंत्याच्या कल्पक व संशोधन वृत्तीस चालना मिळेल, असे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जी. के. देशमुख यांनी सांगितले. या स्पर्धेसाठी आजपर्यंत कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र अशा विविध राज्यातून नांव नोदणीसाठी उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. विजेत्या स्पर्धकांना एक लाख रूपयांची आर्कषक वक्षिसे व प्रमाणपत्र मिळणार आहेत. या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कॅम्पस डायरेक्टर व प्राचार्य डॉ. अरूण गायकवाड व तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस-एन. कुलकर्णी, प्रा. अमोल चव्हाण यांनी केले आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### सावळेश्वर टोळ नाका येथे दोघांना मारहाण, जखमींची तक्रार

**सोलापूर, दि. २७ मार्च -**

सोलापूर-पुणे महामार्गावरील सावळेश्वर येथील टोळनाक्यावर फास्टटॅग काढत असताना झालेल्या भांडणाडतून दोघांना मारहाण केली. हा प्रकार बुधवारी दुपारी २.३० च्या सुमारास घडली.रोहन गुंडीबा निळ (वय ३३) व रणजित धोडिंबा निळ (वय ३३, दोघे रा. सावळेश्वर ता. मोहोळ) अशी मारहाण करणा-यांची नावे आहेंत. रोहन हे बुधवारी दुपारी वाहन घेऊन सावळेश्वर टोळ नाका येथून जात होते. त्यावेळी त्याच्यात आणि तेथील ओंकार कल्याणी धर्मशाळे व आनंद कल्याणी धर्मशाळे यांच्यात फास्ट टॅग काढण्यावरून वाद झाला. या वादातून ओंकार आणि आनंद यांनी रोहन व रणिजित यास लाथाबुक्यांनी मारहाण केली. या मारहाणीत रोहन आणि रणजित या दोघांच्या चेह-यावर जखम झाली आहे. मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करून डॉक्टरांच्या सल्ल्याने रुग्णालयात उपचारास दाखल करण्यात आल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कारला लक्झरीची पाठीमागून धडक, दोन महिला जखमी

**सोलापूर, दि. २७ मार्च -**

पुणेहून तांदुळवाडी येथे कारमधून जाताना तांदुळवाडीजवळ गुरुवारी सकाळी ६ वाजता पाठीमागून वेगाने आलेल्या लक्झरी बसच्या चालकाने धडक दिली. या अपघातात दोन महिला जखमी झाल्या आहेत. रक्साना मौला चौधरी (वय ४५) व सानिया मौला चौधरी (वय १९, दोघी रा. दर्शनाळ ता. अक्ककोट) अशी जखम ींची नावे आहेत. रुक्साना आणि सानिया या पुणे येथून दर्शनाळ या गावी जाण्यासाठी कारमधून प्रवास करत होत्या. ते तांदुळवाडीजवळील किर्ती गोल्डजवळ आली असता, पाठीमागून आलेल्या लक्झरी बसची त्यांच्या कारला पाठीमागून धडक बसली. या अपघातात दोघींच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना जावई निसार शेख यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### दाखला काढल्याची विचारणा केल्याने दोघांना मारहाण

**सोलापूर, दि. २७ मार्च -**

मोहोळ तालुक्यातील तरटगावात दाखला का काढला अशी विचारणा केल्याने महिलेस दोघांना बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार गुरुवारी सकाळी ९.३० वाजता घडला. विशाल विलास पाटील (वय ३०) व लक्ष्मी अनिल पाटील (वय ३५, दोघे रा. तरटगाव ता. मोहोळ) अशी मारहाण झालेल्यांची नावे आहेत. तरटगावात राहते घराजवळ जखमींनी रणसिध्द पाटील यास दाखल का काढला अशी विचारणा केली. त्यावर चिडलेल्या रणसिध्द व त्याच्या चार साथीदारांनी लाथाबुक्यांनी विशाल आणि लक्ष्मी यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. कामती येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून स्वत: शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### ७० फुट रोडवर मोबाईलची चोरी

**सोलापूर, दि. २७ मार्च -**

घराच्या गच्चीवर ठेवलेला २४ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला.याबाबत मोनिश किसन अंबुरे (वय २२, रा. इंदिरा नगर, ७० फुट रोड, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ मार्च रोजी रात्री मोनिश अंबुरे याने घराच्या गच्चीवर २४ हजार रुपये किंमतीचा मोबाईल ठेवला होता. तो मोबाईल चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिसांत आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक जगताप पुढील तपास करीत आहेत.

### बेलाठी येथे १६ हजारांचे साहित्य चोरीस

**सोलापूर, दि. २७ मार्च -**

बेलाटी येथे चोरट्याने घरासमोर ठेवलेले १६ हजार रुपये किंमतीचे साहित्य चोरून नेले. याबाबत बाळू शिवाजी पवार (वय ३५, रा. सकीना नगर, बेलाटी, ता. उत्तर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ मार्च रोजी रात्री बाळू पवार यांच्या घरासमोर ठेवलेली सबमर्सिबल इलेक्ट्रिक मोटार, वायर, स्टार्टर, अ‍ॅटो स्विच असा १६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार यलगुलवार पुढील तपास करीत आहेत.

# जुना एम्प्लॉयमेंट ते फॉरेस्ट रोड भाजी विक्रेत्यांकडून हायजॅक; रहदारीस अडथळा

**● मंडईचे ओटे पडले ओस, रस्त्यावर भरते मार्केट; महापालिका प्रशासनाचे दुर्लक्षच**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील विविध परिसरात विशेषतः प्रमुख रस्त्यावर भरणाऱ्या भाजी मार्केटच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. रहदारीच्या रस्त्यावर भाजी विक्रेत्यांचे अतिक्रमण वाढत असल्याने वाहनधारकांना विरुद्ध दिशेने वाहने चालवावी लागत आहेत. त्यामुळे वाहनधारकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अशावेळी अपघाताचे प्रमाण वाढत आहे. याकडे महापालिका प्रशासनाने व वाहतूक शाखेच्या पोलिसांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

दरम्यान, शहराच्या प्रमुख व्ही.आय.पी. रस्त्यालगत असणाऱ्या फॉरेस्ट रोडवर गेल्या अनेक दिवसांपासून भाजीविक्री केली जाते. त्यामुळे रस्त्यांची एक बाजू पूर्णपणे व्यापून जात आहे. अशा अवस्थेत वाहनधारकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. रस्त्याच्या विरुद्ध दिशेने जाताना अपघाताचा मोठा धोका निर्माण होत आहे. वाढत चाललेले अतिक्रमणमुळे हा रोड आहे का? भाजी मार्केट हेच कळेनासे झाले आहे. सोलापूर स्मार्टसिटीत एकीकडे कचरा संकलन व व्यवस्थापनाचा पुरता बोजवारा उडालेला असताना त्यात आणखीन भर म्हणून प्रमुख रस्त्यावरच भाजी मार्केट भरवले जाते आहे. यामुळे वाहतूक कोंडी आणि रस्त्यांवर कचऱ्याचे साम्राज्य दिवसेंदिवस वाढतच चालले आहे.





▶▶सोलापूर महानगरपालिका सोलापूर स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत येथे कचरा टाकू नये. टाकल्यास दंडात्मक कारवाई करण्याचा बोर्ड लिहिला परंतु तेथेच कचरा टाकला... जुन्या फ्रिजमध्ये कचरा भरल्याचे बोलके छायाचित्र

▶▶दुसऱ्या छायाचित्रात जुना एम्प्लॉयमेंट चौक ते फॉरेस्ट रोडवर भाजीविक्रेत्यांचे अतिक्रमण वाढल्याने रिक्षाचालकाला विरुद्ध दिशेने रिक्षा चालवावी लागली. वाढलेल्या अतिक्रमणाकडे महापालिका आयुक्तांनी लक्ष देण्याची गरज.

याकडे महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे कारवाई करावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. नागरिकांकडून स्वच्छता कर आकारणी केली जाते. सोलापूर शहरात येणाऱ्या इतर जिल्ह्यातील वाहनधारकांना तसेच प्रवाशांना हा रस्ता पाहिल्यानंतर रहदारीचा रस्ता आहे की नाही असा प्रश्न उद्भवत आहे. याठिकाणी भाजी विक्रेत्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. रेल्वे स्टेशन पासून ते एम्प्लॉयमेंट चौकापर्यंत विक्रेत्यांची रांग दिवसागणिक वाढतच आहे. यामुळे रस्त्याची एकाबाजूला विक्रेत्यांसह ग्राहकांची संख्या देखील वाढत आहे.

**वाढती गर्दी ठरते अपघाताला आमंत्रण**

सदरचा स्मार्ट सिटीचा हा रस्ता भाजी विक्रेते आणि खरेदीदार यांच्या वाढत्या अतिक्रमणामुळे हायजॅक झालेला आहे. यारस्त्यांच्या बाजूला वाहने उभे करून खरेदी विक्री केली जाते. रिक्षा यांसह विविध मालवाहतूक वाहने रस्त्यावर उभी केली जातात. अपघाताच्या धोक्यामुळे वाहनधारक या रस्त्यावरून वाहने चालवण्यास धजावत नाहीत. अशा रोडवरून वाहन चालवणे अत्यंत जिकरीचे आणि धोकादायक बनले आहे. याकडे महापालिका प्रशासन संबंधित मंडई विभाग आणि अतिक्रमण विभागाचे सातत्याने दुर्लक्ष होताना दिसत आहे.

**भाजीमार्केट साठी आरक्षित केलेली जागा पडली ओस**

शहरातील विविध भागात सार्वजनिक भाजी मंडई महापालिका प्रशासनातर्फे उभे करण्यात आली आहे. शहरात चिप्पा मार्केट, चैतन्य मार्केट, असे विविध मार्केट साठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र येथील भाजी मार्केट अनुक्रमे ७० फूट रोडवर आणि विजापूर रोडवर भरवले जातात. मात्र आरक्षित केलेल्या भाजी मंडईच्या जागेत भाजी मंडई भरली जात नाही. अशामुळे त्या जागेवर गैरप्रकार घडले जातात. याकडे महापालिका प्रशासनाने विशेषतः महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

## हिंदू नववर्ष महोत्सव समितीतर्फे रविवारी शहरात शोभायात्रा

**हिंदू बांधवांना सहभागी होण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

हिंदू नववर्ष महोत्सव समितीतर्फे रविवार ३० मार्च रोजी शहरात दोन ठिकाणी भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समितीचे संस्थापक रंगनाथ बंग आणि उत्सव समितीचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम यांनी पत्रकार परिषदेत केले.




पहिली शोभायात्रा बाळीवेस येथील विजयी चौकातून दुपारी ४.३० वाजता प्रारंभ होणार आहे. या शोभायात्रेत विशेष सजीव देखावा, भारतमाता प्रतिमा, एलईडीवर प्रयागराज महाकुंभ, श्री अयोध्या मंदीर, श्री मथुरा मंदिर आणि श्री काशी विश्वेश्वर मंदीर चित्रफीत दाखविली जाणार आहे. छत्रपति श्री शिवाजी महाराज, बाल श्री संभाजी महाराज आणि मावळे असा सजीव देखावा असणार आहे. देवतांची वेशभूषा केलेली आणि सजवलेल्या बग्गीत बसलेली मुले असणार आहेत. महिला सक्षमीकरणासाठी लाठी काठी प्रदर्शन, काटवे यांचे भरतनाट्यम सादर करण्यात येणार आहे. स्वामी यांचे रूद्र पठण, मारवाडी महिला मंडळ, पद्मशाली महिला मंडळ, पंचमुखी हनुमान मंदीर मुर्ती देखावा, आजोबा गणपती यांचे १०० जणांचे ढोल पथकही सहभागी होणार आहे. तसेच आकर्षक रांगोळीने सजावट केली जाणार आहे.

दुसरी शोभायात्रा जुळे सोलापूर परिसरातून काढण्यात येणार आहे. दुपारी ४.३० वाजता ही शोभायात्रा किल्लेदार मंगल कार्यालय येथून प्रारंभ होणार असून केएलई शाळेजवळ येथे समारोप होईल. दरवर्षीप्रमाणे हिंदू नववर्ष शोभायात्रेत हिंदू बंधू - भगिनींनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे असे आवाहन रंगनाथ बंग यांनी केले.

या पत्रकार परिषदेस उत्सव समिती अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, संस्थापक अध्यक्ष रंगनाथ बंग, कोषाध्यक्ष नितीन करवा, सचिव ज्ञानेश्वर म्याकल, प्रकाश कलकोटे, बाळीवेस शोभायात्रा प्रमुख चिदानंद मुस्तारे, जुळे सोलापूर शोभायात्रा प्रमुख जयदेव सुरवसे, महिला सांस्कृतिक प्रमुख अ‍ॅड. शर्वरी रानडे, नाशिककर आदी उपस्थित होते.

**नववर्ष स्वागत शोभा यात्रेत अयोध्या येथील रामलल्लाचे दर्शन**

यंदाच्या शोभायात्रेत सोलापूरकरांसाठी श्री अयोध्या येथील रामलल्ला मूर्तीचेही दर्शन होणार आहे. तसेच भारतमाता रथ आदींचा समावेश असणार आहे. ही शोभायात्रा बाळीवेस चौकातून प्रारंभ होऊन टिळक चौक, मधला मारुती, माणिक चौक, दत्त चौक, नवीपेठ, पारसइस्टेटमार्गे शिवस्म ारक पटांगणात विसर्जित होईल.

## अरेरे..वृध्द कलाकारांवर उपासमारीची वेळ

**▸ तीन वर्षांपासून मानधन रखडलेलेच ▸ पुढील काळात ग्रामपंचायतीकडून मिळणार मानधन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

कला क्षेत्रात कार्यरत कलाकारांना तसेच ज्येष्ठ साहित्यिकांना राज्य सरकारकडून दरमहा मानधन देण्यात येते. या क्षेत्रात दहा ते पंधरा वर्षे कार्य केलेल्या व ५० वर्षापुढील लाभार्थ्यांना हे मानधन देण्यात येते. भजन, कीर्तन, गोंधळी, आराधी, तमाशा, गायक तसेच साहित्यिक या क्षेत्रातील व्यक्तीला हा लाभ दिला जातो. वृध्दापकाळात वृध्द कलावंतांना आर्थिक अडचणीना सामना करावा लागू नये. तसेच त्यांच्या दैनंदिन गरजासाठी त्यांना दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची गरज भासू नये. म्हणून राज्य सरकारनी कलाकार मानधन योजना सुरु केली आहे.

मात्र गेल्या तीन वर्षापासून समितीच गठीत नसल्याने सोलापूर जिल्ह्यातील १ हजार ८१ ज्येष्ठ साहित्यिक व वृध्द कलावंतांचे मानधन रखडले आहे. त्यामुळे साहित्यिक, कलावंतांवर उपासमारीची वेळ आली आहे. यापुढील काळात ग्रामपंचायतीकडून कलाकारांना मानधन देण्यात येणार आहे.



कलाकार मानधनासाठी अ , ब,क असे वर्ग करण्यात आले आहे. त्यात अ वर्गासाठी ३ हजार १५० रुपये, ब वर्गासाठी २ हजार ७०० रुपये तर क वर्गासाठी २ हजार २५० रुपये असे मानधन दिले जाते. हे मानधन प्रत्येक महिन्याला संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केले जातात. मात्र सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या तीन वर्षात समिती गठीत करण्यात आली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील १ हजार ८१ कलाकारांवर सध्या मानधन रखडल्याने उपासमारीची वेळ आली आहे.

मानधन मिळत नसल्याने अनेक लाभार्थी जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाकडे रोजच चकरा मारत आहेत. मात्र त्यांना गेल्या तीन वर्षापासून आश्वासनाशिवाय काहीच न नसल्याने नाराज होऊनच त्याना माघारी परतावे लागत आहे. गेल्या तीन वर्षात समिती गठीत नसल्याने जिल्ह्यातून नव्याने दाखल झालेले एकूण ७४७ अर्ज जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे मंजुरीविना पडून आहेत. अनेक कलावंत समाजकल्याण विभागाकडे हेलपाटे मारत आहेत. आलेल्या अर्जानुसार प्रतिवर्षी शंभर अर्ज मंजूर करण्यात येतात. मात्र गेल्या तीन वर्षामध्ये आलेल्या अर्जाची संख्या मोठी आहे. तेव्हा नवीन अर्जाबाबत नवीन समिती गठीत झाल्यानंतरच मंजुरी मिळू शकते. प्रतीक्षा करावी लागणार आहे.

**ग्रामपंचायतकडे योजना वर्ग**

यापूर्वी समाजकल्याण कार्यालया कडून कलाकार व साहीत्यिकांना मानधन देण्यात येत होते. मात्र नवीन नियमानुसार कलाकार व साहीत्यिक मानधन योजना ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आली आहे. समाजकल्याण कार्यालयाकडून माहीती हस्तांतर प्रक्रिया सुरू असून प्रलंबित प्रकरणांची ग्रामपंचायतीकडून निपटारा होईल.

**- सुलोचना सोनवणे,**
समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परीषद सोलापूर

## अपंग व दिव्यांगांच्या स्वावलंबनासाठी समाजकल्याणकडून १ कोटी ८५ लाखांची तरतूद

**▸ अपंगांच्या ई रिक्षा व ई बाईकसाठी १ कोटी ३० लाख**
**▸ दिव्यांगांच्या पालकांसाठी १० लाखांची तरतूद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग ग्रामीण भागातील मागासवर्गीय, विद्यार्थी, वस्तीगृह, दिव्यांग व अपंगांच्या कल्याणास प्राधान्य देण्यात येते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी अर्थसंकल्पात समाजकल्याण विभागासाठी ४ कोटी ६१ लाख निधीची तरतूद केली आहे.

मागील वर्षी मूळ अंदाजपत्रक ४ कोटी ७५ लाख तरतूद होती, तर सुधारीत अंदाजपत्रक ५ कोटी १४ लाख होता. तर यावर्षी ४ कोटी ६१ लाख निधीची तरतूद करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्हा परिषद सम ाजकल्याण विभागाकडून यावर्षी अर्थसंकल्पात अनेक नाविन्यपूर्ण योजनांचा समावेश करून लाभार्थ्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी ग्रामीण भागातील मागासवर्गीय, दिव्यांग व अपंगांच्या कल्याणासाठी १ कोटी ८५ लाखांची तरतूद केल्याने लाभार्थ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

**ई रिक्षा व ई बाईकमुळे अपंग व्यक्तींचा त्रास कमी**

यापूर्वी जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाकडून अपंग व्यक्तींना स्वयंचलित सहायभूत साधने व तंत्रज्ञानासाठी अनुदान देण्यात होते. मात्र यावर्षी सीईओ कुलदीप जंगम यांनी अपंगांच्या कष्टाला बळ देण्यासाठी स्वयंचलित ई रिक्षा व ई बाईकसाठी भरघोस १ कोटी ३० लाख निधीची तरतूद केली आहे. यामुळे अपंग व्यक्तींना हाताने सायकल चालविण्यासह प्रवास करण्यासाठीचे त्रास कमी होणार आहे.

**● मागील योजनांसाठी निधी**

- ▶▶मागासवर्गीयांना शेळीपालन गट, गाई / म्हैस खरेदीसाठी ४० लाख अनुदान
- ▶▶मागासवर्गीय विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षणासाठी ३० लाख
- ▶▶तांत्रिक प्रशिक्षण योजनांतर्गत संगणक प्रशिक्षणासाठी ३० लाख
- ▶▶अपंग स्वयंसहायता समुहांना लघु उद्योगासाठी अनुदान १० लाख
- ▶▶अपंग व्यक्तींना शेळीपालन गट अनुदान ३० लाख

**● नाविन्यपूर्ण योजनांसाठी निधी**

- ▶▶मुलींचे वस्तीगृह सोलापूरमध्ये अभ्यासिका , अ‍ॅक्टीविटी रूम, वॉटर हिटर साठी २० लाख
- ▶▶मागासवर्गीय वसतीगृहांना बंकर बेड पुरविणे ४० लाख
- ▶▶अपंग व्यक्तींना स्वयंचलित सहायभूत साधने व तंत्रज्ञानाकरिता अर्थसहाय योजनेअंतर्गत ई रिक्षा / ई बाईकसाठी १ कोटी ३० लाख
- ▶▶अपंगाना झेरॉक्स मशिन पुरविणे १० लाख,
- ▶▶अतितीव्र दिव्यांग मुलांच्या पालकांना मदत दिव्यांग नवसंजीवनी योजना १० लाख
- ▶▶दिव्यांग शाळांना सोलर हिटरसाठी २५ लाख

**नाविन्यपूर्ण योजनांमुळे आर्थिक सहाय्य**

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी अपंग व दिव्यांगांच्या कल्याणासाठी अर्थसंकल्पात भरीव निधी दिला आहे. ग्रामीण भागातील अतीतीव्र दिव्यांग मुलांचे पालनपोषण करण्यासाठी पालकांसाठी दिव्यांग नवसंजीवनी योजना सुरू केली आहे. यामुळे दिव्यांगांसाठी आर्थिक सहाय होणार असल्याने दिव्यांगांच्या जीवनातील कष्ट कमी होण्यास मदत होणार आहे.अपंगांनाही ई रिक्षा व ई बाईक मिळणार असल्याने त्यासाठी भरीव निधीची तरतूद केली आहे.

**- सुलोचना सोनवणे,**
**समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर**

## जोशी गल्लीत पतीने केली पत्नीला पोळपाटाने मारहाण

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

कौटुंबिक कारणातून पतीने पत्नीला चपाती करावयाच्या पोळपाटाने मारहाण केली. हा प्रकार उत्तर सोलापूर तालुक्यातील तळेहिप्परगा येथील जोशी गल्लीतील एकता नगरात गुरुवारी सकाळी ८ वाजता घडला. प्रियंका सुनील मस्के (वय ३०) असे मारहाण झालेल्या मिहिलेचे नाव आहे. प्रियंका आणि त्यांचे पती सुनील यांच्यात गुरुवारी सकाळी आठ वाजता कौटुंबिक कारणातून तक्रार झाली. यानंतर पती सुनील याने चपाती करावयाच्या पोळपाटाने प्रियंकाच्या डोक्यात मारले. यामुळे डोक्याला व सर्वांगास मुकामार लागल्याने सकाळी ११.३० वाजता पती सुनील याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## एक वर्षाच्या बाळासह आईला मारहाण

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

बोराळे गावी बहिणीला सोडविण्यासाठी गेल्यानंतर तेथे आईसह एका वर्षाच्या बाळाला मारहाण करण्यात आली. हा प्रकार बुधवारी रात्री दहाच्या सुमारास घडला. जया रवि चव्हाण (वय २५) व वैभवी रवि चव्हाण (वय १ वर्ष, दोघी रा. भाजी मार्केट, मोहोळ) अशी मारहाण झालेल्या मायलेकीची नावे आहेत. जया या बुधवारी बोराळे गावी बहिणीला सोडण्यासाठी गेल्या होत्या. तेथे अज्ञात कारणातून रवि नारायण चव्हाण व सुनील चव्हाण यांनी लाथाबुक्यांनी मारहाण करून ढकलून दिले. त्याति सर्वांगास मुका मार लागल्याने रात्री १०.४५ वाजता आजी सविता साळुंखे यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०६९

**तोंडाळासी भांडो नये । वाचाळासी तंडो नये ।**
**संतसंग खंडू नये । अंतर्यामी ।।**

एखादयाने आपल्याबद्दल अयोग्य बोललेले दुस-याने ऐकले असेल तर तो ऐकणारा आपणास त्याने बोललेल्या शब्दांपेक्षा जास्तीचे शब्द सांगू शकतो. अशा सांगण्यात त्याला आनंद वाटतो. तो आनंद मिळवित असतो आणि आपण मात्र दु:खी होतो. एखादयाने आपल्याबद्दल चांगले का बोलू नये किंवा वाईट का बोलावे हा त्याचा भाग आहे. अर्थात, ही बाब आपल्या हाती नसते, हे सत्य असले तरी आपण त्याच्या बोलण्यावर आपल्या वाट्याला दु:ख येईल ईतका विचार न करणे, ही बाब आपल्या हाती असते. बोलणा-याच्या तोंडावर हात ठेवता येत नसला तरी, काय ऐकायचे, काय ऐकायचे नाही या बाबत आपण आपल्या कानांना, मनाला सांगू शकतो. म्हणजेच आपल्या कानावर आपण हात ठेवू शकतो. जे ऐकायचे नाही त्याबाबत आपण आपले कान ताब्यात ठेवले तर आपण आपले सुख ताब्यात ठेवले असे म्हणाता येईल.



ब-याचवेळा इतरांशी गप्पा मारतांना शब्दाने शब्द वाढत जातो, चांगल्या बैठकीचा रंग बेरंग होतो, वादविवाद होतात, मूळ कारण कांहीही नसते, केवळ बोलता बोलता शब्दाने शब्द वाढत जाणे एवढेच कारण असते. एखाद्याने अयोग्य बोलण्याची सुरुवात केली तरीही ऐकणा-याने त्याकडे दुर्लक्ष केले असते तर बोलणारा बोलून बोलून कोठेतरी थांबलाच असता. पण आपले बोलणे समोरचा ऐकत आहे, त्याला चिड येत आहे, वाईट वाटत आहे असे वाटले तर बोलणारा बोलतच जातो व त्यामुळे त्या बोलण्याचे भांडण तंट्यात रुपांतर होते. वाईट, खोडसाळ शब्द चांगल्या बैठकीला, मैत्रीला कलंकीत करतात. शब्द हे शस्त्र आहे, ते जपुन वापरावेत तसेच अज्ञानात आनंद असतो म्हटले जाते. त्यामुळे काही वेळा अयोग्य बाबतीत अज्ञानी होणे बरे असते. लेकी बोले सुने लागे असे बोलण्याची अनेकांना सवयच असते. असे बोल आपल्यासाठी आहेत असे जेंव्हा आपण समजतो तेंव्हा वाईट वाटायला, राग यायला सुरुवात होते. म्हणून हे बोल आपल्यासाठी नाहीतच असे आपण आपल्या कानांना, मनाला सांगून ठेवावे. संसारामध्ये लहान सहान गोष्टी वरून पती पत्नीत वाद होतात. एखाद्या वेळी पती बोलला तर पत्नीने ऐकून न ऐकल्या सारखे करावे, पत्नी बोलली तर पतीने ऐकून न ऐकल्यासारखे करावे, सासू बोलली तर सुनेने, सून बोलली तर सासूने दुर्लक्ष करावे. मुद्याम भांडण उकरून काढण्याची अनेकांना सवय असते. आपण अशा तोंडाळाशी बोलत गेलो तर भांडण होणारच असते. म्हणून श्री समर्थ रामदासांच्या,

**तोंडाळासी भांडो नये । वाचाळासी तंडो नये ।**
**संतसंग खंडू नये । अंतर्यामी ।।**

या वचनांप्रमाणे वागण्याचा प्रयत्न केला तर आनंदामृत निश्चितच वाढेल.**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : शुक्रवार** | **दिनविशेष - चांगला दिवस, शब-ए-कद्र, अमावास्या, जमातुल विदा** |
| **दि. २८ मार्च २०२५** | **....राहू काल....** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **शके - १९४६** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **मास - फाल्गुन** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **कृ. चतुर्दशी (१९.५६)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **ऋतु - वसंत** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **नक्षत्र - पू. भाद्रपदा (२२.०९)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |
| **योग - शुक्ल (२६.०६)** | |
| **करण - विष्टि (०९.३२)** | |

### राशीभविष्य

**मेष :** आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ :** समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन :** व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील. प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. आजचा दिवस चांगला जाणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु :** नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** नवीन संबंध फायदेशीर ठरतील. श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल.

# वीज ग्राहकांचा २४ एप्रिलला महावितरण कार्यालयावर मोर्चा

## सीटूची स्मार्ट मीटर विरोधात अर्ज संकलित मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

सध्या महावितरण कंपनीने राज्यातील सर्व वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावणार, असे जाहीर केले आहे. तसेच हे मीटर्स कंपनीच्या खर्चाने मोफत लावणार अशी फसवी व चुकीची जाहिरात केली आहे. या संबंधी निविदा मंजूर करण्यात आलेली आहे व लवकरच सर्वत्र मीटर्स लावण्याची मोहिम सुरु होईल, असे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे या स्मार्ट/प्रीपेड मीटर्सना संपूर्ण विरोध आहे. वीज वापर करणाऱ्या हजारो ग्राहकांच्या प्रीपेड मीटर विरोधात अर्ज संकलित करण्याची मोहीम संपूर्ण शहरात राबवण्याची मोहीम हाती घेतली असून येत्या २४ एप्रिल रोजी ग्राहकांचा मोर्चा वीज महावितरण कंपनीच्या कार्यालयावर काढणार असल्याची माहिती सीटूचे ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.




वास्तविक हे मीटर्स मोफत लावले जाणार नाहीत. केंद्र सरकारचे अनुदान वगळता या मीटर्सचा उर्वरित सर्व खर्च वीजदर निश्चिती याचिकेद्वारे आयोगाकडे मागणी केली जाईल आणि आयोगाच्या आदेशानुसार वीजदरवाढीच्या रुपाने १ एप्रिल २०२५ पासून ग्राहकांच्या खिशातूनच वसूल केला जाईल, हे निश्चित व स्पष्ट आहे. त्यामुळे केवळ महावितरण कंपनी वा येणाऱ्या खाजगी वितरण कंपन्या वा सरकार यांच्या हितासाठी आणि खाजगीकरणाच्या वाटचालीतील पुढचा टप्पा म्हणूनच ही योजना आणलेली आहे असे स्पष्ट दिसून येत आहे.

स्मार्ट प्रीपेड मीटर विरोधात वीज ग्राहकांकडून अर्ज संकलित करण्याची मोहीम हाती घेण्यात आली. यावेळी ॲड.अनिल वासम यांची उपस्थिती होती. सदर ग्राहकांच्या मागण्यांमध्ये वीज कायदा २००३ मधील अधिनियम क्रमांक ४७ (५) अन्वये कोणता मीटर वापरायचा याचे स्वातंत्र्य व मीटरची निवड करण्याचे सर्व कायदेशीर हक्क संबंधित ग्राहकांना आहेत. कंपनी अघोषित सक्ती करुन ग्राहकांच्या या हक्काचे व कायदेशीर तरतुदींचे संपूर्ण उल्लंघन करीत आहे, हे आम्हाला मान्य नाही. त्यामुळे ग्राहक म्हणून आमच्या हक्कानुसार आमचा सध्याचा आहे तोच पोस्टपेड मीटर पुढेही कायम ठेवण्यात यावा अशी मागणी आम्ही करीत आहोत. महावितरण कंपनीने मंजूर केलेल्या टेंडर्सनुसार खर्च १२ हजार रुपये प्रति मीटर याप्रमाणे आहे. मीटरसाठी केंद्र सरकारचे प्रति मीटर ९०० रुपये अनुदान वगळता प्रत्येक ग्राहकामागे कमीत कमी ११ हजार १०० रुपये प्रति मीटर खर्च कर्ज काढून केला जाणार आहे. या कर्जास आमची मान्यता नाही व आम्ही हा मीटर घेणार नाही. त्यामुळे हा खर्च आमच्यावर लादता येणार नाही. या खर्चामुळे या कर्जावरील व्याज, पसारा व संबंधित खर्च इ. कारणासाठी वीज दरामध्ये वाढ होणार आहे. ही वाढ अंदाजे किमान ३० पैसे प्रति युनिट व अधिक होईल. आम्ही हा मीटर वापरणार नसल्यामुळे या वाढीव दराचा कोणताही बोजा आमच्यावर लावता येणार नाही याची नोंद घ्यावी. माहितीसाठी आमच्या अंतिम बिलाची प्रत सोबत जोडली आहे. कृपया आमच्या वरील मागण्यांची नोंद घ्यावी आणि याबाबत पुढील कार्यवाही तातडीने करावी. सक्तीने असे मीटर लावण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही अशा सक्तीच्या जोडणीला प्रखर विरोध व आंदोलन करु याची कृपया नोंद घ्यावी, अशी मागणी केली आहे. यावेळी सनी शेट्टी, बालाजी गुंडे, मोहन जंगम, राजू नाईक, बालाजी देवेकर, अंबादास उपलवार, अक्षय चन्नेपगुलु, चिदानंद चन्नेपागुल, नागेश म्हेत्रे, किशोर म्हेत्रे, सागर अनबी, लक्ष्मण मिसालोळू आदींनी परिश्रम घेतले आहे.



## श्री चतुरबाई श्राविका प्राथमिक विद्यालयात इंटरॲक्टिव्ह स्मार्ट बोर्ड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

श्री.चतुरबाई श्राविका प्राथमिक विद्यालयात इंटरॲक्टिव्ह स्मार्ट बोर्डचे उदघाटन उत्साहात पार पडले. सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी काळाच्या बदलांनुसार अपडेट व्हायला हवे. या दृष्टीने शाळेत स्मार्टबोर्ड बसवण्यात आला. या स्मार्टबोर्डच्या साह्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण कमी वेळेत गुणवत्तापूर्ण दर्जेदार व आनंददायी पद्धतीने तर होतेच याशिवाय विशेष बाब म्हणजे विद्यार्थ्यांचा प्रतिसाद नोंदवता येतो. विद्यार्थी व शिक्षक असा दोघांचाही सहभाग या स्मार्टबोर्डच्या साह्याने घेता येतो. सर्व प्रकारचे ॲप पझल गेम्स वेगवेगळे इ.साहित्य वापरुन शिक्षणप्रक्रिया मनोरंजक होते.

शाळेच्या या उपक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समिती पालक शिक्षक संघटना विश्वस्त शिक्षक यांचे योगदान लाभले . याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त यतिन शहा, करण शहा, अंजली शहा, डॉ. रोहिणी शहा, अतुल शहा, सीईओ देवई शहा मुख्याध्यापिका राखी देशमाने यांचे प्रेरणा व मार्गदर्शन लाभले.

शाळेच्या या उपक्रमाबद्दल उपस्थित पालकांनी शाळेचे कौतुक करुन सर्व वर्गांना असे स्मार्ट बोर्ड सर्व पालकांच्या सहकार्याने तयार करु, असे आश्वासन दिले.

या उपक्रमाच्या पुर्ततेसाठी शाळेतील तंत्रस्नेही शिक्षक प्रदिप डेरे, रोहन शहा, सुरज व्हसाळे, अरिहंत माणिकशेट्टी यांचे सहकार्य लाभले.

## स्मशानभूमीत गोशाळेच्या संस्था प्रमुखांचे नाव, मोबाईल नंबर यादी लावण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

ग्रीन क्रेडिट प्रोग्राम अंमलबजावणी नियम २०२३ कार्बन क्रेडिट अंतर्गत सोलापूर शहर व जिल्ह्यातील असणाऱ्या गोशाळा स्वावलंबन व आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी गोसंवर्धन संस्था गोशाळेतील दूध न देणारी (भाकड) राज्य गोमातेच्या शेणापासून तयार झालेल्या देशी गोवरी माणसांच्या अंतविधीसाठी विक्री व देशी राज्य गोमाता, पर्यावरण जनजागृती प्रसारासाठी सोलापुरातील महापालिका हद्दीतील स्मशान भूमी व जिल्ह्यातील सर्व स्मशानभूमी येथे दर्शनी भागावर देशी गोवरी उपलब्ध करून देणाऱ्या गोशाळेच्या संस्था प्रमुखांचे नाव व मोबाईल नंबर यादी फलक लावण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली.




निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार व जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची शिष्टमंडळाने भेट घेऊन वरील मागणीचे निवेदन दिले होते. लाकडा ऐवजी गोमातेच्या शेणा पासून बनविलेल्या गोवऱ्याचा वापर अंतीम संस्कारा करावा असे निवेदनात मागणी करण्यात आली आहे, कत्तलखान्यात कत्तलीसाठी जाणारी देशी गोमाता अनेक गोरक्ष पोलीसांच्या सहकार्याने वाचवत आहेत; सगळी भाकड गोवंशाचा खर्च गोशाळेना परवडणारा नाही म्हणून या योजने मुळे गोवऱ्या विकून त्यांचे थोडे उत्पन्न देखील वाढेल. याची महापालिका आयुक्त डॉ. ओंबासे यांनी तात्काळ दखल घेऊन महापालिका उपायुक्त संदीप कारंजे यांना गोशाळा अध्यक्षांची बैठक घेण्यास सांगितले होती. या बैठकीत पर्यावरण व स्वालंबन गोशाळा यावर सकारात्मक ठोस निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. यावेळी विविध ठिकाणाहून गोशाळा चालक आले होते.

## 'सिंहगड'ने अनाथाश्रमातील मुलांसोबत साजरी केली रंगपंचमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

केगाव येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनी पालवी (पंढरपूर) या संस्थेला भेट देऊन तेथील चिमुकल्यांसोबत रंगपंचमी साजरी केली. यातून एक वेगळा अनुभव अनुभवास मिळाला.

एड्सने बाधित मुलांची काळजी घेण्यासाठी समर्पित असलेल्या पालवी अनाथाश्रमला विद्यार्थ्यांच्या समूहाने भेट घेतली. मुलांसोबत दर्जेदार वेळ घालवणे, अनाथाश्रमाचे काम काज समजून घेणे आणि त्यांच्या कल्याणात अर्थपूर्ण योगदान देणे हा या भेटीचा उद्देश असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.



पंढरपुरातील प्रभा हिरा प्रतिष्ठान अंतर्गत पालवी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष मंगल शाह आणि त्यांच्या कन्या संस्थापक सचिव डिंपल घाडगे यांनी संस्थेविषयी माहिती दिली. यातून विद्यार्थ्यांना अनाथाश्रमाचा सविस्तर दौरा देखील मिळाला, जिथे आम्हाला मुलांचे संगोपन करण्याच्या त्यांच्या समग्र दृष्टिकोनाबद्दल माहिती मिळाली. कर्मचाऱ्यांचे समर्पण आणि सुव्यवस्थित व्यवस्था प्रशंसनीय होती, जी सुरक्षित आणि सहाय्यक वातावरण प्रदान करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. या भेटीमुळे सहानुभूती, दयाळूपणा आणि सामुदायिक पाठिंब्याचे महत्त्व अधिक दृढ झाले. स्वरुप आराध्ये, श्रावणी नवले, प्राची सोळसे, प्रगती पाटील, सिद्धी कुलकर्णी प्राजक्ता पोळ अशा पंधरा विद्यार्थ्यांचा समावेश होता. ही भेट कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. प्रा. एस. एम. जगदे , ॲक्टिव्हिटी इन्चार्ज प्रा. एस एस शिरगण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## पंचायत राज व्यवस्थेत नोकरीच्या संधी : प्रा. रेळेकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

पंचायत राज व्यवस्थेत मोठया प्रमाणावर नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार ऑन जॉब ट्रेनिंगसाठी देखील संधी उपलब्ध होऊ शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ.सागर रेळेकर यांनी केले. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात इंडस्ट्री अकॅडमी या मीटचे आयोजन करण्यात आले होते.




अध्यक्षस्थानी शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंदचे प्राचार्य डॉ.सी.जे. खिलारे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. समाधान माने, उप प्राचार्य डॉ.राजेश कवडे, डॉ. टी.व्ही.अनंतकळस, डॉ. बी. एस. बळवंत, डॉ. अमर कांबळे डॉ.सुशील शिंदे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये विविध इंडस्ट्रीशी संबंधित उद्योजक तसेच शिक्षण क्षेत्रातील तज्ञ, विविध विभागाचे प्रमुख व संशोधक उपस्थित होते. यावेळी शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ.सागर रेळेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी रेळेकर पुढे म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार आणि उद्योग यासाठी प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण कल्पना असतात आणि या कल्पनांना स्वयंरोजगारांमध्ये परावर्तित केले जाऊ शकते. त्यासाठी महाविद्यालयाने आयोजित केलेली ही बैठक अतिशय महत्त्वाची आहे.

खिलारे म्हणाले, हे महाविद्यालय सामाजिक बांधिलकी मानून विद्यार्थ्यांना रोजगार क्षम बनवण्यासाठी सतत प्रयत्न करत असून त्यासाठी इंडस्ट्री क्षेत्रातील प्रतिनिधींनी व शिक्षण तज्ञांनी महाविद्यालयास सहयोग करावे असे सांगितले. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनीही मार्गदर्शन केले.

## वर्ल्ड ओरल हेल्थ डे अभियान सुरू करणार

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

हेलेऑन (पूर्वीची ग्लॅक्सोस्मिथक्लाईन कन्झ्युमर हेल्थकेअर) यांचा आघाडीचा मौखिक देखभाल ब्रँड असलेल्या सेन्सोडाईन ने २४ तासांत सर्वाधिक ऑनलाइन डेन्टल स्क्रीनिंग टेस्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करून यशस्वीरित्या एक गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड स्थापन केला आहे. हा विक्रमी उपक्रम महा कुंभ २०२५ येथे राबविण्यात आला. या उपक्रमात २७,००० पेक्षा जास्त लोकांनी दातांची तपासणी करवून घेतली.या विक्रमापासून सेन्सोडाईन च्या वर्ल्ड ओरल हेल्थ डे अभियानाची सुरुवात देखील झाली आहे.किश्ले सेठ, कॅटेगरी लीडओरल हेल्थ, हेलेऑन इंडिया सबकॉन्टिनेन्ट म्हणाले,सेन्सोडाईन मध्ये आमचे मिशन हेच आहे की लोकांना त्यांच्या मौखिक आरोग्याच्या दिशेने पहिले पाऊल उचलण्यासाठी प्रवृत्त करणे. महा कुंभ २०२५ मध्ये एक गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड स्थापन करताना केवळ संख्येचे महत्त्व नाही, तर हजारो लोकांपर्यंत पोहोचून, त्यांची जागरूकता वाढवून दररोज त्यांना अधिक चांगल्या मौखिक आरोग्यासाठी प्रोत्साहित करता आले हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे.डॉ.अशोक ढोबळे म्हणाले,हा उपक्रम म्हणजे एक उदाहरण आहे,ज्यामधून मौखिक आरोग्य सुधारण्यात शिक्षण आणि सुलभतेची ताकद दिसते.

## तरुणावर हत्याराने वार; चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मार्च -**

शहरातील मिलींद नगर येथे चौघांनी तरूणावर कोणत्यातरी हत्याराने वार करून जखमी केल्याप्रकरणी चौघांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत नागसेन सुनिल आबुटे (वय ३६, रा. मिलींद नगर, बुधवार पेठ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन गगन तळमोहिते, सोमनाथ भालेराव, क्रिश शेंडगे, अथर्व तळमोहिते (सर्व रा. बुधवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आर्यन तळमोहिते यास नागसेन याच्यामुळे तळमोहितेच्या आत्यानी त्यास हाताने मारहाण करून रागावले होते. त्याचा राग मनात धरून गगन तळमोहिते व त्याच्या साथीदारांनी २४ मार्च रोजी साडेदहाच्या सुमारास आबुटे याच्या घराजवळील सार्वजनिक शौचालयाच्या बोळात नागसेन यास अडवून शिवीगाळ करीत कोणत्यातरी लोखंडी हत्याराने नागसेन याच्या डोक्याच्या पाठीमागे वार केला. त्यात नागसेन हा गंभीर जखमी झाला. तसेच गगन याने चाकू दाखवत पुन्हा आमच्या नादी लागला तर तुला खल्लास करतो अशी धमकी दिली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो.
९९६००५३५२१

### अलक:- (९१) राष्ट्रधर्म

हिंदूंची संघटना करण्यासाठीच रा.स्व. संघाची स्थापना झाली ही लपवून ठेवलेली गोष्ट नाही. श्री गुरुजी म्हणत आपल्या एखाद्याच्या घरात सात भाऊ असतील व पित्याने सर्वांना संघटित राहण्याचा आदेश दिला; तर शेजाऱ्याला आक्षेप घेण्याचे स्वातंत्र्य नाही. तसेच श्री देवरस म्हणत हम स्वयंसेवक -- न तो उग्रपंथी हिंदू है। न आक्रमण शील हिंदू है। हो स्वाग्रही हिंदू अवश्य आहे. तेव्हा देशभरात अशा हिंदूंचे संघटन ही संकुचित संकीर्ण वृत्तीची बाब होऊ शकत नाही. एकोणिसाव्या शतकापासून जे जे म्हणून समाजाचे प्रबोधन करणारे थोर पुरुष झाले; त्या सर्वांनी हिंदू समाज डोळ्यापुढे ठेवून कार्य केले आहे. संघ ही फक्त राष्ट्रीय असणाऱ्यांची संघटना आहे व या देशात फक्त हिंदूच राष्ट्रीय आहेत. हिंदू संघटन करणाऱ्या संघाला दोष देणाऱ्यांना कावीळ झाली आहे. त्यांना सगळे पिवळेच दिसते. त्यात त्यांना आसुरी आनंद मिळतो. हे देवा-या विरोधकांना जेव्हा भारतीय तत्त्वज्ञान, भारतीय संस्कृती, हे हिंदूंचेच तत्त्वज्ञान आहेत हे पटेल/कळेल तो सुदिन. त्यामुळे त्यांना हिंदू राष्ट्रधर्माची ओळख होईल. Hindu is the name of a Nationality

**क्रमशः**

## संक्षिप्त वृत्त



### रसिका शिंगाडेचे भारतीय डाक विभागाच्या पत्रलेखन स्पर्धेत यश

**पंढरपूर, दि. २७ मार्च -**

भारतीय डाक विभागाच्या वतीने १४ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय पातळीवरील ढाई आखर पत्र लेखन स्पर्धा आयोजित केलेली होती. त्यासाठी डिजिटल युगात पत्रलेखनाचा आनंद या विषयावरती स्पर्धेमध्ये सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पत्रलेखन करावयाचे होते. या स्पर्धेमध्ये पंढरपूर डाक विभागातून १ हजार ५७८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलेला होता. तसेच राज्यभरातून सुमारे ७५ हजार विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता. सदरची स्पर्धा ही राष्ट्रीय पातळीवरची होती. त्यासाठी राज्य पातळीवरती सुद्धा पहिल्या क्रमांकाला २५ हजार रुपये, दुसऱ्या क्रमांकाला १० हजार रूपये आणि तिसऱ्या क्रमांकाला ५ हजार अशी पारितोषिके ठेवण्यात आलेली होती. पत्रलेखन स्पर्धेमध्ये पंढरपूर येथील रसिका शिंगाडे हिने राज्य पातळीवरील द्वितीय क्रमांकाचे रक्कम १० हजारांचेपारितोषिक पटकावले. पारितोषिकाचे व प्रमाणपत्राचे समारंभपूर्वक वितरण महाराष्ट्र व गोवा पोस्टल सर्कलचे चीफ पोस्टमास्तर जनरल अमिताभ सिंग यांच्या हस्ते नुकतेच प्रदान करण्यात आले. सर्व पोस्टल कर्मचारी यांच्यावतीने पंढरपूर डाक विभागाचे अधीक्षक सी.बी. भोर यांनी सत्कार करून तिचे अभिनंदन केले.



### केदार दिघे यांचा देवस्थानतर्फे सत्कार

**अक्कलकोट, दि २७ मार्च -**

श्री वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज देवस्थान येथे केदार दिघे यांनी सहकुटुंब स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेतले .याप्रसंगी . मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी केदार दिघे व त्यांचे कुटूंबीय अश्विनी दिघे, कुंदन दिघे, अथर्व दिघे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी केदार दिघे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, गिरीश पवार, चंद्रकांत सोनटक्के, सागर गोंडाळ, विपुल जाधव, ज्ञानेश्वर भोसले, प्रसाद सोनार, संजय पवार, श्रीकांत मलवे, रवी मलवे आदींसह स्वामीभक्त उपस्थित होते.



### शंकरलिंग प्रशालेतील ओम लोहारची नवोदयसाठी निवड

**वळसंग, दि. २७ मार्च-**

वळसंग (ता. द. सोलापूर) शासनातर्फे दरवर्षी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा घेतली जाते. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठी प्रशालेतील इयत्ता पाचवीतील १४ परीक्षार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी कुमार ओम लोहार या विद्यार्थ्यांची निवड जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेशासाठी झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यास प्रशालेतील विजयालक्ष्मी थळंगे, सिद्धाराम भैरामडगी, गंगा बागलकोटी, गंगाधर बिराजदार, वीरेश थळंगे, मल्लिनाथ गौडगाव यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्था अध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, सदस्य विश्वनाथ थळंगे, प्रकाश दुधगी, शिवशरण प्याटी, रमेश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, संजय दुधगी, बसवराज शाबादे, प्राचार्य विरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनी अभिनंदन केले. परीक्षेच्या कामकाजासाठी वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी व कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी यांचे सहकार्य लाभले.



### समाणे परिवारातर्फे राजाराम पाटील यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि २७ मार्च-**

श्री क्षेत्र अक्कलकोटचे माजी नगरसेवक रामचंद्र समाणे यांनी जनसेवा ते धर्मसेवेच्या माध्यमातून जनमाणसात एक वेगळा ठसा उमटविल्याचे मनोगत दिवंगत उपमुख्यमंत्री आर.आर.(आबा)पाटील यांचे बंधू व सेवानिवृत्त पोलिस उपाधीक्षक राजाराम पाटील यांनी व्यक्त केले. ते सहपरिवार माजी नगरसेवक रामचंद्र समाणे यांच्या निवासस्थानी आले असता त्यांचा समाणे परिवार व प्रभागाच्या वतीने श्रींची प्रतीमा व शाल देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पाटील बोलत होते. पुढे बोलताना पाटील म्हणाले, रामचंद्र समाणे यांची ओळख गेल्या अनेक वर्षापासून असून, ते सतत जन व धर्म सेवेत कार्यरत आहेत. त्यांच्या भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा पाटील यांनी व्यक्त केल्या. यावेळी बाबु (मामा) समाणे , श्री. राजकुमार कांदे, समर्थ महामुनी, सचिन स्वामी, प्रतिक स्थावरमठ , गुरुदत्त समाणे आदी उपस्थित होते.

# नरुटे परिवाराने केली दशक्रिया विधीसाठी पाण्याची सोय

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२७ मार्च -**

संगोबा ता. करमाळा येथील नदीपात्रालगत अनेक दशक्रिया विधी कार्यक्रम होतात. नदीपात्रात पाणी नसल्याने या विधीसाठी आलेल्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. त्यामुळे दशक्रिया विधीसाठी आलेल्यांचे दुःखी म ानसीकतेवर फुंकर मारण्याचे काम नरूटे परिवाराने केले आहे. आदर्श माता स्व. सुंदरबाई नरुटे यांच्या स्मरणार्थ नरुटे परिवाराकडून येथे कायमस्वरुपी पाणी टाकी व पाणी पुरवठ्याची व्यवस्था स्वखर्चातून केली आहे.



तीर्थक्षेत्र श्री अदिनाथ महाराज मंदिर संगोबा येथे खालच्या दक्षिण बाजूस नदीपात्रालगत नरुटे परिवाराच्या शेतामध्ये दररोज अनेक दशक्रिया विधी कार्यक्रम होत आहेत. मात्र सध्याची उन्हाळ्यातील पाण्याची परिस्थीती पाहता अतिशय गंभीर आहे. नदीपात्रात पाणी नाही. खड्ड्यातील पाण्यात आळ्या किडे होवून त्याची दुर्गंधी येते. दशक्रिया विधीला आलेले सर्व कुटुंब व त्यांचे नातेवाईक अतिशय दु:खी असतात. त्यातच त्यांना घरुन ट्रॅक्टर व इतर वाहनातून पाणी आणावे लागते. ही सर्व परिस्थीती नरुटे परिवारातील सदस्यांनी पाहिली आणि डॉ. प्रा. शशिकांत नरुटे व त्यांच्या वस्तीवरील सर्वांनी लगेच निर्णय घेऊन या ठिकाणी पाण्याची टाकी आणि पाण्याची व्यवस्था करणपाचा निर्णय घेतला.



> उन्हाळ्यात सीनानदीत पाणी नाही. दशक्रियेसाठी आलेले कुटुंब व त्यांचे दु:ख बघवत नव्हते. यातच अंघोळ करण्यासाठी घरुन पाणी आणले जात होते. हे ही बघवत नव्हते. म्हणून आम्ही नरुटे परिवाराकडून निर्णय घेतला. माझी आई आदर्श माता होती. तिने अनेकांची दु:ख वाटून घेतली. तिने भूकेल्यांना भाकर, तहानलेल्यांना पाणी दिले. तिचे स्मरणार्थ ही सुविधा उपलब्ध केली. आम्हाला आमचे आजोबा कै. विठोबा नरुटे व आजी कै हौसाबाई नरुटे यांचा वसा व वारसा लाभलेला आहे.
>
> **- डॉ प्रा. शशिकांत नरुटे.**

सोमवारी संध्याकाळी नेहमीप्रमाणे रामकृष्ण हरी वारकरी बीज मंत्रांचा जप व अन्नछत्र मंडळाकडून म हाप्रसादाचे नियोजन असते तिथेच या टाकीचे पूजन करुन तीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी या टाकीचे पूजन मंदिराचे पुजारी प्रविण गायकवाड व काकासाहेब गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी नरुटे परिवाराकडून पंडित नरुटे, ज्ञानदेव नरुटे, डॉ. प्रा. शशिकांत नरुटे, प्रा. श्रीकांत दरगुडे, धनाजी नरुटे, विनेश नरुटे ,बाळू नरुटे, कालिदास नरुटे, तुकाराम नरुटे, दिलीप काळे, दादासाहेब नरुटे, आण्णासाहेब सुपनवर ,सुंदर हाके, चांगदेव गायकवाड, रामभाऊ गायकवाड, किशोर शिंदे, राजाभाऊ रुपनवर, शिवाजी भोज, विठ्ठल नाळे, सोनू नाळे, तुकाराम नाळे पप्पू मस्के सुंदर हाके आबा वायकुळे आबा टकले गहिनीनाथ गायकवाड बळीराम गायकवाड बाळे वाडीचे नलवडे मिसाळ पाटील कंपनी मच्छिंद्र मस्के गोपीनाथ मारकड तुकाराम कोळेकर सतिश गायकवाड बाळू भोगल किसन भोगल सुधीर भोगल अरुण शिंदे करमाळ्यातील चेअरमन राजेंद्र चिवटे शिवशंकर वांगडे पिंटूशेठ गुगळे ड अमर शिंगाडे सनी धेंडे तसेच बहुसंख्येने पुरुष महिला माता भगिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आण्णा सुपनवर यांनी केले. आभार प्रा. नरुटे सर यांनी मानले.

# अक्कलकोटमधे होणार डिजिटल यंत्रणेचा वापर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २७ मार्च-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी दररोजची गर्दी व भक्तांची संख्या ही अंदाजित ठरवण्याऐवजी अचूक संख्येची गणना होण्यासाठी मुख्याधिकारी तथा प्रशासक रमाकांत डाके यांनी सी.सी.टी.व्ही. व डिजीटल यंत्रणा उभारण्यासाठी निविदा काढल्याने सध्या बरीच विकासाची कामे म ार्गी लागत असल्याचे चित्र आहे.

आमदार सचिन कल्याणशेट्टी हे तीर्थ क्षेत्र विकासाचा अनुशेष भरून काढत आहेत, तीर्थक्षेत्र विकास व विविध योजनेच्या माध्यमातून विकास निधीचा ओघ कायम आहे. स्वामी समर्थ महाराजांची प्रचीती व महिमा हा कलकत्ता ते जम्मू काश्मीर पर्यंत दरवळत आहे, या बरोबच परदेशातून देखील मोठ्या प्रमाणात भाविक सण, वार, उत्सवाच्या काळात श्री क्षेत्र अक्कलकोटला येतात. येणाऱ्या भाविकांची गणना करण्याची नगरपरिषदेने ठरविले आहे. या अगोदर भाविकांची संख्या अंदाजे सांगितली जायची, मात्र आता अचूक गणना होण्याकामी सी.सी. टी.व्ही., डिजीटल यंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

> **भाविकांची अचूक गणना गरजेची**
>
> राज्यातील टॉप पाचमध्ये असलेले तीर्थक्षेत्र अक्कलकोट हे विविध विकास कामाच्या माध्यमातून कात टाकत आहे. लोकसंख्येचा अभ्यास होणे देखील गरजेचे आहे. अंदाजीत ऐवजी सी.सी.टी.व्ही., डिजीटल यंत्रणेच्या माध्यमातून परफेक्ट भक्तांची गणना करण्याचा निर्णय नगरपरिषदेने घेतला आहे. या बाबतची निविदा काढण्यात आली असून लवकरच कामास प्रारंभ करण्यात येणार आहे.
>
> **- रमाकांत डाके,**
> **मुख्याधिकारी तथा प्रशासक, नगपरिषद अक्कलकोट**

# बाभुळगावमधील बुद्ध विहाराच्या सांस्कृतिक सभागृहाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ मार्च-**

बाभुळगाव (ता.बार्शी) येथे भारतीय बौद्ध महासभा बार्शी तालुका व बाभुळगाव भीमनगर व ग्रामस्थांच्या वतीने बुद्धविहार सभागृह भूमिपूजन व पायाखोदणी भंते सारीपुत्त व भंते काश्यप यांच्या उपस्थितीत पार पडले.

माजी आ. राजेंद्र राऊत यांच्या सहकार्यातून एक वर्षापूर्वी बाभुळगाव येथे बुद्धविहार सभागृहासाठी २० लाख मंजूर झाले आहेत. यासाठी बाभुळगावचे माजी व आजी सरपंच तसेच ग्रामपंचायतीनेही पाठपुरावा केला होता. तसेच अमोल शिंदे, फुलवरा शिंदे यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या प्रयत्नातून गुरुवारी डॉ. राबासाहेब आबेडकर यांनी महाडच्या यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभा सोलापूर जिल्हा पूर्वचे अध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे, राज्य बुद्ध विहारात सुसज्ज ग्रंथालय उभारण्यात येणार आहे. कार्यक्रम यशस्वितेसाठी फुलवरा शिंदे, बौद्ध महासभा सोलापूर जिल्हा संघटक अमोल शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. चवदार तळ्याचा सत्याग्रह केला होता या समतेच्या क्रांतिदिनाचे औचित्य साधून बाभुळगाव येथील तलावाच्या दक्षिण काठावरच बुद्धविहार सभागृहाचे भूमिपूजन व पायाखोदनी कार्यक्रम घेण्यात आला. उपाध्यक्षा धम्मरक्षिता कांबळे, राज्य संघटक शारदाताई गजभिये, बाभुळगावचे माजी सरपंच श्रीरंग शिंदे, माजी उपसरपंच संतोष उकिरडे, विद्यमान उपसरपंच अजित आबा शिंदे, अविनाश शिंदे हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी भारतीय बौद्धमहासभेचे बार्शी तालुका अध्यक्ष सत्यजित जानराव होते.



# रमजान महिन्यानिमित्त शिरकुर्मा साहित्याचे वाटप

**अकलूज, दि.२७ मार्च-**

सध्या पवित्र रमजान महिना सुरू आहे या म हिन्याच्या औचित्याने फतेह मोहम्मद फाउंडेशन यांचे वतीने शीरकुर्मा साहित्य असणारे १३५ किट गरजू जनतेला वाटण्यात आले.

रमजान महिन्यांमध्ये जकात देण्याची पद्धत आहे. आपल्याबरोबर आपल्या शेजारी असणाऱ्या शेजाऱ्यांची ही ईद साजरी व्हावी आणि त्यांच्याही जीवनात प्रकाशाचे किरण अवतरावे या उद्देशाने हजारो वर्षापासून ही परंपरा जपली जाते. प्रेषित हजरत मोहम्मद (स्व.) पैगंबर यांनी या दिलेल्या शिकवणीनुसार गरजू अनाथ कष्टकरी या वर्गाच्या जीवनात आनंद यावा यासाठी हा उपक्रम राबवला जातो याचेच औचित्य साधून फतेह मोहम्मद फाउंडेशन या संस्थेकडून प्रतिवर्षीप्रमाणे शिरकुर्मा व ईद चे साहित्य असणारे १३५ किट वाटप करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अब्बूबक्कर शेख , उपाध्यक्ष मोहम्मद रफीक मुल्ला, सचिव जिब्राइल नदाफ, संग्रामनगरचे माजी सरपंच कमाल रहमान शेख यांचे हस्ते या किटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी इस्माईल मुजावर, महमूद काजी, शमशूद्दीन मुलानी, मौलाना अब्दुलगनी शेख, बंडू शेख, बशीर मुलानी, संजयकुमार कांबळे, भास्कर काळे, आलम शेख, असलम सय्यद, इरफान बागवान, रुबाब मौलाना, आदी मान्यवर उपस्थित होते.

> प्रेषित हजरत मोहम्मद (स्व.) पैगंबर यांच्या शिकवणीनुसार गरजू लोकांची मदत व्हावी व ईद साजरी करता यावी म्हणून हा उपक्रम आम्ही हाती घेतला आहे.
>
> **- प्रा.अब्बूबक्कर शेख, अध्यक्ष, फतेह मोहम्मद फाउंडेशन**

# भगवंत महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ मार्च-**



येथील भगवंत अभियांत्रिकी म हाविद्यालय (बीआयटी कॉलेज) येथे सातत्याने नवनवीन उपक्रम राबविले जातात याचाच एक भाग म्हणून विविध सांस्कृतिक, क्रीडा स्पर्धा, अभ्यासपूर्वक तसेच काही पारंपरिक वेशभूषा अशासारख्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्या दिवशी म्हणजेच २० म ार्च रोजी प्रश्नांजुषा व पोस्टर प्रेझेंटेशन याचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला महाविद्यालयाचे संकुल प्रमुख ऋतुराज सावंत, प्राचार्य डॉ. रणजित शिराळ व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. अर्चना आवटे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यामध्ये पदवी विभागामध्ये संतोष कासोलकर व पदविकामध्ये शुभम पाटील व संस्कार कदम यांनी प्रथम क्रमांक मिळविला तर पोस्टर प्रझेंटेशनमध्ये पदवीमधून श्रुती पोळ, वैष्णवी मते व संपदा शिंदे तर पदविकामधून संकल्प शेरखाने यांनी यश संपादन केले. त्याचदिवशी संध्याकाळी बॉलीवूड डे व मिसमॅच डेचे आयोजन केले होते. त्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपाधीक्षक जालिंदर नालकूल यांची उपस्थिती होती. यावेळी संकुल संचालक ऋतुराज सावंत, सक्सेस क्लासेसचे प्रा. शिराळ यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा. अर्चना आवटे यांनी केले. दुसऱ्या दिवशी क्रीडा स्पर्धामध्ये क्रिकेटच्या सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मुलींमधून पदवी द्वितीय वर्ष सीएसई आणि तृतीय वर्ष ई अँड टीसी पदविका यांनी अनुक्रमे पहिला व दुसरा क्रमांक मिळविला. तर मुलांमधून द्वितीय वर्ष सीएसई यांनी पहिला व प्रथम वर्ष पदवी यांनी दुसरा क्रमांक मिळविला. पदविकामधून द्वितीय वर्ष ई ॲड टीसी यांनी विजय मिळविला तर सिव्हिल पदविका उपविजेतेपद पटकाविले. कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी पारंपरिक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याच दिवशी सायंकाळी विविध स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार व सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जगदाळे, वन विभाग अधिकारी सिद्धेश्वर सगरे, गणेश गोटे तसेच बार्शीमधील निर्भया पथकाची उपस्थिती होती. या विविध स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून रवी सुतार, प्रा. गायकवाड, साजिद बागवान, अखिल लोहिया, डामरे, शकील मुल्ला व रजपूत यांनी काम केले. कार्यक्रमाम ध्ये अथर्व गुरव, संतोषी राऊत,अनुष्का जाधव, वैभव जाधवर या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. कुरम ुरे, प्रा. लंगोटे, प्रा. गीते, प्रा. ठोकळ यांनी परिश्रम घेतले.

# कर्मयोगीच्या 'ऋतुरंग २०२५'मध्ये तरुणाईच्या जल्लोषाला उधाण

**पंढरपूर, दि. २७ मार्च-**

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, शेळवे येथे दि. १५ व १६ मार्च २०२५ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन 'ऋतुरंग २०२५' हा कार्यक्रम झाला. गायन, नृत्य, नाटक, लावणी, गवळण अशा अनेक कला प्रकारांची मुक्त उधळण करून विद्यार्थ्यांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.पी. पाटील यांनी दिली. ऋतुरंग २०२५ च्या पहिल्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मिलिंद परिचारक यांची उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते विविध स्पर्धेमध्ये यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. प्राचार्य डॉ. एस.पी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी बोलताना डॉ. मिलिंद परिचारक म्हणाले की



आयुष्यामधील ताणतणाव नाहीसे करण्यासाठी संगीताची जोपासना करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी सकारात्मकता हा गुण आवश्यक असून सध्याच्या पिढीम ध्ये सकारात्मकतेचा अभाव दिसून येतो अशी खंतही त्यांनी बोलून दाखवली. यावेळी पीएचडी पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉ. एस.एम. लंबे यांचा तर उत्कृष्ट ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर हा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. एम.एन. शेख यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, प्राचार्य डॉ. ए.बी. कणसे, रजिस्ट्रार जी.डी. वाळके उपस्थित होते.

# बचत गटामुळे कुटुंब सक्षम होत आहे : तहसीलदार मगर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ मार्च-**

महिला बचत गटामुळे महिलांचा कुटुंब सक्षम होत असुन बचत गटाच्या माध्यमातून कुटुंबाचे बचत करण्यात चालू झाले आहे.बचत गटाम ुळे महिला उद्योग व्यवसायात गुंतल्या,पुरुषांनी आता घरचा आर्थिक व्यवहार महिलांच्या हाती द्यावे, असे प्रतिपादन तहसिलदार विनायक मगर यानी केले.

यशवंतराव चव्हाण सभागृह नवीन इम ारत पंचायत समिती अक्कलकोट येथे महिला आर्थिक विकास महामंडळ व श्री स्वामी समर्थ लोकसचलित साधन केंद्र अक्कलकोट यांच्यावतीने तालुक्यातील माविम मित्र मंडळातील प्रति गाव एक पुरुषांना पुरुष सुधारक सन्मान सोहळा आयोजीत केले होते. त्या प्रसंगी तहसिलदार विनायक मगर बोलत होते. प्रास्ताविक व्यवस्थापक विनोद राठोड यांनी केले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुलोचना गवी होते. तर सावित्रीबाई फुले प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलन पोलिस निरिक्षक महेश स्वामी व गटविकास अधिकारी शंकर कवितके यांनी केले. यावेळी माविम व श्री स्वामी समर्थ लोकसचलीत साधन केंद्र यांच्यावतीने पुरुष सुधारक २० पुरूषांना सन्मान चिन्ह, टी-शर्ट, टोपी, शाल, शिरपळ देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी सुरेश हिरकूर, सुजाता विभुते, वैशाली पाटील, सविता नलवडे, मेनका राठोड, ज्योती माळगे,स्वप्नात खरात, सोनाली पाटील, विजयालक्ष्मी कुंभार,आकांक्षा भरमशेट्टी,श्रीदेवी किंणगी, श्रीदेवी साळुंखे,कविता विभुते, अश्विनी राठोड उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन नागेंद्र डोंगराजे यांनी केले तर आभार सुरेश हिरकूर यांनी मानले.



# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तहसीलदार निवेदनाची दखल घेणार का?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

शासनाकडून सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संगणीकरण प्रकल्पांतर्गत तालुका पातळीवर तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून दिलेले असून यामध्ये नागरिकांना स्मार्ट शिधापत्रिका वितरित करणे तसेच सदर स्मार्ट शिधापत्रिका राज्यातील स्थलांतरित कामगार, ऊसतोड कामगार यांना प्रथमतः उपलब्ध करून देणे.

नवीन लाभार्थ्यांचे अन्नसुरक्षा योजनेत नाव वाढवणे व कमी करणे, मयत व्यक्तीचे नाव वगळणे, शिधापत्रिकेवर प्राधान्याने काम करणे, अशा विविध कामासाठी शासनाकडून या पदांचे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून दिलेले आहे. परंतु ओबीसी सेलचे वतीने निवेदन देऊन सुद्धा रेशनकार्ड धारकांना अद्यापी बाहेरून ऑनलाइन माहिती भरण्यासाठी सांगितली जाते आहे. तसेच या कामा साठी नागरिकांकडून काही ठिकाणी भरमसाठ पैसे घेऊन रेशन कार्ड ऑनलाइन सबमिट केले जात आहेत. हेही तहसीलदार यांना निवेदनमधून लेखी स्वरूपात निदर्शनास आणुन दिलेले आहे. तरी सुद्धा त्यांनी याबाबत कोणतीही दखल घेतलेली नाही. तसेच माळशिरस पुरवठा विभागामध्ये शासनाकडून तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून दिलेले आहे का नाही हे तरी त्यांनी सांगावे. शासनकडून तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून दिले असेल तर शासन निर्णय धाब्यावर बसवून तालुक्यामधील नागरीकांना बाहेर कशासाठी पाठविले जाते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा सरचिटणीस विजय मंडलिक म्हणाले, याबाबत जिल्हाधिकारी यांना शासन निर्णय देऊन त्यांच्या निदर्शनासही बाब आणुन देणार आहे. तसेच एक दिवशाय धरणे आंदोलन ओबीसी सेलचे वतीने करण्यात येणार आहे



## संक्षिप्त वृत्त...

### सुरवसेवस्ती शाळेचे अभिरुप शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**पिलीव, दि. २७ मार्च-**

अभीरूप शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुरवसे वस्ती फळवणी (ता. माळशिरस) या शाळेने दैदिप्यमान यश मिळवले आहे. परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये सुरवसे शाळेतील इयत्ता दुसरीची आरोही अनिल माने केंद्रात प्रथम, संस्कृती अमोल अवताडे केंद्रात तिसरी व कृष्णाई योगेश आवताडे देशमुख केंद्रात सहावा आला. इयत्ता तिसरीची प्रिया संग्राम आवताडे केंद्रात प्रथम तर इयत्ता चौथीतील जयवर्धन पृथ्वीराज आवताडे याने केंद्रात द्वितीय क्रमांक मिळवला. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले जात आहे. या विद्यार्थ्यांना उपक्रमशील शिक्षक संजय बेंदगुडे व मुख्याध्यापक रोकडे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळा स्थापन समितीचे अध्यक्ष सर्व सदस्य पालक केंद्रप्रमुख यांनी अभिनंदन केले आहे.






### अणदूर शाळेतील चार विद्यार्थी नवोदय परिक्षेत पास

**अणदुर,दि.२७ मार्च-**

अणदूर (ता. तुळजापूर) येथील वत्सलानगरच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सृष्टी कांबळे, आदित्य गाढवे, राम कदम व समर्थ निर्मळे या चार विद्यार्थ्यांनी नवोदय परिक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. या शाळेने गेल्या सहा वर्षांपासून विविध उपक्रमासह शैक्षणिक गुणवत्तेमुळे परिसरात उपक्रमशील शाळा म्हणून ओळख निर्माण केली आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.नवोदय स्पर्धा परीक्षेत सृष्टी कांबळे, आदित्य गाढवे, राम कदम, समर्थ निर्मळे, हे चार विद्यार्थी नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. नवोदय विद्यालयात प्रवेश मिळवणे हे अत्यंत प्रतिष्ठेचे मानले जाते, ज्यासाठी कठोर परिश्रम आणि योग्य तयारी आवश्यक असते. या शाळेतील शिक्षक एस. डी. भागवत, एस. डी. गिरी, व्ही. आर. खलाटे, डी. जी .आरदवाड, मुख्याध्यापिका श्रीमती एस. टी. दराडे, बळीराम पांचाळ, एस. बी. स्वामी, व्ही. व्ही. आडम, भीमराव घोडके आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थी व शिक्षक यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

### नगरपरिषद शाळेत मोफत कलिंगड वाटप

**अक्कलकोट, दि २७ मार्च -**

नगरपरिषद शाळा नंबर १ व २ (कन्नड माध्यम) येील विद्यार्थ्यांना सी.बी. खेडगी कॉलेजचे विभागप्रमुख डॉ गणपतराव कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनातून प्रगतशील शेतकरी विजयकुमार पाटील, राजू गोगावे व बोधले काका यांच्या सहकार्यातून मोफत कलिंगड वाटप करण्यात आले. शाळेतील शिक्षक काशिनाथ पोतदार यांनी प्रास्ताविक केले.



डॉ. कलशेट्टी यांनी मोफत कलिंगड वाटपातून मिळणारा आशीर्वाद व शुभेच्छा विक्रीतून मिळणाऱ्या रकमेपेक्षा लाखो पटीने सर्वाधिक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी गौरीशंकर कोळी होते. यावेळी मुख्याध्यापिका एस एस शिवशरण आणि हनुरे सर, लिंबीतोटे सर, कोरचगावकर सर, शालेय व्यवस्थापन समितीचे प्रमुख सौ.शिंगे आणि सौ पाटील, सौ. कवटगी, सौ. किरुणगी व सौ पत्री, पत्री स्वामी काका इत्यादी सर्व मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी माळप्पा बंडगर व शिवू बंडगर काका आणि अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी महांतेश गद्दे व भागेश बंकलगी यांनी विशेष परिश्रम घेतले. कोम्पा यांनी आभार मानले.



### उमरड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात

**करमाळा दि.२७ मार्च**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरड येथील शाळेची शैक्षणिक सहल सयाजी राजे वॉटर पार्क अकलूज या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. शिवसृष्टी, वॉटरपार्कचा आनंद लूटत विद्यार्थ्यांनी सहलीचा आनंद घेतला. येथील वॉटर पार्कमध्ये विद्यार्थ्यांनी घोड्यावर बसणे, बागेतून फेरफटका मारणे, झोके खेळणे, रेल्वेमधून सफारी करणे, विजेच्या पाळण्यात बसण्याचा आस्वाद घेणे, याबरोबरच स्विमिंग टँकमध्ये पोहण्याचा मनमुराद आस्वाद घेतला. त्यानंतर एडवेंचर लँड मधील थरारक अनुभव अनुभवला. याचबरोबर पार्कमध्ये असलेल्या समुद्रामध्ये लाटा कशा निर्माण होतात याची माहिती घेऊन लाटांमध्ये पोहण्याचा आनंद घेतला. सयाजी राजे पार्कनंतर येथील शिवसृष्टी विद्यार्थ्यांनी पाहिली. त्याठिकाणी असलेले ऐतिहासिक प्रसंग पाहून विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची ओळख दृढ झाली. शिवसृष्टीमध्ये विद्यार्थ्यांनी किल्ल्याची प्रतिकृती, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, राज्याभिषेक सोहळा या गोष्टी पाहिल्या व इतिहासाला उजाळा दिला. अतिशय उत्साही वातावरणात सहलीचे आयोजन व नियोजन पार पडले. विद्यार्थ्यांनी खूप आनंद व मजा घेतली. या सहलीचे नियोजन शाळेतील मुख्याध्यापक अमृळे गुरुजी, भोसले गुरुजी, राऊत गुरुजी, ढाकणे गुरुजी, यादव गुरुजी व साळुंखे मॅडम यांनी केले. या सहलीसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सदस्य व पालकांनी मनापासून सहकार्य केले.

## फताटेवाडी ग्रामपंचायत अपहार प्रकरण

# ग्रामपंचायत अधिकारी बी.डी. पाटील निलंबित

**४ कोटी ४२ लाख रुपयांचा अपहार**

**सरपंच व उपसरपंचाची ९ एप्रिल रोजी सुनावणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील फताटेवाडी ग्रामपंचायतीत ४ कोटी ४२ लाख रुपयांच्या अपहारप्रकरणी ग्रामपंचायत अधिकारी बी.डी.पाटील यांचे निलंबन करून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. याप्रकरणी सरपंच हरिश्चंद्र राठोड, उपसरपंच आर.व्ही. जाधव यांच्यावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत कलम ३९ (१) प्रमाणे कारवाईच्या अनुषंगाने ९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या दालनात सुनावणी ठेवण्यात आली आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी, फताटेवाडी येथील विस्तार अधिकारी, विद्यमान व तत्कालीन ग्रामसेवक, तक्रारदार विनोद चव्हाण यांच्यासह सरपंच, उपसरपंच यांना उपलब्ध कागदपत्रासह उपस्थित राहण्याचे जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी सुचित केले आहे. फताटेवाडी ग्रामपंचायत अपहार प्रकरणी यापूर्वी ग्रामपंचायत अधिकारी, विद्यमान सरपंच, उपसरपंच यांच्यावर दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फताटेवाडी ग्रामपंचायतमधील अपहार प्रकरणी १८ मार्च २०२५ आणि २५ मार्च २०२५ अशा दोन सुनावण्या ठेवण्यात आल्या होत्या. या दोन्ही सुनावण्यास सरपंचासह उपसरपंच गैरहजर राहिले. तिसरी सुनावणी ९ एप्रिल २०२५ रोजी ठेवण्यात आली आहे. या सुनावणीस संबंधित सरपंच, उपसरपंच व तक्रारदार गैरहजर राहिल्यास संबंधिताचे काही म्हणणे नाही. असे गृहित धरुन अहवाल विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करण्यात येणार असल्याचे स्पष्टीकरण जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहे.

## कर्मयोगी इन्स्टिट्यूटचे प्रा. लंबे यांना पीएच.डी. प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ मार्च -**



श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी म हाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे विभाग प्रमुख प्रा. सोमनाथ लंबे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्यातर्फे पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

'प्रोटेक्टींग पॉवर फॅक्टर करेक्शन कॅपॅसीटर्स फ्रॉम ओव्हर होल्टेज कॉजड बाय हार्मोनिक्स युजिंग ऑटो ऍडजेस्टेबल हाय क्यू फिल्टर' या विषयांमध्ये त्यांनी संशोधन पूर्ण केले. विशेष म हत्त्वाची बाब म्हणजे केवळ तीन वर्षांमध्ये त्यांनी संशोधन पूर्ण केले याबद्दल त्यांचे शैक्षणिक क्षेत्रामध्ये विशेष कौतुक होत आहे. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, 'ऋतुरंग २०२५' या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. मिलिंद परिचारक यांच्या हस्ते प्राध्यापक सोमनाथ लंबे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी. पाटील, पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार जी. डी. वाळके, कर्मयोगी समूह अंतर्गत असणाऱ्या नर्सिंग, फार्मसी, जुनियर कॉलेजचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## आ.अण्णा बनसोडे यांच्या विधानसभा उपसभापतीपदी निवडीबद्दल आनंद

**तभा वृत्तसेवा**
**कोळा, दि.२७ मार्च -**

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळचे सुपुत्र व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उपमुख्यमंत्री अजित पवार गटाचे पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांची महाराष्ट्र विधानसभेचे उपसभापती म्हणून निवड झाल्याबद्दल मोहोळ शहरातून आनंद व्यक्त केला जात आहे. या निवडीने तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.



यामुळे तालुक्याचा राज्याच्या राजकारणात वट्ट वाढला आहे. पिंपरी-चिंचवड पैकी पिंपरी विधानसभा मतदार संघाचे आमदार आण्णा बनसोडे हे मोहोळ शहराचे सुपुत्र आहेत. व्यवसायानिमित्त पिंपरी येथे स्थायिक झालेल्या आ.आण्णा बनसोडे यांची स्थावर मालमत्ता आणि भावकितील नातेवाईक मोहोळ शहरात स्थायिक आहेत.पिंपरी-चिंचवड सारख्या मोठ्या महानगर पालिकेत नगरसेवक पदापासून सुरुवात करून स्थायी समिती सभापती पदावर लक्षवेधी काम करणाऱ्या आ.बनसोडे यांनी स्वकर्तृत्वावर आमदारकिला गवसणी घालत मोहोळकरांचा अभिमान वाढविला आहे. विशेष म्हणजे आण्णा बनसोडे यांची आमदारकीची ही तिसरी टर्म आहे. त्यानंतर आता गुरुवारी त्यांची महाराष्ट्र विधानसभेचे उपसभापती म्हणून निवड झाल्याने मोहोळ शहरासह तालुक्यातून आनंद व्यक्त केला जात आहे.या निवडीमुळे मोहोळ चे नाव महाराष्ट्र विधानसभेच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कायमचे कोरले जाईल त्यांच्या यशाबद्दल सांगोल्याचे आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी अभिनंदन केले आहे..



## भगवंत अभियांत्रिकिच्या १४ विद्यार्थ्यांची कन्स्ट्रलॉजिक कंपनीमध्ये निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २७ मार्च -**

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ पुणे संचलित बार्शी येथील भगवंत अभियांत्रिकी महाविद्यालय (बीआयटी कॉलेज) मधील सिव्हील इंजिनिअरिंग डिप्लोमामध्ये तृतीय वर्षात शिकणाऱ्या १४ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युव्हद्वारे कन्स्ट्रलॉजिक या कंपनीमध्ये निवड झाली असल्याची माहिती महाविद्यालयचे ट्रेनींग व प्लेसमेंट अधिष्ठाता प्रा. गजानन बुरगुटे सर यांनी दिली. महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कन्स्ट्रलॉजिक या आंतरराष्ट्रीय कंपनीच्या कॅम्पस ड्राईव्हमध्ये सिव्हील इंजिनिअरिंग डिप्लोमाच्या तृतीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

कंपनीच्या निवड समितीने विविध निकष व चाचण्यांच्या आधारावर विद्यार्थ्यांची निवड केली.यामध्ये प्रांजल चेंडगे,आश्का आतार, तनुजा जाधव, स्वप्नील कडावकर,समरजित शिंदे, अनिकेत कदम, रणजित गरदाडे, दत्तात्रय गवारे, निखिल तौर, रिद्धी जाधव, शुभांगी सुरवसे, नंदिनी सुरवसे, आरती सातपुते, श्वेता मिंढे,या १४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. संकुल संचालक श्री.ऋतुराज शिवाजीराव सावंत यांच्या सुचनेनुसार सध्याच्या स्पर्धात्मक युगात महाविद्यालयाचे विद्यार्थी यशस्वी व्हावे, त्यांना प्रोत्साहन मिळावे व विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतानाच नोकरीच्या संधी मिळाव्यात, यासाठी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे कॅम्पस इंटरव्युव्ह ड्राईव्ह सातत्याने आयोजित केले जातात. त्यासाठी विविध मार्गदर्शन शिबिरे ,कार्यशाळा, कौशल्य विकास कार्यक्रम, यांचे आयोजन केले जाते शैक्षणिक वर्ष२०२४-२५ मध्ये आतापर्यंत शंभरहून अधिक विद्यार्थ्यांची निवड या प्रक्रियेतून विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झाली आहे. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा.गजानन बुरगुटे,यांच्यासह प्रा. गोपाळ ठोकळ यांचे मार्गदर्शन लाभले. संकुल संचालक श्री. ऋतुराज शिवाजीराव सावंत, प्राचार्य रणजित शिराळ सर , विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह पालकांनीही कॅम्पस इंटरव्युव्हमधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## स्त्रियांना समानतेची वागणूक देणाऱ्या १६ पुरुषांचा सुधारक सन्मान पुरस्काराने गौरव



**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२६ मार्च -**

महिला व बालविकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ सोलापूर अंतर्गत विठाई लोकसंचालित साधन केंद्र पंढरपूर यांच्यातर्फे सामाजिक क्षेत्रात सम ाजसेवक म्हणून कार्यरत असणाऱ्या १६ पुरुषांना सुधारक सन्मान पुरस्कार (जेंडर सेन्सिटिव्ह रोल मॉडेल) देण्यात ाला.

गटविकास अधिकारी सुशील संसारे व साधन केंद्राच्या व्यवस्थापिका वंदना बिडकर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन १६ जणांस सन्मानित करण्यात आले. यावेळी अध्यक्षा सुनिता देशपांडे, खजिनदार सानिया आतार, शालन चव्हाण, राणी टरले उपस्थित होत्या. पुरस्कारार्थीमध्ये पत्रकार सचिन शिंदे, दत्तात्रय खंदारे, प्रवीण चंदनशिवे, महादेव तळेकर भोसे(क), राहुल खडतरे, नागन्नाथ विरकर, कोंडीबा कोरके, समाधान जम दाडे, सकलेन आतार, पांडुरंग नाईकनवरे, उद्धव गायकवाड,विशाल गायकवाड, सागर जाधव, सुहास चव्हाण, राजेंद्र घुले, अण्णासाहेब चव्हाण यांचा समावेश आहे. करकंब येथील हिरकणी महिला बचत गट अध्यक्षा उषा देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. यासंगी बँक ऑफ महाराष्ट्र पंढरपूर शाखा व्यवस्थापक मोरे, उमेदचे पाटील व महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन राधिका इदाते तर ताई तळेकर, नवलता चव्हाण यांनी सहकार्य केले.

> महिलांनी आपल्या स्वतःमधील सुप्त गुण ओळखून बचत गटाच्या माध्यमातून मिळणाऱ्या प्रशिक्षणाचा उपयोग करून घ्यावा. समाजात स्वतःची ओळख निम र्ाण करावी. समाजात विविध पुरस्काराने सन्मानित केले जाते परंतु प्रथमच समाजात स्त्रियांना समानतेने वागवणाऱ्या पुरुषांचा स्मृतिचिन्ह देऊन गुणगौरव करण्यात येत आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे आनंद व समाधान वाटले.
>
> **-सुशील संसारे.** गट विकास अधिकारी पं.स.पंढरपूर.

# होटगी स्टेशनचे सरपंच जगनाथ गायकवाड यांच्यावरील अविश्वास प्रस्ताव मंजूर

**आठ विरूध्द एक मताने मंजूर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २१ मार्च -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी स्टेशनचे सरपंच जगन्नाथ गायकवाड यांच्या विरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. होटगी स्टेशन ग्रामपंचायतीच्या दहा पैकी आठ सदस्यांनी एकत्र येऊन तहसीलदार किरण जमदाडे यांच्याकडे शुक्रवारी दुपारी अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. त्यानुसार गुरुवारी तहसीलदार किरण जमदाडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत सरपंच जगनाथ गायकवाड यांच्यावरील अविश्वास प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

दहा सदस्य असणाऱ्या होटगी स्टेशन ग्रामपंचायतीत एक सदस्य मयत असून उर्वरित नऊ सदस्यांपैकी आठ सदस्यांनी सरपंच गायकवाड यांच्याविरोधात मतदान केले. तर गायकवाड यांना स्वतःचे एकच मत पडले. सरपंच गायकवाड यांच्या विरुद्ध सुभाष पाटोळे, निसार कांबळे, गायत्री ठक्के, नीलम भोसले, मीना पोरे, जिजाबाई धायगोडे, फातिमा नदाफ, मोहनबी शेख या आठ ग्रामपंचायत सदस्यांनी मतदान केले. सरपंच गायकवाड हे ग्रामपंचायतीचा कारभार करताना ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेणे, ग्रामपंचायत कामामध्ये हयगय व कसूर करणे, ग्रामपंचायतीचा कारभार मनमानी पध्दतीने करणे, ठरावाप्रम ाणे अंमलबजावणी, कामामध्ये कुचराई करणे, सदस्य व ग्रामविकास अधिकारी यांच्यामध्ये सलोखा ठेवून दैनंदिन पारदर्शी कारभार न करणे अशी तक्रार होती.

> **सरपंचावरील अविश्वास प्रस्ताव मंजूर**
>
> होटगी स्टेशनचे सरपंच जगनाथ गायकवाड यांच्याविरोधात आठ सदस्यांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. त्यानुसार गुरूवारी विशेष सभेत अविश्वास प्रस्तावावर मतदान घेण्यात आले. यावेळी सरपंच गायकवाड यांच्याविरोधात आठ सदस्यांनी मतदान केल्याने अविश्वास प्रस्ताव मंजूर करण्यात आला.
>
> **- किरण जमदाडे, तहसीलदार, दक्षिण सोलापूर**

> **गावच्या विकासाला गती**
>
> सरपंच गायकवाड हे सदस्यांना विश्वासात न घेता मनमानी कारभार करीत होते. त्यामुळे विकासकामे खुंटली होती. सर्व सदस्यांनी एकत्र येऊन सरपंचांवर अविश्वास मंजूर केला. त्यामुळे पुढील विकासाला गती मिळण्यास मदत होईल.
>
> **- सुभाष पाटोळे, उपसरपंच, होटगी स्टेशन,**

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी ४४ वेळा केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रुईभर येथील प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी ४४ वेळा रक्तदान केले.

प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या गोष्टीचा छंद असतो. मात्र दुसऱ्यांच्या गरजा ओळखून व सामाजिक बांधिलकी समजून केलेले कार्य महान असते. रक्तदान हे एक मौल्यवान आणि जीवन रक्षक कार्य आहे. कुठेही रक्तदान शिबिर असो रक्तदान करणे हा त्यांचा अट्ठास असतो. कारण कोणत्या वेळेस कोणाला मदत होईल व कोणाला जीवनदान मिळेल म्हणून रक्तदानाचे महत्त्व ओळखून ४४ व्या वेळी डॉ. दापके-देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान करण्याचा योग आला. डॉ. दिग्गज दापके-देशमुख यांचा सामाजिक विविध उपक्रमात सहभाग असतो. यामध्ये शिशुपालन कार्यासारखी कामे समाजासाठी वरदान ठरत आहेत. एवढेच नाही तर वयोवृद्ध व्यक्तींच्या कर्णबधीर समस्याचे



महत्व ओळखून त्यांनी ऐकू येण्यासाठी कित्येक वयोवृद्धांना मशीनचे वाटप करण्याचे कार्य केले.



▶▶ २१ आरोपी फरार... ▶▶ १० आरोपी धाराशिव कारागृहात... ▶▶ चार आरोपींना पोलीस कोठडी...

# तुळजापूर ड्रग्ज तस्करीत आरोपींची संख्या ३५

▶▶ ड्रग्स तस्करीत वापरलेली माजी नगराध्यक्षाची फॉर्च्यूनर गाडी जप्त... पोलिसांच्या तपासाला गती... पोलीस यंत्रणा फरार आरोपीच्या शोधात...



**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२७ मार्च -**

तुळजापूर येथील ड्रग्ज प्रकरणातील एकूण आरोपीची संख्या सध्या ३५ झाली असून ही संख्या वाढण्याची शक्यता आहे. यामधील २१ आरोपी फरार आहेत. पोलिसांच्या तपासाला गती आली असून फरार असणारे २१ आरोपीचा शोध पोलीस घेत आहेत.

संपूर्ण महाराष्ट्रात चर्चेत असलेल्या आई तुळजाभवानी मातेच्या पुण्य पावन नगरीत म्हणजे तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी मागील दोन-तीन वर्षापासून ड्रग्ज विक्री आणि सेवन होत आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देशातून तुळजाभवानी देवीसाठी मोठ्या प्रमाणात भाविक भक्त तुळजापूर नगरीत येतात. ड्रग्ज प्रकरणामुळे शहराची प्रतिमा मलीन झाली आहे.

तुळजापूर ड्रग्ज तस्करीत वापरलेली माजी नगराध्यक्ष चंद्रकांत उर्फ बापू कणे यांची फॉर्च्युनर गाडी पोलिसांनी जप्त केली आहे. ही फॉर्च्यूनर गाडी ड्रग्स तस्करीत वापरल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याने पोलिसांनी ही फॉर्च्यूनर गाडी आरोपीच्या घरासमोरून ताब्यात घेतली आहे. मुंबई वरून तुळजापूरकडे ड्रग्ज विक्रीसाठी घेऊन जाणाऱ्या एका कारला गुन्हे शाखेच्या पथकाने तामलवाडी टोल नाक्याजवळ पकडल्यामुळे तुळजापूर ड्रग्स तस्करीचे प्रकरण समोर आले होते. त्याचे मुंबई कनेक्शन निघाले. यावेळी पोलिसांनी तीन आरोपींना पकडले होते. त्यानंतर तपासात पोलिसांना एकुण पस्तीस आरोपी सापडले असून अजून आरोपी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. थेट मुंबईमधून तुळजापूर येथे मागील दोन-तीन वर्षापासून ड्रग्ज विक्रीसाठी येत असल्याचे उघड झाल्यानंतर खळबळ उडाली होती.

पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी ७२ तासांमध्ये ड्रग्ज प्रकरणाचा छडा लावून अहवाल देण्यास पोलीस प्रशासनास सांगितले होते.

शहरातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी ड्रग्ज सारख्या गंभीर प्रकरणात सुरवातीपासूनच आक्रमक भूमिकेत होते. भाजपचे कार्यकर्ते आणि आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे निकटवर्तीय या ड्रग्ज तस्करीचे मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. धीरज पाटील यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला होता. पोलिसांकडून तपास सुरू असताना चार नावे गोपनीय ठेवण्यात आले होते.

हे चार नावे गोपनीय का? ठेवले म्हणून महाविकास आघाडीने पोलीस प्रशासनास धारेवर धरले होते. या चार नावासोबतच पोलीस प्रशासनाने ड्रग्ज प्रकरणात असणाऱ्या दहा जणांची नावे उघड केल्यानंतर मात्र तुळजापूर शहरासह तालुक्यात खळबळ उडाली.

त्यानंतर पुन्हा अजून दुसरे दहा नावे पुढे आल्यानंतर ड्रग्ज तस्करीमध्ये ओवलेल्यांची झोप उडाली. २१ आरोपी फरार झाले असून शहरातील अनेक जणांचे फोन स्विच ऑफ झाले आहेत. पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईचे शहरात सर्वत्र कौतुक केले जात आहे.

यापूर्वी पोलीस प्रशासनावर तुळजापूरकरांनी संशयाच्या नजरेने पाहिले होते. चार नावे गुपित ठेवल्यानंतर पोलिसांकडे पाहण्याचा जनतेचा दृष्टिकोन बदलला होता.

पण तपास यंत्रणेचा भाग म्हणून हे नावे गुपित ठेवण्यात आल्याचे पोलिस उपविभागीय अधीक्षक डॉ. निलेश देशमुख यांनी सांगितले होते.

### ड्रग्ज तस्करी व सेवनाची माहिती देण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे : आ. पाटील



तामलवाडी पोलिसांच्या तपासात तुळजापूर ड्रग्स तस्करी प्रकरण पुढे आल्यानंतर पोलीस यंत्रणांनी तपासचक्र फिरवून ३५ आरोपींना शोधून काढण्यात पोलिसांना यश आले आहे. सामाजिक आरोग्या समोर निर्माण झालेला हा गंभीर प्रश्न आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर उत्तर देताना नार्कोट्रिक क्लब स्थापन करण्याचे आव्हान विधानसभेत केले आहे. त्या अनुषंगाने असे क्लब स्थापन करण्यासह ड्रग्स तस्करी व सेवनाची माहिती देण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे असे आव्हान आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे. माहिती देणाऱ्या व्यक्तीची नावे गोपनीय ठेवण्यात येतील. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांनीही याबाबत सूचित करण्यात आले असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले आहे. जिल्ह्यातील प्रत्येक कॉलेजमध्ये अँटी नार्कोट्रिक क्लब सुरू करण्यासाठी संबंधित शिक्षक पालक व विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे, असे देखील आव्हान यावेळी आमदार पाटील यांनी केले आहे.

### ड्रग्स तस्करीतील २१ फरार आरोपी...

ड्रग्स तस्करीतील चंद्रकांत उर्फ बापू कणे, विनोद उर्फ पिटू गंगणे, शरद जमदाडे, इंद्रजीतसिंग उर्फ मिटू रणजीतसिंह ठाकुर, प्रसाद उर्फ गोटन कदम परमेश्वर, उदय शेटे, आबासाहेब पवार, आलोक शिंदे, अभिजीत पवार, संतोष खोत, स्वराज उर्फ पिनू तेलंग, विनायक इंगळे, शाम भोसले, संदीप टोले जगदीश पाटील, विशाल सोंजी, आकाश अमृतराव, दुर्गेश पवार,रणजीत पाटील, नाना खुराडे, अर्जुन हजारे हे सर्व आरोपी फरार असून पोलिसांचा शोध घेत आहेत.

### धाराशिव कारागृहात १० आरोपी...

ड्रग्स तस्करी मध्ये पोलिसांच्या हाती लागलेल्या दहा आरोपींना सध्या धाराशिव कारागृहात ठेवण्यात आले आहे. त्यामध्ये अमित उर्फ चिमु आरगडे, युवराज दळवी, संदीप राठोड, संगीता गोळे, संतोष खोत, विश्वनाथ उर्फ पिंटू मुळे, सयाजी चव्हाण, सुमित शिंदे, ऋतुराज गाडे, संकेत शिंदे यांचा समावेश आहे. तर उर्वरित चार आरोपी पोलीस कोठडीत असून यामध्ये पुणे येथील सुलतान उर्फ टिपू शेख सोलापूर येथील जीवन साळुंके, राहुल कदम परमेश्वर, गजानन हंगरकर, यांचा समावेश आहे.

---

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### प्रशिक वाघमारे याचा सत्कार

**तेर, दि.२७ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील हिंगळजवाडी येथील आयडियल इंग्लिश स्कूल मधील प्रशिक सुमेध वाघमारे यांची नुकतेच नवोदय विद्यालय प्रवेश पात्र परिक्षेत यश संपादन करून पुढील शिक्षणासाठी प्रवेश मिळवले बद्दल शाळेत त्यांचा सन्मान करण्यात आला येथील आयडियल इंग्लिश स्कूल मधील इयत्ता पाचवी मध्ये शिक्षण घेत असलेल्या प्रशिक सुमेध वाघमारे यांने सहावी इयत्ता साठी नवोदय विद्यालय प्रवेश पात्र ठरले त्यामुळे त्याचा संस्था अध्यक्ष अनिल देशमुख यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करण्यात आले यावेळी प्राचार्य वैशाली आडसूळ, पुजा जाधव, सहशिक्षका मीनाक्षी लोमटे, उमा कोथिंबीरे, राजकन्या नाडे, ज्ञानदा घुटुकडे, भाग्यश्री खोडवे ,सारिका मुळे, शुभांगी घेवारे आदी उपस्थित होते.

### श्रीराम जन्मोत्सव समितीची बैठक संपन्न

**उमरगा, दि.२७ मार्च -**

उमरगा येथे सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समितीची बैठक पार पडली. श्रीराम जन्मोत्सव निमित्त सांस्कृतिक



धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरले असल्याचे सांगितले. बैठकीमध्ये सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समितीची निवड करण्यात आली. सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी मितेश राखेलकर उपाध्यक्षपदी अनुज बंडू सगर, सचिवपदी नितिन नांगरे, कोषाध्यक्ष सौरभ कोळी यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली. यावेळेस समर्थ दंडगे, ऋषी गोसावी, काशिनाथ जाधव, ओम पाटील, प्रदीप मुळे, प्रतीक मुगळे, कार्तिक कुंभार, पृथ्वीराज गायकवाड, विष्णू इसराजे, गणेश कटके, संदेश स्वामी, सुनील सूर्यवंशी, अभिषेक कुंभार, सुरज शिंदे, रवी शिंदे, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### ढोकी पोलिसांची जुगार विरोधी कारवाई

**धाराशिव, दि.२७ मार्च -**

स्थानिक पोलिसांनी जुगारविरोधी मोहिमेअंतर्गत धडक कारवाई करत ढोकी येथे कल्याण मटका जुगार




अड्ड्यावर छापा टाकला. ही कारवाई दि.२६ मार्च २०२५ रोजी दुपारी ३ वाजता ढोकी पेट्रोल पंप चौकात करण्यात आली. यावेळी अविनाश प्रल्हाद वाघुलगावे (वय ३८, रा. ढोकी, ता. धाराशिव) हा आरोपी जुगार खेळताना पोलिसांना आढळून आला. त्याच्या ताब्यातून कल्याण मटका जुगाराचे साहित्य तसेच रोख रक्कम ११ हजार ५५० रूपये जप्त करण्यात आली. यासंदर्भात ढोकी पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ढोकी पोलिस करत आहेत.

---

## तुळजापुरात मायलेकीची गळफास घेऊन आत्महत्या

### सहा महिन्यांपूर्वीच झाले होते मुलीचे लग्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ मार्च -**

शहरातील गवते प्लॉटींग परिसरात मंगळवारी (दि. २५) दुपारी मायलेकींनी एकाच दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली. या दुर्दैवी घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

आत्महत्या करणाऱ्या महिलांचा ओळख पटली असून, रत्नमाला संजय पवार (वय ४५, रा. करंजे, ता. करमाळा, ह.मु. तुळजापूर) आणि त्यांची विवाहित मुलगी प्रतीक्षा तुषार पाटील (वय २३, रा. सापटने, ता. टेंभुर्णी) अशी मृत मायलेकींची नावे आहेत. रत्नमाला पवार या शहरातील प्रतिष्ठित शाळेच्या मुख्याध्यापकाच्या पत्नी आहेत, तर प्रतीक्षा हिचे लग्न अवघ्या सहा महिन्यांपूर्वीच झाले होते. प्रतीक्षा हिचे लग्न सहा महिन्यांपूर्वीच झाले होते. गुढीपाडवा सणानिमित्त ती माहेरी आली होती. दोघींनी घराच्या आतून कडी लावून नायलॉनच्या एकाच दोरीने गळफास घेतला. घटनास्थळी पोलीस निरीक्षक आण्णासाहेब मांजरे, उपनिरीक्षक विजय थोटे, तपास अंमलदार शिखारे, अरुण शिरगिरे आणि प्रमोद रोटे यांनी भेट दिली आणि तपासकार्य सुरू केले.

शवविच्छेदनानंतर मंगळवारी रात्री उशिरा करंजे (ता. करमाळा) येथे मायलेकींवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. आत्महत्येचे कारण स्पष्ट होण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

---

### धाराशिवमध्ये कौटुंबिक वादातून युवकाची हत्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**

मामुली वादातून झालेल्या हाणामारीत एका युवकाचा वस्त्ऱ्याने गळा चिरून खून केल्याची धक्कादायक घटना उतमी कायापुर (ता. धाराशिव) येथे घडली. हा प्रकार २६ मार्च रोजी रात्री ९.३० वाजता घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चांगदेव सदाशिव ताटे (वय २१, रा. इंदिरानगर, उतमी कायापुर) हा रस्त्याने जात असताना आरोपी राम ताटे याने त्याला अडवले. लोकांकडून कामाचे पैसे का मागतोस? या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपीने चांगदेव याच्यावर वस्त्ऱ्याने हल्ला केला. या हल्ल्यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

या प्रकरणी मृताच्या आई विजाबाई ताटे यांनी दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## शिक्षक परिषदतर्फे व्याख्यान व कर्तबगार महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्नित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग जिल्हा शाखा धाराशिवतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्म जयंती निमित्त जाहीर व्याख्यान व १७ कर्तुत्वान महिलांचा सन्मान सोहळा धाराशिव येथे उत्साहात संपन्न झाला.



तुळजापूर विधानसभेचे आ. राणा पाटील साहेब, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, युवराज नळे, शिक्षक परिषदेचे प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे, दिपाली कुलकर्णी, अंजली काळे, दैवशाला हाके, प्रांत कार्याध्यक्ष मच्छिंद्र गुरमे व महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख पल्लवी पिसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. ॲड. मीरा कुलकर्णी यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर व्याख्यान दिले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा शाखेच्या सर्व कार्यकर्त्यांनी अनमोल प्रयत्न केले. प्रांत सहकार्यवाह किशोर पिसे, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, जिल्हा कार्यवाह राजाभाऊ हुकिरे, सुरेश राऊत, विशाल जाधव, सतीश कानडे, शेषराव चव्हाण, शिवाजी चव्हाण, सतीश जाधवर, सुनील सूर्यवंशी, वसंत पाटील, गौरीशंकर कलशेट्टी, पांडुरंग गड्डीमे, दत्तात्रय दंडगुले, दयानंद पवार, ज्योती साकोळे, प्रमिला वाघे, राजश्री जानराव आदिनी परिश्रम घेतले.

---

▶▶ नळदुर्ग न.प.चा गलथान कारभार...

## शहवासियांना दुषित पाणी पुरवठा!

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२७ मार्च -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या गलथान कारभारामुळे शहरवासियांना दुषित पाणीपुरवठा होत असल्याने शहरवासियांमधुन तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नगरपालिकेला तुरटी आणि ब्लिचिंग पावडर पुरवठा करण्याऱ्या ठेकेदाराने तुरटी व ब्लिचिंग पावडरचा पुरवठा केला नसल्याने शहरात दुषित पाणीपुरवठा झाला असुन या ठेकेदारावर नगरपालिका प्रशासनाने तात्काळ कारवाई करुन त्याचा ठेका रद्द करावा अशी मागणी होत आहे.



नळदुर्ग शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या बोरी धरणात मुबलक पाणी असताना आजही शहरवासियांना आठ ते नऊ दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नामुळे नळदुर्ग शहराला नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम मंजुर झाले असुन सध्या नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु आहे. सुरुवातीला संबंधित ठेकेदाराने पाणीपुरवठा योजनेचे काम अतिशय वेगात सुरु केले होते. मात्र सध्या या कामाची गती मंदावली असुन अतिशय संथ गतीने हे काम सुरु आहे. कामाचा वेग असाच राहिला तर नळदुर्गकरांचा पाण्याचा वनवास संपणार नसल्याचे दिसुन येत आहे.

शहराला सध्या अतिशय गढुळ, पिवळ्या रंगाचे व दुषित पाणीपुरवठा होत आहे. याला जबाबदार न.पा.चा पाणी पुरवठा विभागच आहे. वास्तविक पाहत सध्या अतिशय कडक उन्हाळ्याचे दिवस आहेत त्यामुळे शहरवासियांना मुबलक व शुद्ध पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी न.प. प्रशासनाची आहे. मात्र शहरवासियांना शुद्ध पाणीपुरवठा करण्यात नगरपालिका प्रशासन असमर्थ ठरल्याचे दिसुन येत आहे. नळाद्वारे पाणीपुरवठा होणाऱ्या पाण्यात तुरटी तसेच ब्लिचिंग पावडर टाकले नसल्याने शहरवासियांना अतिशय अशुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे अगोदरच शहरात आठ ते नऊ दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे अशावेळी हे गढुळ तसेच पिवळ्या रंगाचे दुषित पाणी आठ दिवस पिण्यासाठी कसे टिकणार? हा प्रश्नच आहे. अशाप्रकारचे गढुळ व पिवळ्या रंगाच्या पाण्यामुळे शहरवासियांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र नगरपालिकेला तुरटी व ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करणारा ठेकेदार वेळेवर तुरटी व बिल्चिंग पावडरचा पुरवठा व्यवस्थित व वेळेवर करत नसल्याने शहरवासियांना गढुळ व पिवळ्या रंगाचा पाणीपुरवठा होत असल्याचे बोलले जात आहे. नागरीकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या संबंधित ठेकेदारावर नगरपालिका प्रशासनाने कडक कारवाई करुन त्याचा ठेका रद्द करण्याची गरज आहे. केवळ ठेकेदार पोसण्यासाठी नगरपालिकेने कुणालाही ठेका न देता पात्र ठेकेदारलाच तुरटी व ब्लिचिंग पावडर पुरवठा करण्याचा ठेका द्यावे अशी मागणी होत आहे.

---

## पिक विम्याच्या बाबतीतील ३० एप्रिल २०२४ चे शेतकरी विरोधी परिपत्रक रद्द करा

▶▶ खा. ओमराजे निंबाळकरांनी घेतली तिसऱ्यांदा कृषीमंत्र्याची भेट...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**

धाराशिव जिल्हयातील शेतकऱ्यांचा हक्काचा विमा हा ३० एप्रिल २०२४ च्या जुलमी परीपत्रकामुळे भेटत नसल्याने शेतकऱ्यांना प्रतीहेक्टरी २४ हजार एवढा विमा मिळणे ऐवजी केवळ प्रती हेक्टरी ६ हजार रुपये विमा मिळत असल्याचे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी सदर परीपत्रक तात्काळ रद्द करुन शेतकऱ्यांना पुर्वीप्रमाणे विमा देण्यात यावा. याबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट घेवून सदर परीपत्रक तात्काळ रद्द करणेबाबत पत्राव्दारे मागणी केली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी २०२३ मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत विमा हप्ता भरून आपली पिके सुरक्षित केली होती. मात्र, अल्प पर्जन्यामुळे मोठ्या प्रमाणावर पिके वाया गेली. या पार्श्वभूमीवर, एचडीएफसी विमा कंपनीने २५ टक्के आगाऊ नुकसानभरपाई म्हणून २५४ कोटी रुपये वाटप केले होते. मात्र, ऐन लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात ३० एप्रिल २०२४ रोजी केंद्र सरकारने शेतकऱ्यावर अन्यायकारक करणारे पिक विमा च्या बाबतीत परिपत्रक काढले असल्याने धाराशिव जिल्ह्यातील ५७ महसुली मंडळांमधील शेतकऱ्यांना केवळ २५७ कोटी रुपयांचा विमा मंजुर करण्यात आला. याशिवाय, २०२३ सालच्या ९०० कोटी आणि २०२४ सालच्या ७५० कोटी रुपये असे एकूण १६५० कोटी रुपये एवढे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. परिणामी, शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. या संदर्भात, ओमप्रकाश भूपालसिंह उर्फ पवन राजेंनिंबाळकर



यांनी १ जुलै २०२४ रोजी केंद्र सरकारच्या कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट घेऊन हे परिपत्रक तत्काळ रद्द करण्याची मागणी केली होती. तसेच, २२ जुलै २०२४ व ११ फेब्रुवारी २०२५ रोजी लोकसभा सत्रातही हा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

तथापि, अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप आणि चिंता वाढली आहे. या परिस्थितीवर त्वरित तोडगा काढून शेतकऱ्यांना त्यांचा वैध विमा मिळावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. यासाठी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्यासह खा. प्रणिती शिंदे डॉ खासदार शिवाजी काळगे, खासदार बळवंत वानखेडे खासदार शोभा बच्छाव, खासदार कल्याण काळे यांच्यासह अन्य खासदार उपस्थीत होते.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**

छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार शिवजयंती सोहळा तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय मध्ये साजरा करण्यात आला.

त्याप्रसंगी विद्यार्थ्यांन साठी विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. यामध्ये प्राधान्याने मुलांच्या आणि मुलींच्या क्रिकेट स्पर्धा तसेच महाविद्यालय स्टाफच्या क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. स्पर्धेतून निवड झालेल्या विजयी आणि उप विजयी स्पर्धकांना पारितोषिक देण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे सर्व विभाग प्रमुख डॉ. पी.एस. कोल्हे, अकॅडेमिक डीन डॉ.डी.डी. दाते, डॉ. यु.के. वडणे, प्रा.एस.एम. पवार, प्रा.पी.एम. पवार, डॉ.पी.टी. माने यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.पी.एस. तांबारे, प्रा.पी.व्ही कोकाटे, प्रा.डी.बी. बोरकर, प्रा.आर.एम. शेख यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व इतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनावर विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या आदर्शांचे आपल्या जीवनामध्ये पालन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आरती करून करण्यात आली. त्यानंतर कॉलेजच्या कॅम्पस मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या याप्रसंगी महाविद्यालयातील इंजिनिअरिंग व फार्मसी विभागाचे सर्व विद्यार्थी उत्साहाने सहभागी होऊन शिवसोळा साजरा करण्यात आला.



# ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी ग्राहक हक्क शिक्षणाची गरज : गोविंद येरमे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ मार्च -**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष दिवंगत जॉन एफ केनेडी यांनी १५ मार्च १९६२ रोजी ग्राहक हक्काचा ठळक मुद्दा मांडला. तसेच भारतामध्ये १९८३ च्या ग्राहक चळवळीने ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्रिस्तरीय तक्रार आणि निवारण मंच उपलब्ध करून देण्यात आला. प्रत्येक ग्राहकांना वस्तू आणि सेवा निवडणे, माहिती घेणे, त्याबद्दल मत मांडण, तक्रार करणे आणि निवारण करून घेणे असे सहा ग्राहकांचे हक्क ग्राहक संरक्षण कायदा १९८६ मध्ये नमूद केले आहे. प्रत्येकानी या सहा हक्काचे शिक्षण घेणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन तहसीलदार गोविंद येरमे यांनी केले.

येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात तहसील कार्यालय उमरगा आणि वाणिज्य मंडळाच्या वतीने ग्राहक दिनानिमित्त एक दिवशीय ग्राहक कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी गोविंद येरमे बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी आणि प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, नायब तहसीलदार अमित भारती, पुरवठा निरीक्षक सचिन बिराजदार यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेत प्रमुख वक्ते ग्राहक पंचायत चे संघटक प्रा. हेमंत वडणे यांनी ग्राहकांचे हक्क आणि त्याची होणारी फसवणूक यासाठी ग्राहक संरक्षण कायद्यातील तरतुदी आणि त्यावर केलेल्या कार्याची माहिती उपस्थितांना दिली.

अध्यक्षीय समारोपामध्ये प्रमोद कुलकर्णी यांनी ग्राहक हक्कांची होणारी पायमल्ली थांबवण्यासाठी ग्राहक मंचाच्या वतीने राबवण्यात येणारे उपक्रम ची माहिती देताना तरुणांनी या चळवळीत सामील व्हावे असे आवाहन केले.

कार्यशाळेच्या खुल्या चर्चा मध्ये विद्यार्थी प्राध्यापक आणि नागरिकांनी सहभाग घेतला आपल्या समस्या आणि आपण आपणास आलेले अनुभव झालेली फसवणूक या विषयावर खुली चर्चा करण्यात आली. यासाठी मान्यवरांनी त्यांच्या शंकां आणि समस्यांचे निरासन केले.

या कार्यशाळेत जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजारी यांनी उमरगा तालुक्यातील सर्व राशन धारक नागरिक आणि पुरवठादार दुकानदार तसेच विद्यार्थ्यांना एक देश एक सिद्धा पत्रक याबाबत ई-केवायसी साठी




आव्हान करणारी चित्रपट दाखवण्यात आली आणि आव्हान करण्यात आले. कार्यक्रमाच प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले.

यावेळी उमरगा तालुका ग्राहक पंचायतचे अध्यक्ष नंदकुमार शिंदे, तालुका ग्राहक पंचायतचे संघटक धनराज शिंदे , महिला संघटक अश्विनी जोशी उपप्राचार्य डॉ विलास इंगळे उपप्राचार्य डॉ पद्माकर पिठले, प्राध्यापक, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच सूत्रसंचालन प्रा अक्षता बिराजदार आणि आभार प्रदर्शन प्रा. ओमप्रकाश पवार यांनी केले.

कार्यक्रमासाठी प्रा. खंडू मुरळीकर, प्रा. ओमप्रकाश पवार, प्रा. राणी बेंबळगे, प्रा. अंजली चव्हाण, वाणिज्य मंडळाचे सचिव श्रीजल पाटील, सहसचिव प्रतीक्षा जाधव, कोषाध्यक्ष ऋतुराज माने, तेजस दांडगे यांच्यासह आदींनी मोलाचे परिश्रम घेतले.

## खुदावाडी येथे युवकाला मारहाण; तीन जणांविरोधात गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ मार्च -**

किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून खुदावाडी (ता. तुळजापूर, जि. धाराशिव) येथे तिघांनी मिळून एका युवकाला मारहाण केल्याची घटना घडली. हा प्रकार २५ मार्च २०२५ रोजी रात्री १० वाजता घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शरद मुकींद वाघमारे (वय २८, रा. खुदावाडी) हे आपल्या घरासमोर थांबलेले असताना आरोपी धिरज खंडू भालेराव, परमेश्वर बापू सगट आणि गजानन खंडू भालेराव (सर्व रा. खुदावाडी) यांनी त्यांच्याशी वाद घालून शिवीगाळ केली. त्यानंतर तिघांनी मिळून लाथाबुक्यांनी तसेच लोखंडी लहान कोयत्याने मारहाण केली. तसेच, त्यांना जिवे मारण्याची धमकीही दिली.

या प्रकरणी शरद वाघमारे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार नळदुर्ग पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## जिजाऊ रथयात्रेचे धाराशिव शहरात जल्लोषात स्वागत; रथयात्रेवर पुष्पवृष्टी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**

मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व संभाजी ब्रिगेडचे प्रदेश महासचिव सौरभ खेडेकर, ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. अर्जुन तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर मराठा जोडो अभियानांतर्गत निघालेल्या रथयात्रेचे धाराशिव शहरात बुधवारी (दि.२६) दुपारी जल्लोषात आगमन झाले. शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात समाजबांधवांनी या यात्रेचे पुष्पवृष्टी करत फटाक्यांची आतिषबाजी करत स्वागत केले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात जिजाऊ रथयात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व





समाजाच्या बांधवांनी या रथयात्रेचे उत्स्फूर्त स्वागत केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून यावेळी समाजबांधवांनी घोषणा देत रथयात्रेचे स्वागत केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सर्वांनी अभिवादन केले. महात्मा जोतिबा फुले चौकात गेल्यानंतर महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांना अभिवादन करण्यात आले. पुढे संत गाडगेबाबा चौकातही रथयात्रेचे स्वागत करण्यात आले. संत गाडगेबाबा यांना अभिवादन करून रथयात्रा राजमाता जिजाऊ चौकात आली. यावेळी गगनभेदी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. राजमाता जिजाऊ चौकात गृहिणी, महाविद्यालयीन तरुण, तरुणी आणि बालगोपालांनी रथयात्रेचे जल्लोषात स्वागत करत सहभाग घेतला.

यावेळी सामुदायिक जिजाऊ वंदना घेण्यात आली आणि राजमाता जिजाऊ मांसाहेब यांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. ही रथयात्रा पुढे छत्रपती शाहू महाराज चौकात गेली. तीन तासाच्या शहरातील प्रवासात घरोघरी रथयात्रेचे महिलांकडून पूजन करून स्वागत करण्यात आले. धाराशिव शहरातून या रथयात्रेचे कळंबकडे प्रस्थान झाले.

यावेळी अध्यक्ष सौरभ खेडेकर, कार्याध्यक्ष प्रा. विजय तनपुरे, संदीपान जाधव प्रदेश उपाध्यक्ष, अशोक ठाकरे विभागीय अध्यक्ष, महेश भगत जिल्हाध्यक्ष सेवा संघ धाराशिव, ॲड. तानाजी चौधरी अध्यक्ष संभाजी ब्रिगेड, विजयकुमार पवार कार्याध्यक्ष, जिजाऊ ब्रिगेड अध्यक्षा रेखाताई पवार,

डॉ. वैशाली बलवंडे अध्यक्ष जिजाऊ जन्मोत्सव समिती धाराशिव, मंजुताई पाटील, नंदकुमार गवारे, मुकुंद घाडगे, बलराज रणदिवे, रोहित पडवळ, अभय इंगले, संदीप इंगले- अध्यक्ष मध्यवर्ती शिवजन्मोत्सव समिती, आकाश मुंडे उपाध्यक्ष संभाजी ब्रिगेड, सुधीर सस्ते, अक्षय नाइकवाड़ी, संकेत सूर्यवंशी, केतन घाडगे यांच्यासह शहरातील महिला, मुली, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रथयात्रेत सहभागी मंडळीचे सकल मराठा समाज, मराठा क्रांती मोर्चा, स्वराज्य संघटना, मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड आणि संभाजी ब्रिगेडच्या वतीने स्वागत करण्यात आले.

## भारुडातून समाज जागृतीचे काम : कृष्णाई उळेकर यांच्या कार्यक्रमाला उमरगाकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ मार्च -**

लोककला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यमही आहे, याचा प्रत्यय उमरग्यात भरलेल्या भारुडाच्या कार्यक्रमातून आला. सुप्रसिद्ध भारुड कलाकार कृष्णाई उळेकर यांच्या सादरीकरणाला उमरग्यातील रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

गेल्या रविवारी स्थानिक नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमात कृष्णाई कोळेकर यांनी सामाजिक संदेशपर भारुडे सादर केली. व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षणाचे महत्त्व, स्त्री सक्षमीकरण अशा विविध विषयांवर त्यांनी रसाळ व प्रभावी शैलीत भारुडे सादर करत प्रेक्षकांना अंतर्मुख केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच ज्ञानेश्वर माउलींच्या ओवीने भारुडाची माळ गुंफूया असे म्हणत त्यांनी संत परंपरेचे स्मरण केले. त्यानंतर नशा सोड रे नशेच्या आधीन होऊ नको या व्यसनमुक्तीविषयक भारुडाने प्रेक्षकांना साद घातली.

लेकीच्या शिक्षणाला घालू नका अडथळा या स्त्री शिक्षणावर आधारित भारुडाने विशेष दाद मिळवली.

यावेळी स्थानिक सामाजिक संस्थांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला शहरातील नागरिक, युवक आणि महिलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या शेवटी कृष्णाई कोळेकर यांनी लोककलांचे जतन आणि संवर्धन करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून भारुडासारख्या पारंपरिक लोककलेच्या जिवंततेची जाणीव उमरग्यातील प्रेक्षकांना झाली. सामाजिक समस्यांवर मार्मिक भाष्य करणाऱ्या भारुडामुळे उपस्थितांवर सकारात्मक प्रभाव पडला.

## गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार पोर्टलचे मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते उद्घाटन

**धाराशिव, दि.२७ मार्च -**

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आणि नाला खोलीकरण व नाला रुंदीकरण या योजनेच्या पोर्टलचे उद्घाटन नुकतेच मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथून या कार्यक्रमाला दुरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रभाकर महामुनी, मृद व जलसंधारण अधिकारी उपस्थित होते.

## जि.प.कडून ६७ विद्यार्थ्यांचा राज्यांतर्गत अभ्यास दौरा यशस्वी



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ मार्च -**

दि.२३ ते २६ मार्च या चार दिवसाचा राज्याअंतर्गत अविष्कार अभियान अभ्यास दौरा संपन्न झाला. यासाठी धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांच्या संकल्पनेतून नोडल अधिकारी मैंदर्गी आर. सी. उपशिक्षणाधिकारी (प्रा) यांच्या पुढाकाराने समग्र शिक्षा अभियानांतर्गत राष्ट्रीय अविष्कार अभियानमध्ये धाराशिव जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील विविध गुणवत्तेचे निकष पूर्ण करणारी शाळा मधील विविध अभियानांतर्गत बक्षीसपात्र शाळा पाचवी व आठवी स्कॉलरशिप व एनएमएमएस होल्डर असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषद च्या शाळेतील ६७ विद्यार्थ्यांची अविष्कार अभियान अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली होती.

धाराशिव जिल्ह्यातील शैक्षणिक दृष्ट्या प्रगत शाळेतील विद्यार्थ्यांचे लर्निंग आऊट कम्स सर्वोत्तम असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्या विद्यार्थ्यांना इतर राज्यात व राज्यांतर्गत शैक्षणिक ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन राज्यातील शाळा व इतर ठिकाणी आपल्या राज्यातील मुलांनी भेट दिल्यास विद्यार्थ्यांच्या विचारांची देवाणघेवाण, संस्कृती वृद्धीकरण व आनंददायी शिक्षण प्राप्त करण्यास मदत होईल व विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ होईल यासाठी हा अभ्यास दौरा विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणार आहे. सहल प्रमुख दादाराव तेलंग व काटेकर यांच्या मदतीने हा राज्यांतर्गत अभ्यास दौरा पुणे व मुंबई येथे संपन्न झाला पुणे येथील राजीव गांधी झूलॅजिकल पार्क कात्रज, पूणे आयुका एस्ट्रॉनॉमिक व स्ट्रो फिजिक्स सेंटर पुणे, ऐतिहासिक शनिवार वाडा. लाल महाल, इस्कॉन टेम्पल, सावित्रीबाई फुले यांनी चालू केलेली भिडे वाड्यातील मुलीं साठीची देशातील पहिली शाळा, महाराष्ट्राचे विधान भवन गेटवे ऑफ इंडिया, ताज हॉटेल, मरीन ड्राईव्ह, गिरगाव चौपाटी, इत्यादी ऐतिहासिक व भैगोलिक व शैक्षणिक ठिकाणी या विद्यार्थ्यांची भेट झाली. अभ्यास दौऱ्यासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विधान भवन येथे भेटून धाराशिव चे विद्यमान आमदार कैलास घाडगे पाटील, उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी, धाराशिवचे माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड, धाराशिव जिल्हा भाजपा अध्यक्ष संताजी चालुक्य, नितीन काळे, दत्ता कुलकर्णी, नेताजी पाटील यांनी अभिनंदन केले.

# भूजल पातळी वाढविण्यासाठी यंत्रणांनी उपाययोजना कराव्यात : जिल्हाधिकारी पुजार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**

जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान कमी आहे. अनेक गावांना उन्हाळ्याच्या दिवसात पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. भविष्यात पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ग्रामस्थांना सोबत घेऊन शोषखड्डे तयार करण्यात यावे तसेच जल पुनर्भरणाचे कार्यक्रम देखील हाती घेण्यात यावे. यंत्रणांनी सामूहिक शेततळे, सिमेंट नाला बंधारे, मातीनाला बांध, विहीर पुनर्भरण शासकीय व खाजगी इमारतीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे भूगर्भात संचयन करताना भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी यंत्रणांनी विविध प्रकारच्या उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले.

२५ मार्च रोजी जिल्हाधिकारी यांचे कक्षात पाणी पुरवठ्याची संबंधित यंत्रणांचा आढावा घेताना पुजार बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी (रोहयो) धरमकर, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता आवटी, जिल्हा जलसंधारण अधिकारी पि.के महामुनी, जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाचे जलसंधारण अधिकारी सी.आर. राऊळ, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता ढवळे, जिल्हा भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या कनिष्ठ वैज्ञानिक डोंगरे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सहाय्यक अभियंता पोद्दार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



पुजार म्हणाले की, धाराशिव व कळंब तालुक्यातील ज्या ७२ गावातील भूजल पातळी कमी आहे. त्या गावातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी आतापासूनच उपाययोजना करून मोठ्या प्रमाणात येत्या पावसाळ्यात पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करण्यात यावे.त्यामुळे या गावातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल. या गावाच्या शिवारात शेततळी, नाला खोलीकरण, तलावातील गाळाचा उपसा करणे, गॅबिरीयन बंधारे तयार करणे, शेततळे तयार करणे, सिमेंट नाला बंधारा बांधणे, रिचार्ज शाफ्टची कामे मोठ्या प्रमाणात यंत्रणांनी आत्ताच हाती घ्यावीत. भूगर्भात पाण्याचे संकलन करण्यासाठी ग्रामस्थांना सहभागी करून घ्यावे. पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे संकलन करण्यासाठी ग्रामस्थांना प्रोत्साहित करावे, असे ते यावेळी म्हणाले.

ज्या गावात भूजल पातळी कमी आहे,अशा गावात आवश्यक त्या उपायोजना करण्यात याव्यात असे सांगून पुजार म्हणाले, या गावातील शेतकऱ्यांना



सूक्ष्म सिंचनावर भर देण्यास प्रोत्साहित करावे.

आवश्यक त्या ठिकाणी गॅबिरीयन बंधारे, सिमेंट नाला बांध, नाला खोलीकरण व तलावातील गाळ उपसणे, जलतारा, शोषखड्ड्याची कामे एप्रिल आणि मे महिन्यात हाती घ्यावी. त्याचा उपयोग पावसाळ्यात होणार असून त्यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असल्याचे पुजार यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीला उपस्थित संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागाकडून भूजल पातळीच्या वाढीसाठी व जलसंधारणासाठी करण्यात येत असलेल्या कामांची व उपाययोजनांची माहिती यावेळी दिली.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ‘व्हीएस पँथर’ चा १८ मे ला सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व्हीएस पँथर संघटनेच्यावतीने सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा १८ मे २०२५ रोजी होणार आहे. यात नववधू-वरांची पालकांनी नोंदणी करावी असे आवाहन संघटनेचे संस्थापक विनोद खटके यांनी केले आहे.

बुधवारी (दि.२६) येथील भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सहावा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यासंबंधी पूर्वतयारीची बैठक घेण्यात आली. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक विनोद खटके होते. पुढे ते म्हणाले, येणाऱ्या १८ मे रोजी होणारा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा थाटामाटात करावयाचा आहे. यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नव वधू-वरांची नोंदणी करण्यासाठी परिश्रम घ्यावेत, नोंदणी निशुल्क होणार आहे. नव दाम्पत्यांना संघटनेच्यावतीने मनी मंगळसूत्र, वधू-वरांचे कपडे, पलंग-गादी, संसारोपयोगी साहित्य मोफत दिले जाते. वऱ्हाडींसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात येते. हा सोहळा १८ मे रोजी आंबेडकर पार्कवर सायंकाळी साडे सहा वाजता होणार आहे. गरजूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन खटके यांनी केले आहे. विवाह नोंदणीसाठी व्हीएस पँथर संघटनेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील कार्यालयात संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

बैठकीस संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सचिन मस्के, ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे, मार्गदर्शक संतोष मांदळे, रवी कुरील, आनंद जाधव, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ, जिल्हाध्यक्ष शरद किनीकर, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे, अजय सूर्यवंशी, सुनील सातपुते, महेश कांबळे, अजय वाघमारे, असदभाई शेख, संतोष जाधव, संजय सुरवसे, आबासाहेब गायकवाड, शाहरुख मणियार, पंकज पाचपिंडे उपस्थित होते



### संक्षिप्त वृत्त...

## ‘बीजेएस’तर्फे गीत गायन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** आचार्य सम्राट स्व. गुरुदेव आनंदऋषीजी यांच्या पुण्यस्मरणार्थ भारतीय जैन संघटनेच्या लातूर येथील महिला शाखेने भव्य गीत गायन स्पर्धेचे आयोजन केले आहे. केवळ पंधरा वर्षांवरील महिलांसाठीच ही स्पर्धा खुली आहे.

शुक्रवारी (दि.२८) दुपारी २.३० ते सायंकाळी ५ या वेळेत श्री गुजराती जैन स्थानक, गुजराती गल्ली, लातूर येथे ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेत केवळ धार्मिक आणि गुरुभक्तीपर स्तवनच गाता येईल. प्रत्येक स्पर्धकाला ३ मिनिटांचा अवधी दिला जाईल. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय, तसेच दोन उत्तेजनार्थ पुरस्कार विजेत्यांना स्पर्धेच्या सांगता समारंभात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार दिले जाणार आहेत. महिलांनी या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन बीजेएस महिला संघटनेने केले आहे.

## निलंगा तालुका सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालय स्थलांतरीत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** निलंगा तालुका सहाय्यक निबंधक सहकारी संस्था हे कार्यालय मागील २५ वर्षापासून शेटकार बिल्डींग पहिला मजला , दत्तानगर निलंगा येथे कार्यरत आहे. हे कार्यालय १ एप्रिल, २०२५ पासून डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर अर्बन को-ऑप बँक लि. निलंगा (अवसायनात) शिवाजी चौक , लातूर रोड ता. निलंगा येथे स्थलांतरीत होणार आहे.
तरी १ एप्रिल २०२५ पासून कार्यालयाचा पत्ता सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. निलंगा द्वारा डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर, अर्बन को-ऑप बँक लि. निलंगा (अवसायनात) शिवाजी चौक, लातूर रोड ता. निलंगा जि. लातूर असा राहील, असे निलंगा सहकारी संस्थेचे सहाय्यक निबंधक एन.एस. किलचे यांनी कळविले आहे.

## सार्वजनिक गुढी पाडवा महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी कांबळ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** येथील मराठवाड्यातील प्रथम मानाची सार्वजनिक गुढी महोत्सव समितीची नांदेड रोडवर समितीचे संस्थापक अध्यक्ष दीपक गंगणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न होऊन सर्वानुमते २०२४ - २०२५ सार्वजनिक गुढी पाडवा महोत्सव समितीच्या २७ व्या अध्यक्षपदी सौ. निर्मलाताई कांबळे यांची एकमताने निवड करण्यात आली. सार्वजनिक गुढी पाडव्याच्या अध्यक्षपदी निर्मलाताई कांबळे यांची निवड करण्यात आल्याने सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.
यावेळी समितीचे सचिव गिरीष तुळजापूरे यांच्या हस्ते निर्मलाताई कांबळे यांचा शॉल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या लातूर शहरात सार्वजनिक गुढीपाडवा महोत्सव समितीच्या माध्यमातून सण १९९८ पासून लातूर शहरातील मध्यवर्ती गंज गोलाई भागात आई जगदंबा मंदिराच्या समोर राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक तिरंगा गुढी मान्यवरांच्या हस्ते उभारून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्यकरणार्या व्यक्तीचा सत्कार करीत सामाजिक जनजागृती पर संदेश देऊन जनजागृती करण्यात येते प्रतिवर्षा प्रमाणे या ही वर्षी सार्वजनिक गुढी महोत्सव समितीच्या वतीने सार्वजनिक गुढीपाडवा महोत्सव साजरा करण्यात येणार आहे यावेळी सार्वजनिक गुढीपाडवा महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष दीपक गंगणे ,गिरीश तुळजापूरे चंद्रप्रकाश बगडे,बाबासाहेब बनसोडे,गणेश घोडके,राजकुमार जोशी ,भगवेश्वर धनगर यांची प्रमुख उपस्थिती होती.

## लातूर जि. प.ला कल्पकतेचा तृतीय पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** लातूर जिल्हा परिषदेने खेलो लातूर अंतर्गत मुलांच्या शालेय अभ्याक्रमाबरोबर शारिरिक विकास व्हावा म्हणून लातूर जिल्हयात प्रथमच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून जिल्हा परिषद शाळामध्ये सुसज्ज असे क्रिडांगण तयार करण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवला. या उपक्रमाला राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२४-२०२५ चा सर्वेतृष्ठ कल्पना, उपक्रमाचा लातूर जिल्हा परिषदेला तृतीय पुरस्कार जाहिर झाला आहे.

## सिग्नल, पार्किंगचे योग्य नियोजन करावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी आणि प्रमुख चौकांमध्ये होणारी वाहतूक कोंडी रोखण्यासाठी आवश्यकतेनुसार सिग्नल आणि पार्किंगचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. जिल्हास्तरीय रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या.



लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांच्यासह महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

शहरात वर्दळीच्या ठिकाणी बेशिस्तपणे वाहनांचे पार्किंग केले जात असल्याने वाहतुकीची कोंडी होत असल्याचे दिसते. त्यामुळे प्रत्येक वाहनांसाठी पार्किंगची ठिकाणे निश्चित करावीत. यासाठी महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन विभाग, शहर वाहतूक शाखा यांनी संयुक्तपणे पाहणी करून पार्किंगची ठिकाणे निश्चित करावीत. तसेच प्रमुख चौकांच्या ठिकाणी सातत्याने वाहतूक कोंडी होवून वाहतूक विस्कळीत होत आहे. अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार सिग्नल कार्यान्वित करावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

वाहतूक नियमांच्या जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबवावी वाहतूक नियमांचे पालन होत नसल्याने होणाऱ्या रस्ते अपघातांचे प्रमाण अधिक आहे. हे अपघात रोखण्यासाठी वाहनधारकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती आवश्यक आहे.

याकरिता परिवहन विभाग, वाहतूक पोलीस शाखा, सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्तपणे जनजागृती मोहीम राबवावी. यामध्ये वाहनांवर रिफ्लेक्टर लावण्याबाबत सूचना द्याव्यात, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

## ३० हजारांची लाच मागणारा पोलीस शिपाई एसीबीच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** ‘दाखल गुन्ह्यात अटक न करता, केवळ नोटीस देऊन सोडून देतो, त्या बदल्यात ३० हजार रुपये दे’, असे म्हणत एका पोलीस शिपायाने आरोपीकडून ५ हजार रुपयांची लाच स्वीकारली. उर्वरित तडजोडीअंती ठरलेल्या २५ हजारांतील १५ हजार घेण्यास संशय आल्याने नकार दिला. परंतु, लाच घेतल्याचे सिध्द झाल्याने औसा तालुक्याच्या भादा पोलीस ठाण्यातील पोलीस शिपायाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मंगळवारी रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

औसा तालुक्यातील भादा पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई पदावर कार्यरत असलेले आरोपी ज्ञानेश्वर विनायक जमादार (रा. कातपूर रोड, लातूर) याने एका आरोपीवर गुन्हा दाखल केला होता.

त्या गुन्ह्यात अटक न करता केवळ नोटीस देऊन सोडून देतो, असे म्हणत आरोपी ज्ञानेश्वर जमादार याने आरोपीकडे ३० हजार रुपयांची लाच मागितली. त्यातील टोकन म्हणून ५ हजार रुपयांची लाच दि. ८ मार्च २०२५ रोजी मिळाल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक पथकाच्या खात्रीत मान्य केले. तडजोडीअंती २० हजार रुपये घेण्यावर पोलीस शिपाई ज्ञानेश्वर जमादार याने मान्य केले. उर्वरित रक्कम देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा लावला. त्यानुसार असे तीन दिवस ज्ञानेश्वर जमादार याला २० हजार रुपये घेण्यासाठी बोलावण्यात आले. परंतु, लाचलुचपत प्रतिबंधक पथकाचा संशय आल्याने ज्ञानेश्वर जमादार याने लाच स्वीकारण्यास नकार दिला. परंतु, ५ हजार रुपये लाच घेतल्याचे सिध्द झाल्याने मंगळवारी (दि.२५) रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास पोलीस शिपाई ज्ञानेश्वर जमादार याच्या विरोधात विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुरनं. २०५/२५ कलम ७, ७ अ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी ज्ञानेश्वर जमादार याला अटक केली आहे. ही कामगिरी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक सचिन बर्गे यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, अन्वर मुजावर, हेड कॉन्स्टेबल दामटे आदिंनी केली.

## जीवनाचे उत्कृष्ट चित्रण श्रीमद् भागवतात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** भगवंताने माणसासाठी निर्माण केलेल्या जीवनाचे उत्कृष्ट चित्रण श्रीमद् भागवत कथेत वर्णिलेले आहे. भगवंताने या कथेतून प्रत्येक स्तरातील व्यक्तीला आपल्या जीवनात सन्मार्गावर जीवन व्यतीत करण्याची शिकवण दिलेली आहे. जीवनातील सुख-दुःखाची घालमेल करता करता होणारी व्यक्तीची हेळसांड भगवंताच्या सानिध्यात विसरून नवचैतन्याची प्राप्ती होते, असा विश्वास भागवताचार्य डोंगरे महाराज यांनी व्यक्त केला.




तालुक्यातील हरंगुळ (बु.) परिसरातील कैलासनगर येथील शंभू महादेव देवस्थानात शिवालय महिला भजनी मंडळाच्यावतीने आयोजित अखंड शिवनाम सप्ताह, श्री परमरहस्य पारायण सोहळ्याच्या तृतीय वर्षाच्या कार्यक्रमाच्या शुभारंभप्रसंगी डोंगरे महाराज भागवत कथेचे विमोचन करत होते.

प्रारंभी सकाळी परमरहस्य ग्रंथाची पूजा करून पारायणास सुरूवात झाली. त्यानंतर हरंगुळ (बु.) च्या सरपंच शीतल भीमाशंकर झुंजारे व भीमाशंकर झुंजारे या मुख्य यजमानांच्या हस्ते कलश स्थापना आणि ग्रंथ पूजा करून या कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी बँझो वादक वाल्मिकी महाराज, गायक श्याम मोरे, तबला वादक कैवल्य पांचाळ, सिंथवादक शिवदास बोने यांच्यासह कैलासनगर, गोविंदनगर, सदाशिवनगर, माउलीनगर तसेच हरंगुळ परिसरातील भाविक - भक्त उपस्थित होते.

## लातूरात योगासन व प्राणायम शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** सार्वदेशिक आर्यवीर दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष बालब्रम्हचारी योगगुरू डॉ. देवव्रत्तजी आचार्य, दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली आर्षयोग प्रतिष्ठान, पतंजली योग समिती, सार्वदेशीक आर्यवीर दल, एम.एन.एस.बँक व जे.एस.पी.एम.शिक्षण संस्था,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने १४ ते २० एप्रिल २०२५ दरम्यान भव्य योगासन शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे.

शिबीराला राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे १४ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या भव्य योगासन व प्राणायाम शिबीरासाठी व योगमय लातूर, सुदृढ लातूर करण्यासाठी योगप्रेमींनीं नोंदणी करून योग शिबिरामध्ये सक्रीयपणे सहभागी व्हावे, असे आवाहन आर्षयोग प्रतिष्ठानचे अध्यक्ष लोकनेते माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले आहे.

या शिबीरामध्ये दररोज सकाळी ५.३० ते ६.०० या वेळेत ध्यान, ६.०० ते ७.०० या वेळेत योगासन, प्राणायाम, ७.०० ते ८.०० या वेळेत निसर्गोपचार अंतर्गत स्टिमबाथ, जलनेती व २० एप्रिल २०२५ रोजी शंखप्रक्षालन ठेवण्यात आलेले आहे. या शिबीरामध्ये महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे व विद्यार्थ्यांनाही फिसमध्ये सवलत दिली जाणार आहे.

## अपर पोलीस महासंचालकांनी घेतला गुन्ह्यांचा आढावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** महाराष्ट्र राज्य दहशतवाद विरोधी पथकाचे अपर पोलीस महासंचालक नवल बजाज हे वार्षिक निरीक्षण व तपासणीसाठी ३ दिवस जिल्ह्यात आहेत. सोमवारी त्यांनी गुन्ह्यांचा आढावा घेतला तर पोलीस मुख्यालयात पोलीस परेडही पार पडली. परेडचे संचलन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, सेकंड इन कमांड बी. चंद्रकांत रेड्डी, सागर खर्डे यांनी केले.

अपर पोलीस महानिरीक्षक नवल बजाज यांनी लातुरात दाखल होताच त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यास भेट दिली होती.



त्यानंतर लातूर पोलीस दलाकडून मॉब डिसपर्सल, दंगा काबू योजनाची प्रत्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील ‘मंथन’ मिटींग हॉलचे उद्घाटन बजाज यांच्या हस्ते झाले. आढावा बैठकीस पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, परीक्षाधीन पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, सागर खर्डे, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, शाखा प्रभारी अधिकारी यांची उपस्थिती होती.

## कला स्थापत्याच्या अभ्यासाठी मोडी लिपी येणे गरजेचेः देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** प्रस्तुत काळात वास्तव सत्य इतिहास लेखनाची अत्यावश्यक गरज आहे. त्याकरिता मोडी लिपी सारख्या अन्य भाषा संशोधकाने व अभ्यासकाने आत्मसात करणे गरजेचे आहे तरच मध्ययुगीन व प्राचीन लेणी व कलास्थापत्याचा व त्याच्या प्रभावाचा योग्य तो अभ्यास होऊ शकतो असे प्रतिपादन शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पी. आर. देशमुख यांनी केले.

ते राजर्षी शाहू महाविद्यालय आणि भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्राचीन व मध्ययुगीन भारतीय लेणी कला व स्थापत्य यांचा सामाजिक प्रभाव या दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलत होते. मंचावर उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. नारायण सूर्यवंशी, डॉ. शिवाजी गाडे, समन्वयक डॉ. अर्चना टाक यांची उपस्थित होती. उपप्राचार्य सदाशिव शिंदे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, वर्तमान काळात जगत असताना भूतकाळातील इतिहास महत्त्वाचा दिशादर्शक असतो. परंतु अनेक ठिकाणी इतिहासा लेखनातून चुकीच्या गोष्टी विकसित झाल्या आहेत, त्याचे पुनर्लेखन करून जे घडले तेच लिहिले पाहिजे. त्यामुळे समाजाला खरा इतिहास कळेल, हे महत्त्वाचे कार्य आपण इतिहास तत्त्वचिंतक म्हणून करावे असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. तर इतिहास अभ्यासक डॉ. सदाशिव दंदे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.ते म्हणाले की, इतिहास अभ्यास दोन प्रकारे होत असतो. एक खरा इतिहास आणि दुसरा बरा इतिहास. खरा इतिहास हा विस्तवासारखा असतो, तो मांडण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याला कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे बरा इतिहासच अधिक प्रमाणात लिहिला गेला म्हणून की, काय इतिहासात विकृतीकरण वाढले असावे असे प्रतिपादन केले . प्रस्ताविक इतिहास विभागप्रमुख तथा समन्वयक डॉ. अर्चना टाक यांनी केले. दोन दिवशी राष्ट्रीय परिसंवादाचा धावता आढावा याप्रसंगी त्यांनी घेतला. तसेच या प्रसंगी उपस्थित इतिहास संशोधक प्राध्यापकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

औसा येथील आझाद महाविद्यालयातील डॉ. शहाजान शेख मनोगतात महाविद्यालयातील सुख सोयी व आदरतिथ्य बद्दल धन्यवाद दिले व या परिसंवादातून इतिहासाबद्दल विशेष प्राचीन व मती योग्य कला स्थापत्य विषयीचे सखोल ज्ञान प्राप्त झाले. तर यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाईचे डॉ. राजाभाऊ भगत यांनी या परिसंवादातून अज्ञात पहिलीचे ज्ञान प्राप्त झाले व बौद्धिक शिदोरी मिळाली या भावना त्यांनी मनोगत व्यक्त केल्या. विशेष म्हणजे या परिसंवादातील सादरीकरण केलेल्या प्राध्यापकांच्या व विद्यार्थी संशोधकाच्या संशोधन पेपर मधून प्रत्येकी दोन पेपरची प्रथम व द्वितीय निवड करून त्यांचा पाहुण्यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. बी.ए. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी किशोर मगर याचा सन्मान करण्यात आला.

## ११ हजार ग्राहकांना ‘अभय’

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या वीजग्राहकांसाठी महावितरणने सुरू केलेल्या अभय योजनेचा लाभ घेत लातूर परिमंडळातील ११ हजार ३१६ वीजग्राहकांनी १६ कोटी ६ लाख रुपयांची थकबाकी भरत पुनर्जोडणी घेतली आहे. अभय योजनेची मुदत ३१ मार्च २०२५ रोजी संपत आहे. उरलेल्या पाच दिवसांत पात्र ग्राहकांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

लातूर, धाराशिव व बीड जिल्ह्यांचा समावेश असलेल्या लातूर परिमंडळातील ११ हजार ३१६ कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या वीजग्राहकांनी १६ कोटी ६ लाख रुपयांचा भरणा करत अभय योजनेचा लाभ घेतला आहे. या ग्राहकांना तब्बल ११ कोटी ६ लाख रुपयांची भरघोस सूट मिळाली आहे.

लातूर जिल्ह्यातील ५ हजार २३६ वीजग्राहकांनी ३ कोटी ५२ लाख रुपयांची थकबाकी भरत १ कोटी ४९ लाख रुपयांची माफी मिळवली आहे. यामध्ये लातूर विभागाच्या १ हजार ९१ ग्राहकांनी ८७ लाख रुपयांचा भरणा करत ३५ लाख रुपयांची सूट मिळवली आहे. तर निलंगा विभागातील २ हजार २९७ ग्राहकांनी १ कोटी ४५ लाख रुपयांचा भरणा करत ५५ लाख रुपयांची सूट मिळवली आहे. तसेच उदगीर विभागातील १ हजार ८४८ ग्राहकांनी १ कोटी १९ लाख रुपयांचा भरणा करत ५९ लाख रुपयांच्या माफी मिळवली.

धाराशिव जिल्ह्यातील कायमस्वरूपी वीज खंडित केलेल्या २ हजार ३१३ वीजग्राहकांनी १ कोटी ५५ लाख रुपयांचा भरणा करत १ कोटी १४ लाख रुपयांची सूट मिळवली आहे. यामध्ये तुळजापूर विभागातील ८३७ वीजग्राहकांनी ६५ लाख रुपयांचा भरणा करत ३८ लाख रुपयांची सूट मिळवली आहे. तर धाराशिव विभागातील १४७६ वीजग्राहकांनी ९० लाख रुपयांचा भरणा करत ७६ लाख रुपयांची सूट मिळवली.



बीड जिल्ह्यातील ३ हजार ७६७ वीजग्राहकांनी १० कोटी ९९ लाख रुपयांचा भरणा करत ८ कोटी ४३ लाख रुपयांची भरघोस सूट प्राप्त केली आहे. यामध्ये अंबाजोगाई विभागातील १०६८ वीजग्राहकांनी ७ कोटी ७५ लाख रुपयांचा भरणा करत ५ कोटी २० लाख रुपयांची सूट मिळवली आहे. तर बीड विभागातील २ हजार ६९९ वीजग्राहकांनी ३ कोटी २४ लाख रुपयांचा भरणा करत ३ कोटी २४ लाख रुपयांची सूट मिळवली आहे. वीजग्राहकांनी थकबाकीमुक्तीसाठी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

## लातुरात पुन्हा मृतावस्थेत आढळले कावळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च -** उदगीर येथे महिनाभरापूर्वी शेकडो कावळ्यांचा मृत्यू झाला होता. यानंतर अहमदपूर तालुक्यातील ढाळेगाव येथे ४२०० कोंबड्यांच्या पिल्लांचा मृत्यू झाल्याने जिल्ह्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

मृत कावळ्यांच्या रक्ताचे नमुने भोपाळ येथील राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग संस्थेत पाठवले असता, बर्ड फ्लूचा अहवाल प्राप्त झाला होता. दरम्यान, बुधवारी (दि. २६) लातूर शहरातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याच्या पाठीमागे तीन कावळे मृतावस्थेत आढळल्याने बर्ड फ्लूच्या संशयामुळे जिल्ह्यातील चिकनप्रेमींमध्ये पुन्हा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

लातूर, सोलापूर जिल्ह्यासह शेजारच्या जिल्ह्यांमध्ये बर्ड फ्लूचा शिरकाव झाला आहे. उदगीर शहरातील कावळ्यांचा बर्ड फ्लूने मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेऊन, शहरातील कुक्कूट पक्ष्यांचे वैद्यकीय नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. त्यापैकी रामनगर येथील कुक्कूट पक्ष्यांचा बर्ड फ्लूविषयक तपासणी अहवाल सकारात्मक आला होता. या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रादुर्भाव क्षेत्राच्या एक किलोमीटरच्या परिसरातील देशी आणि व्यावसायिक पक्ष्यांना शास्त्रोक्त पध्दतीने नष्ट करण्यात आले होते. दरम्यान, बुधवारी महात्मा गांधी पुतळ्याजवळ तीन कावळे मृतावस्थेत आढळून आले. यामुळे चिकनप्रेमींमध्ये पुन्हा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## पत्रकरास जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.२७ मार्च -**

येथील पत्रकार दत्ता पाटील (रा. तळेगाव ता. देवणी) यांना दारूची बातमी छापल्याचा कारणा वरून जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी पत्रकार सवरक्षण कायद्यानुसार देवणी पोलिसात गुन्हा नोद करण्यात आला आहे.

या बाबतीत मिळालेली माहिती अशी की गेल्या आठवड्यात तालुक्यातील अवैध




देशी दारू जप्त केल्याची बातमी दैं. देशन्नती या दैनिकात प्रकाशित झाली होती. याचा राग मनात धरून माझ्या मुलाची बदनामी करतो का म्हणुन आर्वाच भाषेत शिवागळ व परिवारास जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी देवणी पोलिसात पत्रकार सांवरक्षण कायद्यानुसार हनुमंत रंगराव घोनशे (रा. तळेगाव ता. देवणी) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबतचा अधिक तपास पोलीस उपअधिक्षक याच्या कडून करण्यात येत आहे. या घटनेचा तालुका पत्रकार संघाकडून निषेध होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### कर्तव्यदक्ष तलाठी रामलिंग पाटील यांचा सत्कार

**शिरूर अनंतपाळ, दि.२७ मार्च -**

शिरूर अनंतपाळ तलाठी सज्याचे तलाठी रामलिंग पाटील यांनी शिरूर अनंतपाळ सज्जाचा चार्ज घेतल्या पासून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केलेले काम, अवैध मार्गाने होणारी वाळू उपसा, मुरूम तसेच अनेक अवैध उत्खनन बंद केले. शासनाच्या अनेक योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवने व त्या माध्यमातून शेतकरी बांधवांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देणे तसेच शासनाच्या महसूल वसुली मध्ये जनतेला विश्वासात घेऊन व जनतेच्या समस्यांचे निवारण करून जास्तीत जास्त महसूल जमा करून शासनाला देणे या सर्व कार्याची दखल घेऊन लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा घुले यांच्या हस्ते शिरूर अनंतपाळचे तलाठी रामलिंग पाटील यांचा गौरव करण्यात आला होता. त्याबदल तलाठी रामलिंग पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक सुधीर लखनगावे, प्रगतिशील शेतकरी राम कोयले, मनोज बिराजदार, संभा सावंत, तानाजी वलांडे, ज्ञानोबा लोखंडे, विश्वनाथ हांद्राळे आदी उपस्थित होते.

### संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे दोन विद्यार्थ्यां नवोदय पात्र

**अहदमपूर, दि.२७ मार्च -**

येथील संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या अमृता जयपद्म वजीर, सार्थक दिगंबर मेंडके या दोन विद्यार्थ्यांची



लातूरच्या जवाहर नवोदय विद्यालयात शहरी भागातून प्रवेशासाठी निवड झाली आहे. या परीक्षेला ग्रामीण भागातून ८० टक्के व शहरी भागातून २० टक्के जागा असतात. शहरी भागातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना सविता पाटील, प्राजक्ता भोसले, शारदा तिरुके यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष गणेश दादा हाके-पाटील, सचिव प्राचार्या रेखाताई हाके-तरडे, उपाध्यक्षा ॲड. मानसी हाके, संस्था समन्वयक कुलदीप भैय्या हाके, अमरदीप हाके, मुख्याध्यापक आशा रोडगे, मुख्याध्यापक मीना तोवर सह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

### बोरोळ येथे ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्त शिव सप्ताहाचे आयोजन

**देवणी, दि.२७ मार्च -**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षा निमित्त तालुक्यातील बोरोळ येथे दिं २८ मार्च ते दिं ३ एप्रिल या कालावधीत शिव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. शिव सप्ताहानिमित्त संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत शिवचरित्रांची व्याख्यानमाला आणि सकाळी ८ ते १० या वेळेत ग्राम गीतावाचन करण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रमाचे आयोजन श्री संत लक्ष्मणनाथ भीमनाथ महाराज मठ देवस्थान येथे जिल्हा परिषद प्रशाला बोरोळ आणि कै. यशवंतराव चव्हाण मा. व उच्च माध्यमिक विद्यालय बोरोळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. तरी हजारो शिव प्रेमींनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सर्व शिव भक्त आणि ग्रामस्थांनी केली आहे.



### ओंकार पवार यांचा म. गांधी महाविद्यालयात सत्कार

**अहमदपूर, दि.२७ मार्च -**

महात्मा गांधी महाविद्यालयाचा वाणिज्य शाखेत बी कॉम तृतीय वर्षात शिकत असलेला विद्यार्थी पवार ओंकार वैजनाथ याचे पुणे महानगर पालिका परिवहन महामंडळ पुणे येथे वाहक या पदावर नुकतीच नियुक्ती झाली. त्याबद्दल विचार विकास मंडळाचे अध्यक्ष ॲड किशनराव बेंडकुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव सुरेशराव देशमुख, प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ.एस.आर शेळके, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.व्ही.पी. शेळके, प्रा. वर्षा पेठे, प्रा. कोतवाड उपस्थित होते.

### अभियंत्यांसाठी व्याख्यानाचे आयोजन

**तुळजापूर, दि.२७ मार्च -**

येथील तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात स्थापत्य विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या शंभर दिवसांचा सात कलमी कृती कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागीय तुळजापूर प्रशिक्षण शिबिर अंतर्गत उपविभागातील अभियंत्यांसाठी करिता सर्व दि.२६ मार्च रोजी डव्हांसड वेस्ट वॉटर ट्रीटमेंट व मिक्स्ड ऑरख्यानिक कंपोस्ट इन २४ अवर बाय कंपोस्ट मशीन या विषयावर स्थापत्य विभाग प्रमुख प्रा. दिपक पौळ यांनी व्याख्यान व प्रात्यक्षिक सादर केले.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निषेधार्थ निटूर येथे शोले स्टाईल आंदोलन

**रखडलेली पाणी पुरवठा योजना सुरु करण्याची आंदोलकाची मागणी... पाणी पुरवठा सुरु नाही झाल्यास तीन एप्रिल रोजी रास्ता रोको व गाव बंद आंदोलनाचा इशारा...**



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२७ मार्च -**

तालुक्यातील निटूर येथील गेल्या तीन वर्षांपासून रखडलेली पाणी पुरवठा योजना तात्काळ सुरु करावी. पाईप लाईनसाठी रस्ता खोदण्यात आल्याने खराब झालेल्या रस्त्याची दुरुस्ती तात्काळ करावी या व इतर मागणीसाठी आज निटूर च्या सरपंच व ग्रामस्तानी शोले स्टाईल आंदोलन केले.

येत्या तीन एप्रिल पर्यंत जर पाणी पुरवठा सुरु नाही झाला तर रास्ता रोको व गाव बंद आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

सलग दोन तास झालेल्या या आंदोलनात ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. निटूर (ता. निलंगा) येथील सर्व घरांना शुद्ध पाणी मिळावे या हेतूने केंद्र सरकारने तीन वर्षांपूर्वी दहा कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर केली खरी मात्र गेल्या तीन वर्ष्यापासून ही योजना संबंधित कंत्राटदार व त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे कार्यान्वित झाली नाही.

त्यामुळे नागरिकांचे पाण्यासाठी हाल होतं आहेत. दरम्यान या संदर्भात निटूर ग्राम पंचायतने अनेक वेळा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाला पाणीपुरवठा योजना पूर्ण करावी असा लेखी पत्रव्यवहार केले.

परंतु संबंधित कार्यालयाने कसलीच दखल घेतली नाही. त्यामुळे आज निटूरच्या सरपंच प्रतिभा अनिल सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थानी भर उन्हात दोनं तास आंदोलन केले. निटूर मध्ये पाईपलाईनच्या नावाखाली गावातील अनेक रस्ते उकरण्यात आले. त्यामुळे रस्त्यावरून चालणे मुश्किल झाले आहे. पाईप लाईन बुजवल्या नंतर त्यावर पॅच वर्क ही केले नाही. त्यामुळे तीन वर्षांपासून नागरिकांचे हाल होत आहेत. पाणी पुरवठा प्रशासनाच्या या तुघलकी कारभारा विरोधात आज सकाळी सरपंच प्रतिभा अनिल सोमवंशी तसेच उपसरपंच शिवराज सोमवंशी, ग्रामपंचायत सदस्य संदीप पाटील, दिनकर कवडे, श्रावण शिंदे, शिवाजी बाबर, शिवाजी व्यवहारे, तसेच महिला ग्रामपंचायत सदस्य यांनी प्रशासनाचा निषेध म्हणून शोले स्टाईल आंदोलन केले.

यावेळी महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> निटूर (ता. निलंगा) येथे झालेल्या आंदोलनास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अभियंता खरोसेकर, निलंगा पं.स. पाणी पुरवठा विभागाचे कुंभार, निटूरचे तलाठी कुंभार, तसेच इतर अधिकाऱ्यांनी भेट देऊन निवेदन स्वीकारले. तसेच येत्या तीन एप्रिल पर्यंत सर्व गावात उच्च दाबाने पाणी पुरवठा सुरु नाही झाले. तसेच गावातील रस्त्याची दुरुस्ती नाही झाली तर निटूर मध्ये जीवन प्राधिकरणच्या विरोधात रास्ता रोको व गाव बंद आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आले.



## चाकूर न.पं.च्या उपनगराध्यक्षावर १५ नगरसेवकांचा अविश्वास प्रस्ताव दाखल



### भाजप, राष्ट्रवादी व काँग्रेसचे नगरसेवक एकत्र...

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२७ मार्च -**

चाकूर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अरविंद बिराजदार यांच्यावर बुधवारी मुख्याधिकारी प्रतिक लंबे यांच्याकडे नगरपंचायतीच्या १५ सदस्यांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. गेल्या तिन वर्षांपूर्वी चाकूर नगरपंचायतीची निवडणूक झाली होती. यामध्ये प्रहारचे ६, भाजपचे ३, राष्ट्रवादी काँग्रेसचे ५ आणि काँग्रेसचे ३ नगरसेवक निवडून आले होते. त्यावेळी प्रहार आणि भाजप एकत्र येऊन प्रहारचे कपील माकणे नगराध्यक्ष झाले तर भाजपचे अरविंद बिराजदार उपनगराध्यक्ष झाले होते.

२६ मार्च रोजी चाकूर नगरपंचायतीचे भाजप, राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे १५ नगरसेवक एकत्र येऊन उपनगराध्यक्ष यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी प्रतिक लंबे यांच्याकडे दाखल करण्यात आला आहे. यावेळी उपनगराध्यक्ष हे आम्हाला विश्वासात घेत नाहीत व या पदासाठी वेळ देऊ शकत नसल्यामुळे आम्ही सदरील प्रस्ताव दाखल करत आहोत. अशा आशयाचा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे.

> सहजपणे कुठेही उपलब्ध होणारा उपनगराध्यक्ष म्हणून लोकांच्या सेवेत मी कायम सेवा करीत आहे. भेटेल त्या ठिकाणी काम करणारा उपनगराध्यक्ष म्हणून माझी चर्चा असताना मला न सांगता आकसापोटी,सुड भावनेने व राजकीय हेतू साध्य करण्यासाठी, हा अविश्वास प्रस्ताव दाखल करीत असल्याचे उपनगराध्यक्ष अरविंद बिराजदार यांनी सांगितले.

त्या प्रस्तावावर १५ नगरपंचायत सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

त्यामध्ये अब्दुल करीम गुळवे, मिलींद महालिंगे, भागवत फुले, साईप्रसाद हिप्पाळे, मजमिल सय्यद, शबाना सय्यद, ज्योती स्वामी, गंगुबाई गोलावार, गोदावरी पाटील, सुजाता रेड्डी, शुभांगी कसबे, वैशाली कांबळे, हिरकणा लाटे, सय्यद शाहीनबानो, अभिमन्यू धोंडगे यांच्या या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या आहेत.

## उच्च सुरक्षा नंबरप्लेटचे दर माफक व प्रक्रिया सुलभ करावी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२७ मार्च**

नवीन एच.एस.आर.पी. HSRP नंबर प्लेटचे दर माफक करून नंबर प्लेटची प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी ग्राहकतीर्थ बिंदू माधव जोशी प्रणित ग्राहक पंचायत महाराष्ट्र संस्थेच्या शाखेने व जिल्हा संघटक तथा ग्राहक संरक्षण परिषदेचे शासन नियुक्त सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर व ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य शाखा अतनूरच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ईमेलव्दारे केली आहे.

१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी एच.एस.आर.पी.(HSRP) बसवण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचे आणि मुद्दत वाढीचे ग्राहक पंचायत महाराष्ट्र संस्थेने स्वागत केले आहे.

वरील विनंतीवजा मागणीवर सकारात्मक विचार होऊन योग्य कार्यवाही व्हावी, अशी विनंती बालासाहेब शिंदे अतनूरकर, प्राचार्य व्ही.एस. कणसे, प्रा. अविनाश पाटील, प्रा. अमित कवठाळे, भागवत धुमाळ, संध्या शिंदे, गोगलताई धुमाळ, बिराजदार, रूक्मीण सोमवंशी तसेच हणमंत साळुंके, प्रविण सोमवंशी, एस.जी. शिंदे, मयुरी शिंदे, व्यंकटेश शिंदे, रामदास जाधव, सुनिता भंडारे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## असू येथे शासकीय योजनेचा लाभ देण्यासाठी शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ मार्च -**

असू येथील शासन निर्देशाप्रमाणे शंभर दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांनुसार शासकीय अधिकारी कर्मचारी यांच्या गाव भेट दौरा शिबीर आज आसू येथील दत्त मंदिरात पार पाडण्यात आले या शिबिरामध्ये या मंडळातील लोक हजर होते.विविध योजनांचा लाभ देण्यात आला.

सामाजिक अर्थसाहाय्य योजना लाभार्थी आधार प्रमाणीकरण ३०,फॉर्मर आयडी ग्रीस्टॅक कार्ड काढणे ३६, आधार कार्ड मोबाईल लिंक करणे१६, शिधापत्रिकांची केवायसी करणे ५८ असा लाभ, शेतकरी आत्महत्या दीड लाखांचे अनुदान वाटप करण्यात आले, तक्रारी फेरफार मधील निकालाची नक्कल देण्यात आली.

शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष परीश्रम ग्राम विकास अधिकारी भोसले नागटिळक धुमाळ खंबायत, वाळके, कोकाटे व मंडळाधिकारी सुरवसे व आसु गावचे सरपंच अनिता राऊत, उपसरपंच शशिकांत खुने, श्रावण गणगे, महादेव मार्कड, रघुनाथ माने ग्रामपंचायत अधिकारी भुजबळ, सागर बुरंगे, शिवाजी यशवद, दशरथ यशवद यांनी परिश्रम घेतले.

## चिंच फोडण्यातून महिलांना मिळतोय रोजगार

**तभा वृत्तसेवा / उदयकुमार पाठक**
**रेणापूर, दि.२७ मार्च -**

गेल्या काही दिवसापासून रेणापूर तालुका व पानगांव परिसरात चिंच झोडपणे. गोळा करणे आणि फोडणे यातून पुरुषासह महिलांना रोजगार उपलब्ध झाला असून त्यातून मिळालेल्या पैशातून घर खर्चासाठी महिलांना आर्थिक हातभार लागत आहे.

सध्या रेणापूर तालुक्यासह पानगाव परिसरात यंदा चिंचेचे चांगले उत्पादन निघत आहे. चिंच व्यापारी झाडाचा तोर बघून झाडाची किंमत ठरवत असतात. त्यांना माहित असते की या झाडापासून आपल्याला किती फायदा होऊ शकतो. आज रोजी चिंच परीपक्व झाली असल्याने चिंच झोडपणे. गोळा करणे आणि त्याची फोडणी करून गर आणि चिंचोका बाजारात नेण्यासाठी व्यापाऱ्याची धावपळ उडाली आहे.



चिंच झोडपण्यासाठी व्यापारी पुरुषांची तर गोळा करण्यासाठी आणि चिंच फोडण्यासाठी महिलांची मदत घेत आहेत चिंचेला सध्या ८२०० ते १३००० पर्यंत भाव लागत आहे. बाजारभावात घसरण होण्या अगोदरच परिपक्व झालेली चिंच झोडपून गोळा करून आणि फोडून बाजारात नेण्याची व्यापाऱ्यांना घाई झाली आहे. सर्व व्यापारी महिलांना घरपोच चिंच फोडण्यासाठी आणून देत आहेत. सध्या उन्हाचे चटके बसत असल्याने महिला पण पहाटेचे शेत शिवारात जाऊन रवी धान्य पिके आणि भाजीपाला व इतर कामे करून उन्हामुळे लवकर घरी येत आहेत. आणि दुपारच्या सावलीत रिकाम्या वेळेत चिंच फोडणीचे काम करत आहेत. महिलांना फोडलेल्या चिंचे मागे २० रुपये किलो मजुरी मिळत आहे.

एक महिला साधारण दिवसाला २० किलो चिंच फोडत आहे. त्यांना दिवसाकरता केवळ चिंच फोडणीतून ३०० ते ४०० रुपये मजुरी मिळत आहे. चिंच फोडणीतून महिलांना रोजगार मिळत असल्याने घर खर्च साठी आर्थिक हातभार लागत आहे.

## एकनाथ शिंदे यांच्या लोकाभिमुख निर्णयामुळेच राज्यात पुन्हा महायुती सरकार : शिवाजी माने

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२७ मार्च -**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथराव शिंदे यांच्या लोकाभिमुख निर्णयामुळेच राज्यात प्रचंड बहुमताचे महायुती सरकार राज्यात आले असल्याचे मसलगा येथील शिवसेना शाखेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना शिवसेनेचे लातूर जिल्हा प्रमुख शिवाजीराव माने यांनी सांगितले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना एकनाथराव शिंदे यांनी महिलांसाठी लाडकी बहीण, महिलांना बस अर्धे तिकिट, एक रूपयात पिकविमा योजना, नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना हेक्टरी मदत दुप्पट, शेतकऱ्यांना पीएम किसान च्या धर्ती नमो शेतकरी योजना, हजारो रूग्णांना



मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत, लाडका भाऊ योजना अशा अनेक लोकाभिमुख योजना प्रभावीपणे राबविल्यामुळेच राज्यात प्रचंड बहुमताचे महायुती सरकार राज्यात आले. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेवर एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनतेच्या सेवेसाठी शिवसैनिक सदैव तत्पर राहील अशी ग्वाही शिवसेना लातूर जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी दिली.

मसलगा येथील शिवसैनिक माधवराव मोहिते यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या शाखेची स्थापना जिल्हा प्रमुख शिवाजीराव माने यांच्या हस्ते फित कापुन फलकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी शिवसेनेच्या लातूर संपर्क प्रमुख रंजनाताई कुलकर्णी, उपजिल्हा प्रमुख सुधीर पाटील, महिला आघाडीच्या लातूर जिल्हा प्रमुख अर्चनाताई बिरादार, युवासेनेचे लातूर जिल्हा प्रमुख युवराज वंजारी, औसा तालुका प्रमुख तानाजी सुरवसे, निलंगा तालुका प्रमुख भगवान जाधव, विष्णु साबदे, बाबुराव शेळके, किरण सोमवंशी, बाबु दंडिमे, सोमेश्वर लक्षेट्टे, निलंगा उप तालुका प्रमुख नागमनी म्हेत्रे, निलंगा शहर प्रमुख बबीता कोरके आदी शिवसेनेच्या प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. यावेळी श्रीमंत जाधव, चंदर पवार, धोंडीराम पिंड, राजेश पिंड, विशाल पाटील, ओम बिरादार, हाजु सय्यद, किशोर तोरखडे, संजय तेलंगे, हारी पिंड, महेश मोहिते, भास्कर शिंदे, नवनाथ नरहारे, संजय घोडके, गफुर सय्यद, वैभव पाटील, शांतेश्वर तेलंगे, सावित्रीबाई मोहिते, शोभा तेलंगे, सोजरबाई रणदिवे आदींसह शिवसैनिक, गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ॲडव्हान्स कोर्सचे उद्घाटन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२७ मार्च -**

श्यामलाल स्मारक कला, क्रीडा व विज्ञान अकॅडमी द्वारा स्पोकन इंग्लीश कोर्स, मराठी हस्ताक्षर कार्यशाळा, मोफत फाऊंडेशन समर कलालेस ४ थी, ५ वी ८ वी व १० वी, तसेच ५ वी ते ९ वी पर्यंत इंग्रजी विषयाचे अभ्यासक्रम अशा विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.




श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा या कार्यक्रमाचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य, प्रमुख पाहुणे भारतीय जनता पार्टीचे माजी अध्यक्ष तथा उसतोड कामगार समितीचे प्रमुख गोविंद केंद्रे, शालेय समितीचे सदस्य पंडीतराव सुकनीकर, बिरादार कुलकर्णी, श्यामार्य कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण भोळे, यामलाल माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक भारत खंदारे व श्यामलाल प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक उगिले, पर्यवेक्षक विजयकुमार बैले, राहुल लिमये, शिक्षक, शिक्षिका विद्यार्थी या सर्वांच्या उपस्थितीत दिपप्रज्वलन करून उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.